

# माणूस



## मोगरा फुलला
## मोगरा फुलला

२ डिसेंबर १९६७

चाळीस पैसे

समग्र साप्ताहिक
# माणूस

वर्ष : सातवे : अंक : सत्ताविसावा
वार्षिक वर्गणी : वीस रुपये
परदेशची वर्गणी : चाळीस रुपये
संपादक
श्री. ग. माजगावकर
साहाय्यक
दिलीप माजगावकर, सौ. निर्मला पुरंदरे

स. न. १८-११-६७

'माणूस'चा १८ नोव्हेंबरचा अंक आम्ही येथील वाङमय विहार मंडळात सामूहिक वाचला. विशेषत: त्यातील विजय तेंडुलकर लिखित 'गल्ली ते दिल्ली' ह्या वगाचे परीक्षण व सर्वांत जास्त "फलज्योतिष: एक तर्कशुद्ध विवेचन" हा शास्त्रीय लेख अत्युत्तम वाटला. ह्यातील एकंदर विवेचन तर्कशुद्ध व विशेषेकरून विज्ञान-प्रेमी वाचकांना आवडणारे आहे. आमची सर्वांची अशी इच्छा आहे की, ही लेखमाला ह्यातील जास्त माहिती संकलित करून देऊन पुढे चालू ठेवावी. श्री. विजय टेंबे ह्यांचेकडून ह्या विषयावर जास्त विचारवर्धक लेखांची अपेक्षा आहे.

आनंदराव शिंदे
विंदुमाधव कुलकर्णी
इस्लामपूर

[ २५ नोव्हेंबरच्या अंकात प्रसिद्ध झालेल्या कार्लमार्क्संसंबंधीच्या श्रद्धांजली या लेखाचे लेखक श्री. रा. म. विवलकर आहेत. नजर चुकीने नाव देण्याचे राहून गेले. —संपादक ]

मूल्य ४० पसे
४१९ नारायण
पुण २
दूरध्वनी : ५७३५९

प्रकाशित लेख, चित्रे, इत्यादींबाबतचे हक्क स्वाधीन. अंकात व्यक्त झालेल्या मतांशी 'माणूस' साप्ताहिकाचे चालक सहमत असतीलच असे नाही. ललित साहित्यातील पात्रे संपूर्णपणे काल्पनिक आहेत.

# संमिश्र मंत्रिमंडळांची पडझड आणि....

गेला आठवडा मोठा खळबळीचा गेला. चोवीस तासांच्या आत दोन मंत्रिमंडळे सत्ताभ्रष्ट झाली. हरियाना, पश्चिम बंगाल या दोन राज्यांतील मंत्रिमंडळांना परिस्थितीच्या रेट्यामुळे सत्तात्याग करावा लागला. हरियानामधील राव बीरेंद्रसिंगांची राजवट तर केंद्र सरकारने एक हुकूम काढून रद्द ठरविली आणि तेथे आता राष्ट्रपतींची राजवट सुरू झाली आहे. केंद्र सरकारच्या या कारवाईविरुद्ध काँग्रेसेतर पक्ष कितीही आरडाओरडा करीत असले तरी त्यांच्या तक्रारीमागे काहीही अर्थ नाही, हे कोणत्याही निःपक्षपाती नागरिकास आढळन येईल. कारण राव बीरेंद्रसिंगांचे गेल्या काही दिवसांतले वर्तन इतके बेमुर्वतखोर झाले होते की लोकशाहीच्या नावाखाली या वर्तनाची गय करणे म्हणजे राजकीय अत्याचाराला उत्तेजन दिल्यासारखेच ठरले असते.

गेल्या फेब्रुवारीमध्ये झालेल्या सार्वत्रिक निवडणुकीमध्ये हरियाना विधानसभेत काँग्रेस पक्षाला नाममात्र बहुमत मिळाले. या घटनेचा फायदा घेऊन काँग्रेसेतर पक्षांनी संयुक्त आघाडी स्थापन केली आणि भागवत दयाल शर्मा यांच्या राजवटीला धक्का देण्याचा मनसुबा आखला. काही काँग्रेस सदस्य या आघाडीत सामील झाल्याशिवाय संयुक्त आघाडीला प्रत्यक्ष कृती करता येण्याजोगी नव्हती. शर्माजींनी बीरेंद्रसिंगांसारख्या महत्त्वाकांक्षी व्यक्तीला मंत्रिमंडळात समाविष्ट करून न घेता त्यांना सभापतिपद दिले. तेव्हापासूनच हरियानातील कुरबुरीला प्रारंभ झाला. संयुक्त आघाडी आपल्याला मुख्यमंत्रीपद देत असेल तर शर्माजींविरुद्ध बंडाचा झेंडा उभारण्याची बीरेंद्रसिंगांनी तयारी दर्शविली आणि ते आश्वासन मिळताच आपल्या सतरा साथीदारांसह त्यांनी काँग्रेसशी घटस्फोट घेऊन संयुक्त आघाडीत प्रवेश केला. पक्षांतरांचे पारितोषिक म्हणून मुख्यमंत्रीपदाची माळ बीरेंद्रसिंगांच्या गळचात पडताच त्यांना कृतकृत्य झाल्यासारखे वाटले आणि मग ज्या शिडीच्या साहाय्याने ते या पदापर्यंत चढले होते त्या शिडीलाच दूर भिरकावून देण्याचा खटाटोप त्यांनी सुरू केला.

बीरेंद्रसिंगांचे मंत्रिमंडळ संमिश्र स्वरूपाचे असले तरी ते कोणाचाच सल्ला मानत नव्हते. त्यामुळे त्यांचे पाठिराखे साहजिकच चिडले. मुख्यमंत्रीपद गेल्याच्या अपमानामुळे आतल्या आत घुमसत असलेले भागवत दयाल शर्मा हा असंतोष वाढावा यासाठी मोठ्या चतुराईने खतपाणी घालीत होते. यानंतर हरियाना विधानसभेत पक्षांतराची साथच पसरली. दोन महिन्यांपूर्वी जनसंघाच्या चार सदस्यांनी आपला पक्ष सोडून

काँग्रेसमध्ये प्रवेश केल्यापासून बीरेंद्रसिंगांची परिस्थिती अतिशय चमत्कारिक झाली. तेव्हापासून त्यांनी सरळ मंत्रीपदांचा लिलाव मांडला. जो कोणी आपल्याला पाठिंबा देईल त्याला मंत्र्याच्या खुर्चीची ऊब मिळू शकेल अशा थाटातच बीरेंद्रसिंग वावरू लागले. ८८ सदस्य असलेल्या या विधानसभेतील छत्तीस सदस्यांनी गेल्या दोन–चार महिन्यांत पक्षांतर केले, हे जाणून घेतले की केवळ मंत्रीपदाच्या खुर्चीला हात लावता यावा म्हणून राजकारणात तत्त्वनिष्ठेचा मुखवटा घेऊन वावरणारे कार्यकर्ते कोणत्या क्षुद्र आकांक्षेने किडलेले असतात हे दिसून येते. या छत्तीस सदस्यांपैकी चार महाभाग तर असे आहेत की, त्यांनी चार वेळा पक्षांतर केले. त्यांचा मूळ रंग कोणता हे त्यांना स्वतःला तरी सांगता येईल की नाही कोण जाणे.

## विश्वामित्र पवित्रा

आज प्रत्येक पक्षाचे वरिष्ठ नेते पक्षांतराच्या साथीबद्दल नापसंती व्यक्त करीत असल्याचे दिसून येते. परवाच अहमदाबाद येथे बोलताना जनसंघाच्या बाजपेयींनी पक्षांतराची निंदा केली. परंतु हरियानामध्ये जे काही घडले त्यात तेथल्या जनसंघाचाही भरपूर हात आहे हे बाजपेयींना ठाऊक नाही असे कोण मानील? ही साथ जेव्हा काँग्रेसपुरती मर्यादित होती तेव्हा साधनशुचितेचा उद्घोष करणाऱ्या प्रजा-समाजवाद्यांपासून राजाजींच्या स्वतंत्र पक्षापर्यंत सर्वांनी टाळ्या वाजवून या बंडखोरांचे मोठ्या आनंदाने स्वागत केले. परंतु हे शस्त्र जेव्हा आपल्या अंगावरही उलटू शकते हे रणधीरसिंगांसारख्या जनसंघ–सदस्याच्या काँग्रेस–प्रवेशामुळे अनुभवावयास आले तेव्हा ‘ छे बुवा, हरियानात काय चालले आहे काही समजत नाही बुवा ’ असा विश्वामित्राचा पवित्रा जो तो घेऊ लागला आहे.

हरियानालगतच्या पंजाबमध्येही यापरते निराळे काहीही घडलेले नाही. अर्थात गुरुनामसिंगांसारखा निवृत्त न्यायधीश बीरेंद्रसिंगाइतक्या खालच्या पातळीला उतरला नाही हे मान्य केलेच पाहिजे. परंतु सदैव पराभवाच्या काठावर उभ्या असलेल्या आपल्या मंत्रिमंडळाची नौका स्थिर राखण्यासाठी गुरुनामसिंगांनाही काही कमी प्रयास पडले नाहीत. काही कमी आमिषे दाखवावी लागलेली नाहीत. आपले लहानसे मंत्रिमंडळ स्थापन केल्यानंतर आता कोणत्याही परिस्थितीत मंत्रिमंडळात वाढ केली जाणार नाही असे प्रारंभी गुरुनामसिंगांनीही मोठ्या आत्मविश्वासाने सांगितले होते. परंतु महिन्याभरातच कम्युनिस्टांचा पाठिंबा टिकावा यासाठी त्यांना आपल्या मंत्रिमंडळात आणखी एका खुर्चीची भर घालून त्यावर एका कम्युनिस्ट सदस्याला विराजमान करावे लागले. गुरुनामसिंगांच्या अकाली दलाला एकीकडे जनसंघाशी व दुसरीकडे कम्युनिस्टांशी सारखी तडजोड करावी लागत होती आणि त्यापायी त्यांच्या दलातील काही सदस्यांचा रोष त्यांना पत्करावा लागला. मध्यंतरी विधानसभेचे अधिवेशन स्थगित असल्यामुळे या असंतोषाची दखल घेण्याची त्यांना जरूरी भासली नाही. परंतु गेल्या आठवड्यात पंजाब विधानसभेची बैठक सुरू होताच

लक्ष्मणसिंग ग्रिल या त्यांच्या सहकाऱ्याने संयुक्त आघाडी सोडून नव्या पंजाब जनता पक्षाची घोषणा केली. आपले बहुमत गेलेले आहे हे डोळ्यांसमोर दिसल्यानंतर आपल्या मंत्रिमंडळाचा राजीनामा सादर केल्यावाचून गुरुनामसिंगांना दुसरा पर्यायच उरलेला नव्हता.

## बंगालची डोकेदुखी

पश्चिम बंगालमध्ये अजय मुखर्जी यांचे मंत्रीमंडळ राज्यपालांनी बडतर्फ केले असून, अजयबाबूंच्या जागी त्यांचेच एक सहकारी डॉ. प्रफुल्लचंद्र घोष यांची नेमणूक केली. अजयबाबूंना मुख्यत: भोवली ती कम्युनिस्टांची संगत. केरळप्रमाणेच पश्चिम बंगालमध्येही डाव्या कम्युनिस्टांचे सामर्थ्य विशेष आहे. त्यामुळे गेल्या निवडणुकींच्या वेळी गांधीवादी विचारांच्या अजयबाबूंना अतुल्य घोषांच्या अरेरावीला तोंड देण्यासाठी डाव्या कम्युनिस्टांसह लहानमोठ्या अशा एकूण चौदा पक्षांची मोट बांधावी लागली, तेव्हा कोठे त्यांना विधानसभेत बहुमत मिळविता आले. डाव्या कम्युनिस्टांच्या सहकार्याची किंमत म्हणून अजयबाबूंनी ज्योति बसू यांना उपमुख्यमंत्रीपद दिले. तेव्हापासून पश्चिम बंगालमधील राज्ययंत्र कसे खिळखिळे होईल या एका हेतूनेच डाव्या कम्युनिस्टांच्या पुष्कळ कारवाया सुरू झाल्या. काही काळाने स्वत: अजयबाबूही या कारवायांमुळे इतके वैतागले की ऑक्टोबरच्या प्रारंभी त्यांनी स्वत:चा राजीनामा देण्याची घोषणा केली. परंतु आपण काँग्रेसला वाट मोकळी करून देत आहोत व तसे करणे आपल्या मतदारांना रुचणार नाही असे सहकाऱ्यांनी अजयबाबूंवर दडपण आणल्यामुळे त्यांनी विचार बदलला.

अजय मुकर्जी यांचीही हतबल अवस्था पाहून डॉ. घोष आपल्या सहकाऱ्यांसह संयुक्त आघाडीतून बाहेर पडले आणि तेव्हाच पश्चिम बंगालमधल्या संमिश्र मंत्रिमंडळाचे भवितव्य ठरून चुकले. विधानसभेची बैठक बोलावून बहुमताचा कौल घेण्यासाठी अजयबाबू टाळाटाळ करू लागले. एखादा नि:स्पृह कार्यकर्ता सत्तास्पर्धेच्या चक्रात सापडला की तो आपल्या पूर्वपुण्याईवर तिलांजली द्यायला कसा तयार होतो याचे अजयबाबू हे एक ताजे उदाहरणच म्हटले पाहिजे. शेवटी राज्यपालांनीच अजयबाबूंची या चक्रव्यूहातून सुटका केली. या घटनेचा सर्वांत अधिक राग कोणाला आला असेल तर तो साहाजिकपणेच कम्युनिस्टांना. कारण त्यांच्या देशद्रोही करवायांना काही प्रमाणांत तरी आता पायबंद बसणार आहे. अर्थात ते स्वस्थ बसतील अशी कोणाचीच कल्पना नाही. ज्या लोकशाहीची त्यांना किंचितही चाड नाही त्या लोकशाहीच्या नावाने गळा काढून बंगालमधील जनतेला पेटवण्याचा त्यांचा ठरीव उद्योग आता सुरू झालेला आहे. पश्चिम बंगालमधील नव्या राजवटीची तीच मोठी डोकेदुखी ठरणार आहे. **—सदाशिव पेठकर**

# मुक्ताफळें

## □ ग्यानबाची दिवाळी

कशी काय गेली दिवाळी मंडळी ? खंडित भारतात सौभाग्याने जन्म पावलेल्या ज्या मुली, प्रथमच अखंड सौभाग्यवती झाल्या असतील त्यांचे यंदा पहिलेच दिवाळसण झाले असतील. दिवाळसण करून जावयाला खूष करताना त्यांच्या वडिलांच्या तोंडाला कदाचित दम आला असेल ! परंतु इतरांना दिवाळी ठीक जायला काहीच हरकत नाही. साखर कशी मिळवली याच्या सुरस आणि चमत्कारिक कथा एकमेकांना सांगता सांगता दिवाळी कशी चुटकीसारखी गेली असणार हे आम्ही ओळखलेच आहे. पुष्कळांनी सोनेदेखील विकत घेतले असणार. ऐन दिवाळीच्या तोंडावर बँकांचे राष्ट्रीयीकरण करण्यासाठी व संस्थानिकांचे तनखे हडप करण्यासाठी जबलपूरला जबर काँग्रेस अधिवेशन भरले व सोने खरीदण्यासाठी यंदा लोकांची झुम्मड उडाली. वर्तमानपत्रात चर्चाच तशी चालू होती ना !

" बँकांचे तावडतोब राष्ट्रीयीकरण झाले पाहिजे. " धारिया

" बँकांनी पुरेसे तारण न घेता लोकांना पैसे वाटावेत असे जर सरकारचे म्हणणे असेल तर बँक धंद्याचे मूळच उखडले जाईल. " शंतनुराव किर्लोस्कर.

" बँकांनी सामाजिक नियंत्रण स्वीकारावे. " मोरारजी.

" मोरारजींना काय म्हणावयाचे आहे ? सामाजिक नियंत्रण, सामाजिक नियंत्रण म्हणजे काय ? पैसे परत येण्याची खात्री नसताना बँकांनी कर्जाऊ रकमा द्याव्यात असे तर यांचे म्हणणे नाही ?" महाराष्ट्र बँकेचे श्री. जोग.

या सगळ्या रणधुमाळीत चाळीचाळींतून माधवराव, शंकरराव, शिवाजीराव, मानाजीराव विचार करीत होते की ही चर्चा सगळी कुणाच्या पैशाबद्दल चालू आहे ? बँकेत ज्यांनी पैसे ठेवले आहेत त्यांच्या ? सर्वांनी एकमेकांच्या हातावर टाळी देऊन निर्णय घेतला.

" बँकेतून पैसे काढणे व सोन्यात गुंतविणे !"

माधवराव म्हणाले, " शिवाजीराव, अहो, पण सोने मिळते कुठे ?"

शिवाजीराव म्हणाले, " अहो, पोलिसांना रोज हात लावतील तिथे सोन्याच्या चिपांवर चिपा मिळतात. आणि तुम्हा आम्हाला ८–१० तोळे सोने कुणी नाही म्हणतोय का ?" मानाजीराव म्हणाले, " जागतिक बँकेचेच भारतीयीकरण का करत नाही ? चांगली चंगळ होईल."

सर्वांना सोन्याचा रस्ता शोधल्यावर सापडला असणार. चला, एकंदरीत बरी गेली न दिवाळी !

आम्ही दिवाळीत काय केले म्हणाल तर वाचले ! खूप वाचले. रटाळ वाचले, कुटाळ वाचले, किटाळ वाचले, चांगले वाचले, वाईट वाचले, सुंदर वाचले, कुरूप वाचले. 'मार्मिक' मवली व्यंगचित्रे पाहिली. स्वाभिमानी मराठी माणसाने किमान हे करायला नको का ? 'किर्लोस्कर' वाचला. पहिल्या झटक्यात, "भारतीय जनता लाडाने वाह्यात होऊ लागली आहे का ?" हा दमदार लोखंडी अग्रलेख वाचला. नुसते भारतीय जनता न म्हणता 'अखिल भारतीय' म्हणायला हवे होते. पुढे 'अतिलाडाने' म्हटले असते तर सर्व शीर्षकाला वेगळीच खुमारी आली असती. अर्थात् शीर्षकात जनता वाह्यात होऊ लागली आहे काय ? असा प्रश्न असला तरी प्रत्यक्ष लेखात सरकार वाह्यात होऊ लागले काय याचीच मुख्यत: चर्चा आहे. संपादकांचा हा गनिमी कावा पाहून खूष झालो. मी इकडे वाचनात गुंतलो असता चिरंजीव 'मार्मिक' चाळीत होते. 'मार्मिक'वरील तीनरंगी चित्र, "चल उठ ! खेच ते निशाण खाली आणि चढव हा महाराजांचा भगवा ध्वज त्या जागी" निरखून पाहत चिरंजीव बाबूने मला मंडावले. बाबूचे वय लक्षात घेता त्याच्या निरागस प्रश्नांचा कुणाला राग येऊ नये—

"बाबा, हा स्वाभिमानी मराठी माणूस उभा असताना हा एवढासा मुलगा त्याला 'चल ऊठ' असे का हो म्हणतो ?"

"या स्वाभिमानी माणसाला टक्कल का हो पडले ?"

"शिवसेना म्हणजे लंगोटी का हो बाबा ?"

मी मानसशास्त्रीय दृष्टिकोनातून बाबूचे शंकानिरसन केले.

"बाबू, उभा असलेला प्रत्येक मनुष्य उठलेला नसतो. 'उभे' राहणे निराळे आणि 'उठणे' निराळे. मराठी माणसे उभी आहेत. परंतु सर्वच अजून उठलेली नाहीत. ठाकरे त्यांना उठवत आहेत. त्या माणसाला टक्कल मुद्दामच दाखवले आहे. शिव-सेनेचे अनुयायी अविचारी नाहीत हे लक्षात येण्यासाठी टक्कल दाखवले आहे. शिवसेना हा मुंबईतील मराठी माणसाचा लंगोटच आहे. तो घातला की महा-राजांचा भगवादेखील लीलया पेलता येतो."

शंकानिरसन होऊन बाबू निघून जाताच मी प्रबोधनकारांचा 'माझी गुरुपरंपरा' हा झक्क लेख वाचला. बाकी या अंकात वाचण्यासारखे काही दिसले नाही. झुंज-णारा महाराष्ट्र ही रक्तबंबाळ चित्रमाला बेफाम आहे. अशा एक एक अंका-अंकागणिक मुंबईतली एकेक नगरपालिका ठाकरे यांच्या अंकित झाली तर आम्हांला आश्चर्य वाटणार नाही.

'ललित' दिवाळी अंकात ठणठणपाळ यांनी साहित्यिकांच्या कुस्त्या लावल्या आहेत. या कुस्त्या लावून खूप विनोद व गंमत करण्याचे काम ठणठणपाळ जातीने करतात म्हणूनच केवळ साहित्यिक मंडळी रागावत नाहीत. या कुस्त्यांत जागतिक कीर्तीच्या कुस्त्या नाहीत याचे वाईट वाटते. जयवंत दळवी—रमेश मंत्री (अमेरि-

कन फ्री स्टाईल), शं. ना. नवरे– बाळ (देवदासी) या कुस्त्या ठणठणपाळांना असाहित्यिक वाटतात काय ? या स्टाईल अंकाचे संपादन मात्र दृष्ट लागण्यासारखे सुंदर आहे. श्री. केशव कोठावळे यांच्या साहित्यिक दृष्टीचा हा अंक म्हणजे गौरव आहे. प्रा. शांता शेळके यांनी वर्णन केलेली 'बेथ' व विद्याधर पुंडलीक यांनी घडवलेले 'श्याम'चे दर्शन विलोभनीय आहे. शं. ना. नवरे यांच्या कथा अनारश्या-सारखा खुसखुशीत आहेत !

'सत्यकथे'नं यंदा खूपच निराशा केली. जी गोष्ट वाचावी ती आपली श्लील ! कुठल्याच कथेत काळीभोर पिल्लं नाहीत, व्यभिचार नाही काही नाही. व्यंकटेश माडगूळकरांची कथा– 'गोष्ट', बाळकृष्ण देसाई यांची 'जहाज', मधुकर कुलकर्णी यांची 'वेलपत्र' या कथा यामुळे मन नुसतेच उल्हसित करतात. चाळवत वगैरे नाहीत. सदानंद रेगे, पंडलिक, ए. वि. जोशी, चिरमुले यांच्या कथा काहींना आव-डाव्या. सई परांजपे यांची कथा तशी सुरेख आहे. परंतु कथेला रंग भरतो–एक भारतीय तरुणी सर्व धोके पत्करून एका विवाहित फ्रेंच तरुणाच्या खोलीत रात्री एकटी शिरते– इथेच नेमकी त्यांनी कथा बंद करून विरस केला आहे. यंदा एकं-दरीत श्लील धोरण लक्षात घेता संपादकांनी पुढची कथा बहुधा कापली असावी.

या अंकातील कविता वाचू लागताच झोपेने घेरले.

सर्व दिवाळी अशीच काहीबाही वाचीत आनंदात गेली. वृत्तपत्रे दिवाळी अंक म्हणून निघाली व मंत्र्यांचे फोटो व भाषणे चार दिवस वाचावी लागली नाहीत. यामुळेही कदाचित दिवाळीच्या आनंदात भर पडली असेल. मंत्र्यांना काय वर्षभर दिवाळी असते. जनतेला निदान चार दिवस तरी त्यांनी भंडावले नाही याकरिता त्यांचे मी समस्त मराठी जनतेच्या वतीने अभिनंदन करतो.

## □ आंतरराष्ट्रीय सिंहस्थ !

१९६७ चे वर्ष म्हणजे आंतरराष्ट्रीय सहलीचे वर्ष ! इण्टरनॅशनल टूरिस्ट इयर प्रत्येक जागतिक गोष्टीत भारत आपला वाटा उचलीत असतो. नेहरूंच्या हया-तीत जो योग आला नाही तो आंतरराष्ट्रीय सिंहस्थाचा योग यंदा आलेला. मग काय विचारता ! आली सिंहस्थ साजणी, मंत्रीजना झाली पर्वणी. सरासरीने ३० मंत्री, लोकसभासदस्य व भारतीय सरकारातील वरिष्ठ अधिकारी गेले सहा महिने लंडनलाच होते. युरोपात, अमेरिकेत, जपानात आफ्रिकेत होते. त्यांची सरासरी उपलब्ध नाही.

इंग्लंडमधल्या भारतीय वकिलातीतील अधिकाऱ्याने सांगितले, "नेहरूंच्या मृत्यू-नंतर वर्षाकाठी इंग्लंडला येणाऱ्या मंत्र्यांच्या संख्येत भरमसाट वाढ झाली आहे. परंतु ब्रिटन-भारत संबंध मात्र अधिकच दुरावलेले आहेत !"

[पान ५९ वर]



रातराणी
रातराणी
रातराणी
रातराणी
रातराणी
रातराणी
रातराणी
रातराणी
रातराणी
रातराणी
रातराणी
रातराणी
रातराणी
रातराणी

मध्यंतरी मुंबईत दोन तरुणांचे वेगवेगळ्या कारणांनी सत्कार झाले.

पैकी एकाला एकोणऐंशीवे संपून ऐंशीवे वर्ष चालू झाले आहे. दुसरा या मानाने अल्पवयीन म्हणणे केवळ एकोणसाठ पूर्ण वयाचा झाला.

एकाने अत्यंत नाट्यमय जीवन एखाद्या नाटकात भूमिका करावी तसे यशस्वी-पणे तरीही अलिप्तपणे भोगले. दुसऱ्याने नाटक हेच आपले जीवन बनवले आणि हे तो कायावाचामने जगला, जगत आहे.

एक मृत्यूची वाट पाहत जीवनाच्या काठावर येऊन, थकलाभागला पण बालिश उत्सुकतेने पल्याडची क्षितिजे न्याहळू बघत उभा आहे. दुसरा जीवनाच्या खळाळत्या प्रवाहात अजून स्वतःला हरवून टाकीत हास्यमुखाने कार्यरत आहे.

पहिल्याचे नाव पांडुरंग महादेव बापट. दुसरे मोतीराम गजानन रांगणेकर.

केवळ जवळपासच्या काळात मुंबईत साजऱ्या झालेल्या दोघांच्या सत्कारांनीच हे दोघे असे एकत्रित सापडले. एरवी दोघांच्या क्षेत्रात, वृत्तीत, जमीनअस्मानाचा फरक.

स्वतःच्या बाह्यरूपाकडे आजन्म संपूर्ण दुर्लक्ष केलेले पां. म. बापट.

स्वतःच्या बाह्य रूपाबद्दल वर्षानुवर्षे काटेकोर व तपशीलवार काळजी घेत आलेले मो. ग. रांगणेकर.

विवाहित होऊन तापसी जीवन जगलेले सेनापती. अविवाहित राहून गृहस्थाश्रमी वृत्ती जोपासत आलेले रांगणेकर.

समाजाकडून त्यागाची सक्रीय अपेक्षा करणारे त्यागी तात्या बापट आणि त्याला दोन घटका केवळ हसवण्यात आणि रिझविण्यात त्याची नि आपली इतिकर्तव्यता मानणारे नाटककार मोतीराम रांगणेकर; प्रसंगी ज्वलंत ध्येयवाद, त्याग, तपस्या यांची मुक्त - आणि निरागस खिल्ली उडवण्याइतके अवखळ. एकाच्या काळजात आणि मेंदूत अद्याप प्रसंगी फुलून उठणारा धगधगता वन्ही; दुसऱ्याच्या रोमरोमात विनोदबुद्धी भरलेली.

शोधावे तेवढे विरोधच.

दोघांच्या ताज्या सत्कारांपैकी दादरला बाल मोहन सभागारात महर्षी सेनापतींचा सत्कार

# दोन 'तरुण' सत्कार

झाला तो त्यांच्या साहित्याच्या नव्या कोऱ्या संकलनात्मक ग्रंथाच्या प्रकाशनानिमित्ताने; आणि गिरगावात साहित्य संघ मंदिरात मिष्किल रांगणेकरांचा सत्कार झाला आजवर त्यांनी केलेल्या रंगभूमीच्या एकनिष्ठ सेवेसाठी; धीरगंभीर धार्मिक वेदघोषानिशी.

ज्वलंत व्यक्तिमत्त्वाच्या सेनापतींविषयींच्या भाषणात त्यांच्या अवखळपणाच्या, बालिशपणाच्या अनेक आठवणी श्री. शं. नवरे, ना. ग. गोरे, मोहाडीकरबंधू यांनी रंगून सांगितल्या. अनेकदा श्रोते खळाळून हसले. रांगणेकरां-

विजय तेंडुलकर

विषयीच्या भाषणात त्यांना ' तपस्वी ' संबोधण्यात आले आणि डॉ. चिंतामणराव देशमुखांनी एक अत्यंत गंभीर भाषण केले.

आपल्या भाषणातदेखील, सेनापतींनी आपले आपल्याला आणि आपल्या वृद्धत्वाला एकदोनदा जाहीर आणि निखळ हसून घेतले, तर रांगणेकर विनोद करण्याच्या प्रयत्नात वारंवार नकळत गंभीर होत होते, भारावत होते.

दोघांतले पक्के साम्य : वेगवेगळ्या कारणांनी आणि अर्थांनी दोघांनाही जीवनात अद्याप चांगलाच रस आहे.

सेनापतींना श्रीहरीच्या या विश्वरूप खेळात.

रांगणेकरांना नाटक नामक खेळाच्या शापित विश्वात.

जीवनाविषयीचे प्रेम दोघांच्याही हास्यावाटे, नजरेवाटे केव्हाही ओसंडते.

व्यक्तिमत्त्वात एक टवटवी आहे, रग आहे, आकर्षण आहे.

जे आजच्या विशीच्या बहुसंख्य तरुणांत नाही ते रांगणेकरांमध्ये साठीला सापडते आणि सेनापतींमध्ये ऐंशीव्या वर्षी जाणवते.

माणसांची ही एक वेगळीच जमात म्हटली पाहिजे. ही मंडळी वयाने वठत नाहीत, बहरत जातात. सुकत नाहीत, फुलत राहतात. जीवन त्यांचा आत्मा राठ आणि वातड नाही करू शकत. त्याला टवटवी देते. कुणाला कर्मयोगातून, कुणाला विनोद बुद्धिवाटे. कशातून हा चैतन्याचा झरा कुणासाठी झरेल त्याचा नियम नाही.

जीवन त्यांनाही जखमा करते. नशीब त्यांनाही कोलदांडे घालते. परिस्थितीच्या अणकुचीदार दगाबाज विखारी नख्या त्यांच्याही उमद्या, उत्साही, जिद्दी वृत्तीत वारंवार खुपसल्या जाऊन भळभळा रक्त काढतात. माणसे त्यांनाही जाचतात, काचतात, आंतरिक संघर्ष ग्रासतात.

पण कशी कुणास ठाऊक, ही जमात हे सर्व जगून एक प्रकारे अलिप्त राहते. जखमा आत–आत जपत एकीकडे जीवनाने रसरसत असते. रक्तबंबाळ होऊनही हसतमुख दिसते. आपला पिंड ती काही झाले तरी सोडीत नाही. आपले क्षेत्र आणि कार्य कधीही ती टाकीत नाही. जणू काही विपरीत घडलेच नाही !

निदान घडले असेल तर त्याचा उपद्रव अन्य कोणालाही होणं नाही.

येथे फक्त स्फूर्तीच मिळेल, आशावाद मिळेल, धडाडी आणि हास्य मिळेल.

रांगणेकरांनी सेनापतीसारख्यांच्या समोरचे आपले सर्वार्थांनी लहानपण आपल्या भाषणात उल्लेखिले. सेनापतींनी आपल्या साऱ्या कर्तृत्वाचे श्रेय दामोदर वामन भिडे या कॉलेज जीवनात भेटलेल्या तालीम शिक्षकाला, जवळचे सुपारीचे खांड द्यावे तसे सहजपणे देऊन टाकले.

दामोदर वामन भिडे यांनी तलवारीवर हात ठेवण्याला लावून सेनापतींकडून आमरण राष्ट्रकार्याची शपथ घेवविली.

शपथ अनेकजण घेतात, घेववितात. पण ती आमरण पाळण्याचे आत्मिक बल

देणारा भिडे एखादाच. आणि हे बल पेलून त्याखाली आपली सर्व ऐहिक सुखे गाडली जाऊ देऊन वज्राच्या निर्धाराने जगणारा बापटही एखादाच.

बापट दंतविहीन मुखाने, जाड भिंगांच्या चष्म्याआडून म्हणाले, मी काही केले नाही, दामोदर वामन भिड्यांनी माझ्याकडून शपथ घेवविली आणि मनाच्या शांततेच्या इच्छेने मी ती आयुष्यभर यथाशक्ती पाळली. मी फक्त मनाच्या शांततेसाठी झटलो, इतकेच. सुखाच्या प्राप्तीसाठी मनाची शांती आवश्यक आहे, आणखी ती प्रत्येकाने मिळविण्याचा प्रयत्न केला पाहिजे. मी कुणाचे कधी ऐकले नाही–म्हणजे तसे कानांनी ऐकून घेतले पण केले माझ्या हृदयस्थ श्रीहरीच्या म्हणण्याप्रमाणे. तो खरा. त्याचे म्हणणे ऐका आणि त्याप्रमाणे वागा म्हणजे मनाची शांती निश्चित लाभेल.

सर्व सुखांचा लीलया त्याग करून ध्येयवादाची काटेरी वाट पत्करलेल्या सेनापतींनाही सुख हवे होते हे आश्चर्य– मात्र हे सुख वेगळे होते. हे निष्क्रियतेचे किंवा भरल्या पोटाचे सुख नव्हते, हे कृतार्थतेचे आणि तुडुंब भरलेल्या आत्म्याचे सुख होते. हे सोपे सुख नव्हते, अवघड सुख होते. ऐहिक फलप्राप्तीची अपेक्षाच त्यात नाही. सुख देणारा हृदयस्थ श्रीहरी आणि ते घेणाराही हृदयस्थ श्रीहरीच. सारा अंतस्थ व्यवहार.

रांगणेकरांचा व्यवहार रांगणेकरांच्या मते कधी एवढ्या आध्यात्मिक पातळीवर पोचला नाही. पण गंमत म्हणजे त्यांच्याही आयुष्याचे सूत्र पाहिले तर हेच निघेल. मी कुणाचे कधी ऐकले नाही, म्हणजे कानांनी सर्वांचे ऐकून घेतले पण केले माझ्या हृदयस्थ श्रीहरीच्या म्हणण्याप्रमाणे ! संबंधित या विशिष्ट हृदयस्थ श्रीहरीला ' रांगणेकरांचा हट्ट ' म्हणून ओळखत आले, अद्याप ओळखतात.

सत्काराच्या रांगणेकरी नर्म, विनोदी, हलक्या फुलक्या भाषणात एकूण सूर निघाला तोही फलविरहित मनःशांतीचाच. कर्मयोग न बोलता कर्मयोगच त्यांनी व्यक्त केला; फक्त तो होता एका मर्यादित कार्यक्षेत्रापुरता; आणि तत्त्वज्ञान यापेक्षा व्यवहार म्हणून पत्करलेला.

दोन्ही सत्कारात भाडोत्री सत्काराचा विटकेपणा नव्हता; एक प्रकारचा जिवंतपणा होता. मनःपूर्वकता होती. संयोजक आणि वक्त्यातच नव्हे तर श्रोत्यातदेखील ती होती.

बापटांच्या सत्काराच्या भाषणात ना. ग. गोरे यांनी काढलेला एक उद्गार देण्याजोगा आहे. गोरे म्हणाले, " मला अनेकदा असे वाटते की सेनापती काय, आमचे सानेगुरुजी काय, सेवादलाचे भाऊ रानडे काय, ही माणसे या जगातली नव्हेतच. हे कोणी अंतराळातून मुक्त भ्रमण करणारे दिव्य आत्मे वाट चुकून या आमच्या पृथ्वीवर आले की काय असे वाटते. "

रांगणेकरांविषयी बोलताना प्रा. वसंत कानेटकर म्हणाले, " एखाद्या पुरुषावर ज्या

वयाच्या स्त्रिया खूष होतात ते त्याचे वय समजावे; तशी एखाद्या लेखक-दिग्दर्शका-वर किंवा कलावंतावर ज्या वयाची पिढी खूष होते ते त्यांचे वय समजावे."

या दोन्ही सत्कार-समारंभांत त्या त्या समारंभांचे 'हिरो' प्रकाशझोतात व्यास-पीठावर तटस्थ बसून स्वत:विषयी असले सर्व काही प्रिय-अप्रिय, बरे-वाईट ऐकत होते. मुद्रेवरून कुतूहल, संकोच, अंतर्मुखता, नवल, विशुद्ध कंटाळा असे बरेच काही सरकून जात होते. मो. ग. रांगणेकर नावाच्या जेष्ठ, टापटिपीच्या आणि बहुगुणी 'भूमिके'ला शोभतील असे रांगणेकर दिसले, तर सेनापती, सेनापती बापट या पराक्रमी आणि त्यागी क्रांतिकारकाला पहाण्यासाठी सहज म्हणून येऊन चुकून व्यासपीठावर बसल्यासारखे वाटले.

एरवी अस्खलित भाषण करू न शकणाऱ्या रांगणेकरांनी ते केले, तर अस्खलित भाषणांनी उमेदीत व्यासपीठे हादरविणाऱ्या सेनापतींनी आपले एक जुने काव्यच घाईघाईने आणि तोंडातल्या तोंडात बालवर्गातील मुलासारखे म्हणून टाकले !

शेवटी अशा अकृत्रिम तपशीलांनीच औपचारिक समारंभ हृद्य आणि संस्मर-णीय होतात.

□

# इंटरनॅशनल
# टूरिस्ट (अन्) फेअर

चर्चगेटजवळ इंटरनॅशनल टूरिस्ट फेअर आणि वांद्रयाला जेमिनी सर्कस यांनी मुंबईचे आकाश गेल्या काही रात्री सध्या कसे उजळलेले असते. चर्चगेटच्या क्रॉस मैदानावर 'फेअर' मधल्या रूपवती भव्य पंचनद्या उघड्या आभाळाखाली रंगीबेरंगी पाण्याची स्वर्गीय कारंजी थुई थुई उडवीत दर्शनार्थींच्या नजरांचे पारणे फेडीत उभ्या आहेत, तर सर्कसचा उग्र गोरिला वांद्रयाच्या हाय-वेसमोर समुद्रकाठी आपल्या केसाळ जंगली चाळयांनी मुंबईकर प्रेक्षकांना रंजक गुदगुल्या करीत आहे. उपनगरातली हौशी मंडळी रोज संध्याकाळपासून-कोठल्या कुणास ठाऊक पण उत्साहाने सहकुटुंब चर्चगेटच्या दिशेने लोटतात, तर चर्चगेट-कुलाब्याकडले मुंबईकर तितक्याच उत्साहाने वांद्रयाची वाट बायकोपोरे घेऊन धरतात. कुणाला स्वर्गीय पंचनद्या तर कुणाला जंगली गोरिला. यांच्या अध्ये मध्ये मग देवआनंदचा 'ज्युएल थीफ,' आयन फ्लेमिंग साहेबाचा दे-मार 'गोल्डफिंगर,' उघड्या पोटाची नर्तिका लैला लतीफ, थिएटर ग्रुपचे नवे इंग्रजी नाटक 'ऑड कपल', ज्योत्स्ना भोळे-रामदास कामत-सुहासिनी मुळगावकर मंडळीची केवळ नाट्यसंगीताची एखादी मैफल, सचिन शंकरचे एकादे नवे नृत्यनाट्य-असे बरेच काही. ज्याला जे रुचेल


आणि परवडेल ते त्याने पाहावे–ऐकावे.

पण पंचनद्या आणि गोरिला सोडला ना, तर 'फेअर' ऊर्फ प्रदर्शन आणि सर्कस सालावादच्या सालाबादच्या सालाबादप्रमाणेच आहेत असे माझे काहीसे उदास मत. जागा आणि क्रम बदलून सर्व काही तेच–तसेच.

'इंटरनॅशनल टूरिस्ट फेअर'च घ्या. या 'फेअर'वर एका मार्मिक टूरिस्ट गृहस्थांनी पंधरवड्यामागे ताजमहाल हॉटेलच्या सज्जात दोन शब्दांत आपला अभिप्राय माझ्याकडे दिला. प्रदर्शन पाहून ते नुकतेच आले होते. अवांतर बोलण्याच्या ओघात मी उपचार म्हणून, 'फेअर' पाहिलीत का असे विचारताच होकारार्थी मान हलवून ते तोंडातल्या पाइपमधल्या उंची तमाखूचा आस्वाद एकाग्रतेने घेत राहिले. मी विचारले, कशी वाटली फेअर? त्यावर कर्तव्यबुद्धीने आता मत देणेच आले असा चेहरा करून तोंडातला पाइप काढून ते गुरगुरले, मोस्ट अनफेअर! आणि पुन्हा पाइप ओढीत राहिले.

प्रदर्शन पाहिल्यावर झालेले माझेदेखील हेच मत–मोस्ट अनफेअर! अप्रदर्शनीय प्रदर्शन! निदान अ-दर्शनीय तर खास.

प्रदर्शनाच्या बाहेर महाद्वाराजवळच एक मोठ्ठा फुगेवजा रंगीबेरंगी विटका गोळा रोवून ठेवला आहे–या प्रदर्शनात खऱ्या अर्थाने काही मोठ्या प्रमाणावर आंतर-राष्ट्रीय असेल तर हा एवढा गोळाच –तोदेखील प्रदर्शनाच्या बाहेर. यात हारींनी



प्रवेशद्वार

जागोजाग लावलेले देशोदेशींचे ध्वज आणि देशांची नावे धारण केलेल्या छोट्या झोपड्या आतल्या ठरीव ठशाच्या मांडणीच्या ठरीव छायाचित्रांसह मिळवून बाजूला ठेवल्या म्हणजे उरते ते राष्ट्रीय किंवा देशी म्हणजेच तुमच्या आमच्या एरवीच्या परिचयाचे प्रदर्शन–महाराष्ट्राचे सांस्कृतिक इत्यादी दर्शन, विविध माल-मसाल्याची सुशोभित, विशोभित दुकाने, खाद्य-पेय पदार्थांची हॉटेले आणि ठेले, (यात या प्रदर्शनापुरते ' आंतरराष्ट्रीय ' आहाराचे एक हॉटेल–हे या विशिष्ट प्रदर्शनातले एक ठळक आकर्षण !) रेल्वे-बँका-मेहेरबाबा-कुटुंबनियोजन, बेस्ट कंपनी वगैरेंची प्रचार-केंद्रे, नाट्य-चित्रपटगृह–ज्यात बाहेरचा गोंधळ सुस्पष्ट आणि समोरचे संवाद अस्पष्ट ऐकू येण्याची विशेष सोय–एक रुग्णोपचार गृह (सिंहांनी चालवलेले–लायन्स क्लबचे.) एक बालसंगोपनगृह रुक्ष आणि करड्या मुद्रांच्या ' आया ' बायांसकट; (ही अमूल बटरची कृपा.) झालेच तर विजेचा तोच पाळणा, तेच मेरी-गो-राउंड, शक्तीच्या प्रयोगांची तीच यंत्रे, त्याच साबणाचे फुगे काढण्याच्या विकाऊ बाटल्या आणि अर्थात आपणही तेच; त्याच जुन्या गर्दीने ! या खेपेस यात जास्त काय आहे तर पैसे देऊन स्वतःला वेड्यावाकड्या आकारात पाहण्याची सोय–विशेष प्रकारच्या आरशांचा स्टॉल, आणि कमी आहेत धडविहीन मुंडकी, पाच पायांची गोमाता, बनावट स्कूटरवर बनावट बाईसमवेत आपला मनपसंत फोटो जागच्या जागी काढून देणारे शीघ्र फोटोग्राफर, ही जत्रा आणि प्रदर्शनातली मक्तेदार मंडळी. (प्रदर्शन ' आंतरराष्ट्रीय ' असल्याचे ऐकून बिचारी उगीचच दूर राहिली की काय ? ' फेअर ' या नावाने चकली ?)

या ठरीव गर्दीतून मधूनच शिट्टचा मारीत धावते एक छोटी आगगाडी. हिला पुढे ड्रायव्हर आणि मागे गार्डऐवजी एक गार्डिणबाई असतात. हेही प्रदर्शनाचे एक किरकोळ आकर्षणच. ढेंग नंबरच्या डब्यात अत्यंत भारदस्त व गंभीर मुद्रेने बसून गणवेषातील या गार्डिणबाई गाडीबरोबर गर्दी पांगवीत चौफेर सैरावैरा धावताना पाहून टूरिस्टांचेदेखील थोडेफार रंजन होईल, मग तुमचे आमचे काय ! गाडी ' बालां 'साठी असल्याने गार्ड संस्थेचे हे सरकारी ' ताई 'करण झाले असेल. गाडीत पाहावे तर मात्र बालांबरोबरीने बाप्ये आणि बाया प्रौढत्वी निज शैशवास जपत मजेत बसलेले दिसतात–जाऊ द्या. ' उतारू 'ची गर्दी जरा कमी असती, तर मीही तेच केले असते. हे असले प्रदर्शन रांगा लाव-लावीत पायी, धीमे धीमे पाहण्यापेक्षा या गाडीतून दोन फेऱ्या मारल्या की काम झाले. देवाशपथ !

येऊन जाऊन जरा थांबून रस घ्यावा असे ठिकाण इथे एकच आहे–– कळसूत्री बाहुल्यांचे खेळ करणाऱ्या गुल्झारीलाल या कलावंताचे छोटे थेटर. त्यातला छोटा रंगमंच आणि त्यावर होणारी कळसूत्री बाहुल्यांची छोटी छोटी पण मजेदार नाटके. वीतवीतच उंचीची ही हसती–नाचती–बोलती आणि हाणामारी करणारी मजेदार मंडळी आपल्याला एका वेगळ्या जगात–निदान प्रदर्शनाच्या व्यापतापाबाहेर––

अल्लद घेऊन जातात. दुखणारे पाय आणि डोके विसरायला लावून हसवतात, रिझवतात. बाहेर पडले की खरीखुरी गर्दीदेखील कळसूत्री वाटू लागते. कुणाची बायको त्याचे कळसूत्र साड्यांच्या स्टॉलच्या दिशेनें खेचते आहे, तर कुणाची पोरे त्याची कळसूत्रे पकडून त्याला खेळण्याच्या नाहीतर खाण्याच्या दुकानाकडे ओढताहेत. कुणाच्या कळसूत्राला जन्मदाता नाहीतर जन्मदात्री मधून मधून रागीट हिसके मारते आहे, तर कुणाचे कळसूत्र धरून पोलिस त्याला रांगेत लोटतो आहे. अर्थात गुल्झारीलालच्या खेळांची गंमत या कळसूत्री व्यवहारात नसतेच.

महाराष्ट्र सरकारचा मध्यवर्ती आणि भला मोठा स्टॉल हे टूरिस्टांनीच पाहिले पाहिजे असे या प्रदर्शनातले एक मुख्य ठिकाण. पण टूरिस्टांऐवजी तिथे लोटतात बहुसंख्य तुम्ही–आम्हीच. त्यांना मिळतो पुन:प्रत्ययाचा आनंद. यात पुन:प्रत्यय भरपूर; आनंद कमी. कारण इथली रांग उगीचच सर्वांत लांब असते. तिचे टोक शोधताना दोनचार स्टॉल बघून होतात म्हणजे पाहा !

उपयुक्ततावादी दृष्टिकोनातून या प्रदर्शनाचा विचार करायचा तर इथे असलेल्या इतर अनेक नित्यपयोगी सुखसोयींसमवेत एक सलून हवे होते अशी· एका प्रेक्षकाची सूचना. हा मला प्रदर्शनात भेटला तो रविवार होता. एका जरा संत्रस्तच गृहस्थांनी जागोजागच्या रांगांचा अनुभव घेऊन शेवटी, इथेच एक रेशनचे दुकान पण मांडा म्हणावे, अशी सूचना उ:त्स्फूर्तपणे केली. उपयुक्तावादी दृष्टिकोन बाजूस ठेवून या प्रदर्शनाचा कलात्मक वगैरे विचार न केलेलाच बरा. उरल्या दृष्टीने, प्रदर्शनाबाहेर एक दृश्य मी पाहिले ते आतील मुद्दाम मांडलेल्या दृश्यांहून कितीतरी उद्बोधक होते. फायर ब्रिगेडचा एक बंब येऊन उभा होता, बंबवाले शिडी उभारून गंभीरपणे उभे होते. आसपास भरपूर बघ्ये कुतूहलाने जमले होते. आणि बंबाच्या शिडीवर चढून दोन रंगारी प्रदर्शनासमोरचा तो पृथ्वीचा विटका प्रचंड गोल पांढऱ्या रंगाने जागोजाग रंगवीत होते. कुणीतरी मला म्हणाले, दॅट शोज टु द टुरिस्ट्स अवर फोरिन पोलिसी ! म्हणजे आमच्या परराष्ट्रीय धोरणाचे प्रतीक म्हणून टूरिस्टांना ते दृश्य दाखवावे, असे त्या गुर्जर बंधूचे म्हणणे !

ही झाली थट्टा; पण खरोखरी सांगतो, धिस फेअर ईज मोस्ट अनफेअर ! फार जाहिरात केली की, काहीही आम्ही धावत जाऊन पाहतो तसे हेही पाहतो आहोत ते सोडा. धमाल गर्दी होते आहे.

ती आमची आदत,. पण मत हेच— अन'फेअर' !

## • समीर विचार वारे

### □ वनस्पती–जननशास्त्र

शेती आणि पशुपालनासारख्या प्राचीन व्यवसायांच्या बाबतींतही आधुनिक वैज्ञानिक किती सखोल विचार करू लागला आहे याची चुणूक इटालियन जननशास्त्रज्ञ डॉ. स्कॉसिरोली यांनी थोडया दिवसांपूर्वी भारतभेटीत दाखविली. ते म्हणाले, पशूंच्या आणि वनस्पतींच्याही जननशास्त्रात–विशेषत: वनस्पती–जननशास्त्रात–जे संशोधन चालू आहे त्याच्या बळावर अन्नोत्पादनाची समस्या सोडविण्यास फार मोठी मदत होणे लवकरच शक्य होईल असा रंग दिसतो. खरे म्हणजे आज जगातील अनेक देशांत गहू आणि तांदळाची जी विशेष सकस व जलद उगवणारी बियाणे वापरली जात आहेत ती अशा संशोधनातूनच निर्माण झाली आहेत. एखाद्या पशूच्या किंवा वनस्पतीच्या " आनुवंशिक पार्श्वभूमी "चा अभ्यास करण्याचे हे शास्त्र गेल्या दशकातच पुढे आले आहे, म्हणजे तसे नवीनच आहे, परंतु शेतीच्या क्षेत्रात, विशेषत: अधिक उत्पादनक्षम बियाणे तयार करण्याच्या कामी हे शास्त्र फारच उपयुक्त ठरत आहे. भारतासारख्या देशात या विषयावर संशोधन चालू असून त्याचा भारताला लाभही झाला आहे. तरी देखील असल्या संशोधन–कार्याला अधिक महत्त्व देण्याची आवश्यकता आहे.

शेवटी भारताला आवश्यक असलेली एक सूचना : " संशोधन हा संपत्तीचा व साधनांचा सर्वांत चांगला व्यय आहे. कारण संशोधनासाठी तुम्ही जेवढा खर्च कराल त्याच्या किती तरी पट लाभ तुम्हांला परत मिळेल. "

### □ भारतातील आफ्रिकन

भारतात प्राचीन काळापासून निरनिराळ्या देशांतून लोक येऊन राहिले आहेत. त्यात अफ्रिकन लोक भारतात व इतर आशियाई देशात कसे पसरले याचे विशेष अध्ययन केलेले एक अमेरिकन प्राध्यापक डॉ. जोसेफ हॅरिस या विषयाची प्रत्यक्ष माहिती मिळविण्यासाठी नुकतेच हिंदुस्थानात आले होते. त्यांच्या मते आफ्रिकन जमातींचे युरोपास प्रयाण हा विषय सर्वांच्या ओळखीचा आहे व या विषयावर हवी तेवढी पुस्तके आहेत,–परंतु आफ्रिकन लोकांचे आशियाकडे प्रयाण या विषयावर का नाहीत ? हा विषय उलट अधिक महत्त्वाचा आहे. " हिंदुस्थानात उपलब्ध असलेल्या हस्तलिखित कागदपत्रांवरून असे दिसते की अफ्रिकन लोक १५०० वर्षांपूर्वी

भारतात स्थायिक झाले होते." म्हणजे त्यांना मुसलमान करण्याच्या खूप पूर्वी ते भारतात येऊन पोचले होते. पोर्तुगीज व्यापाऱ्यांनी त्यांना गुलाम म्हणून एथिओपिया, सोमालिया व पश्चिम आफ्रिकेतून आणले होते. येथल्या ब्रिटिश राज्यकर्त्यांनी गुलामांच्या व्यापारावर बंदी आणल्यानंतर हे आफ्रिकन येथेच स्थायिक झाले. महाराष्ट्राच्या इतिहासात परिचित असलेले सिद्दी व हबशी हे मूळ सोमालिया व एथिओपियातून आलेले आहेत.

## □ पर्यटकांचा मासा कसा गळाला लागेल ?

पर्यटन म्हणजेच परकीय चलन असे समीकरण आपल्याकडे झाले असल्याने पर्यटकांची प्रतीक्षा भारत सरकार आतुरतेने करीत असते. सध्या जगभर ' पर्यटकांचा स्फोट ' झाला आहे. पण भरपूर प्रेक्षणीय स्थळे असलेल्या भारताला मात्र या स्फोटाचा मिळावा तसा लाभ मिळत नाही. का ? या प्रश्नाची चर्चा करण्यासाठी दिल्लीला नुकताच एक आंतरराष्ट्रीय परिसंवाद झाला तेव्हा मांडण्यात आलेली काही मननीय मते :

अमेरिकेतील रॉकेफेलर प्रतिष्ठानाचे नव्या दिल्लीतील प्रतिनिधी डॉ. चॅड्बोर्न गिल्पॅट्रिक : हिंदुस्थान पाहण्यासाठी येणाऱ्या अमेरिकन प्रवाशांजवळ मी ज्यांची शिफारस करू शकेन अशी भारतविषयक वाचनीय पुस्तके पंधरादेखील उपलब्ध नाहीत. सर्वसाधारणपणे जी हिंदुस्थानविषयक पुस्तके उपलब्ध आहेत ती कंटाळवाणी व जुनी आहेत. पर्यटकांना बिनचूक आणि विश्वसनीय माहिती पुरविणे आवश्यक आहे.

भारतातील युगोस्लाव वकिलातीतील अधिकारी स्ट्राबॅक : भारताने पर्यटन मंडळींसाठी सर्वच ठिकाणी पण अपुऱ्या प्रमाणांत सुखसोयी उपलब्ध करून देण्याच्या एवजी काही विशिष्ट स्थळे व प्रदेश सुखसोयींनी सज्ज करण्याकडे लक्ष केंद्रित करावे. भारतात उत्कृष्ट समुद्र-किनारे व स्मारके आहेत. त्यांच्यापासून प्रारंभ करता येईल.

इटालियन प्रतिनिधी श्री. पंतानाली : पर्यटकांना आपल्याकडे ओढण्याचा आणखी एक मार्ग भारताला स्वीकारता येईल, व तो म्हणजे इटालीप्रमाणे पर्यटकांची सहल स्वस्त करणे. इटालीत पर्यटकांना विकायच्या वस्तूंचे दर नियंत्रित असतात व त्यांना इतरही बऱ्याच सवलती देण्यात येतात. उदाहरणार्थ, पर्यटकाला इटालियन नागरिकापेक्षा पेट्रोल अर्ध्या किंमतीत विकण्यात येते.

भारतातील स्पॅनिश वकिलातीतील अधिकारी श्री. नाडल : स्पेनला पर्यटन व्यवसायाचे काही दुय्यम फायदेही झाले आहेत. ते म्हणजे, सामाजिक भेदभाव जलद नष्ट होत असून नगरांची रचना अधिक पद्धतशीरपणे होत आहे. स्पेनला दरवर्षी लक्षावधी पर्यटक जात असल्याने उद्योगधंद्यालाही तेजी आली आहे. मेजोकी या गावात तर दर नागरिकामागे तीन पर्यटक एवढी गर्दी होते ! ○

## असेही विद्यार्थी

# — युक्रान्द —

" हे पूर्वीचे लोक किल्ले इतक्या उंचांवर कशाला बांधत कोण जाणे ! मी असतो तर सगळे किल्ले जमिनीवर बांधले असते. म्हणजे असं, की फर्ग्युसनच्या जऽरा पलीकडे कोंडाणा, थोडं उजव्या हाताला वळा, की लगेच रायगड लागेल, तिथून एका हाकेच्या अंतरावर आणखी एखादा." धापा टाकीत एक महाराज बोलले आणि आमचे दमलेले चेहरे उजळले.

"त्याचं काय आहे, बरं का, आपल्याला यापुढे किती कठीण चढ चढायचा आहे, ते कळावं म्हणून शिबीर सिंहगडावर ठेवलंय."

"हो ना ! शिवाय जगापेक्षा आपण वरच्या पातळीवर गल्यासारखंही होईल."

स्वत:ला दम लागलेला नाही, असे भासवीत प्रत्येक जण आकाशाकडे बघत चढत होता. सिंहगड काही संपत नव्हता, आणि साडेदहाला शिबिराचे उद्घाटन करायचे, म्हणून आम्ही जड सामान वागवीत (शक्य तितक्या) घाईने चढत होतो. खरं म्हणजे सामानाच्या ओझ्यापेक्षा डोक्यांतल्या विचारांचंच ओझं जास्ती भासत होतं. 'यूथ ऑर्गनायझेशन'नं हे चार दिवसांचं शिबीर ठरवलंय खरं, पण कसं काय होतंय्, वक्ते काय बोलतील, त्या ह्याची व्यवस्था झालीय् का, असे अनेक विचार. अखेर पहिला दरवाजा लागला; आणि शिबिराच्या गडबडीला जी सुरुवात झाली ती चार दिवस.

आमच्या 'यूथ ऑर्गनायझेशन'च्या साप्ताहिक सभेत जेव्हा शिबिराचा विचार पुढे आला, तेव्हा सगळे एकदम आनंदले. आम्ही शंभर 'धडपडणारी मुले' आतापर्यंत दीड वर्ष काही काम करीत होतो खरे, पण चार दिवस एका जागी पुण्यापासून दूर राहायचे ही कल्पना भलतीच आनंददायक होती. मग आम्ही ठरवलं की आता आपल्या संघटनेलाही काही स्वरूप देणं आवश्यक होऊन बसलं आहे,

तेव्हा हे चार दिवस याचसाठी खर्च करायचे. शिवाय आपल्या संघटनेच्या पालकांना, हितचिंतकांनाही राहायला बोलवायचं, जमल्यास काही विद्वान अभ्यासू, विचारवंतांना बोलावून सल्ला घ्यायचा......

'यूथ ऑर्गनायझेशन'च्या सिंहगड येथील 'अभ्यास व चर्चा शिबिरा'ची कल्पना अशा रीतीने पक्की झाली.

विद्यार्थी हा काही नुसता दंगली करणारा आणि बेजबाबदार प्राणी नाही. त्यानेही देशासाठी काहीतरी केले पाहिजे या विचाराने दीड वर्षापूर्वी काही मित्र जमले व 'यूथ ऑर्गनायझेशन'ची सुरुवात झाली. आपल्या नेहमीच्या आयुष्यातून वेळ काढून समाजाकडे जरा डोळे उघडून पाहावे, देशाचा विचार करावा, अभ्यास-चर्चा करावी आणि काय करता येईल ते पाहावे, हा मूळ विचार होता. हळूहळू संघटनेची व्याप्ती वाढू लागली व खेड्यांतील वैद्यकीय मदत, रक्तदान, अभ्यास-मंडळे, झोपडपट्ट्यांतील वर्ग, अशांसारखे कार्यक्रम सुरू झाले. नंतर बिहार दुष्काळ निवारणाचा मोठा कार्यक्रम हाती घेतला गेला व संघटनेला बरेच व्यापक स्वरूप आले. आतापर्यंत काही बंधनात, कार्यकारिण्यात, नियमात वगैरे न अडकता हौसेने काम चालले होते. आता मात्र संघटनेला काही निश्चित ध्येय-धोरण, आणि स्वरूपाची गरज आहे, असं जेव्हा जाणवू लागलं, तेव्हा दिवाळीनंतर शिबीर घ्यायचं, असं ठरवलं.

सोळा नोव्हेंबर. सकाळी अकरा वाजता.

उत्सुकतेने भरलेल्या वातावरणात, टिळकांच्या बंगल्यामध्ये आम्ही बसलो आहोत. आपल्या शिबिराची सुरुवात आता होणार आहे. चार दिवस कसे जातील, शेवटी काय ठरणार आहे, असले विचार बाजूला करीत. ना. ग. गोरे शिबिराचे उद्घाटन करणार आहेत. त्या शिवाय डॉ. पु. ग. सहस्रबुद्धे, द. ब. गोडबोले, श्रीराम चिचलीकर, तात्या शिखरे, इंदिरा मायदेव ह्यांसारखी आमची पालक मंडळी बसली आहेत. थंडीचे वातावरणही सुखद आहे. मनातले विचारही. शांतता पसरली आहे आणि नानासाहेबांचे भाषण सुरू झाले आहे......

## "हतो वा प्राप्स्यसि स्वर्गम्–"

स्वातंत्र्यापूर्वीच्या काळात तरुणांनी काय करायचंय, हे नक्की ठरलेलं असायचं. दिशा ठरलेली होती, शत्रू स्पष्टपणे समोर होता. आताच्या तरुणांचं अर्जुनाशी साम्य आहे. अर्जुनाच्या मागे आणि पुढे असं भारतीय सैन्यच होतं, तसं आजच्या तरुणांना भारतीय समाजात राहून, भारतीय समाजाशीच लढायचं आहे– आणि हे माझ्या मते जास्त कठीण आहे.

समाजाशी झुंज देताना, आपण नक्की काय करणार आहोत हे तरुणांनी ठरवणं, हीच एका भव्य परिवर्तनाची सुरुवात आहे. समाजाला आव्हान देणं ही एक मोठी गोष्ट आहे व जातिव्यवस्था मोडणं हे केवढं प्रचंड काम होऊन बसेल!

हजारो वर्षं घण मारूनमारून तयार केलेली ही आदर्शांनी, पुराणांनी आणि जातिभेदांनी भरलेली समाजव्यवस्था, म्हणजे ब्रेन-वॉशिंगचं उत्तम उदाहरण आहे. ही मोडून नवी तयार करणं हेच तरुणांनी आपलं काम समजावं.

जपान, जर्मनी, रशिया, इस्त्रायल या देशांतून मुळी एक नवीनच समाज निर्माण केला गेला. आणि हा एकच मार्ग खरा आहे. असं करायचं असलं तर केवढी अड-गळ बाजूला सारावी लागेल, ह्याचा विचार करा.

समाजाच्या आमूलाग्र परिवर्तनासाठी तरुणांमध्ये तीन गुण असणं जरूरीचं आहे. ते गुण म्हणजे धैर्य, सामर्थ्य आणि "हतो वा प्राप्स्यसि स्वर्गम्, जित्वा वा भोक्ष्यसे महीम्" –ही वृत्ती.

गंभीरपणे समाजाचा विचार करणे, आणि स्वातंत्र्य टिकवणे, ह्या गोष्टी कर-ण्याची वेळ आता आली आहे. सुदैवाने तुम्हा तरुणांची संघटना हा विचार करीत आहे, तेव्हा तुम्ही आता या समाजपरिवर्तनाच्या कामास सुरुवात केली पाहिजे, आधारस्तम्भ बनले पाहिजे, आणि हे विचार सारखे पसरवीत गेले पाहिजे.

रात्री पौर्णिमेच्या चांदण्यांतून फिरताना दिवसभराची आठवण करीत होतो. शिबिराचा पहिला दिवस तर उत्तम पार पडला होता. भाषण, जेवण, चहा, संध्याकाळचं फिरणं, चर्चा – सर्व काही सुरळीत चालू झालं होतं. पुण्यापासून दूर, एका वेगळ्या जगात, एकांतात, शांततेत आणि थंडीत आम्ही शंभरजण विचार करू पाहत होतो, विचार ऐकणार होतो आणि कामाला सुरुवात करणार होतो. गंभीरपणे समाजाचा विचार करणार होतो. त्यातून आम्ही काय करायचे हे ठरणार होते. – पुढल्या तीन दिवसांत...

पहाटे पाचला उठायचे, त्या वेळी रात्रीच्या 'कॅंप-फायर'मुळे डोळे चुरचुरत असायचे. सूर्योदय आणि आमची पहिली सभा एकदम व्हायची. नंतर दुसरी सभा. मग जेवणाचा कार्यक्रम, ज्यांत जेवणाऱ्यांपेक्षा वाढप्यांची संख्या जास्ती असायची. मग तिसरी सभा. दुपारच्या चहानंतर वाटेल तितके फिरा (दोर कापले आहेत!) रात्रीच्या जेवणानंतर चौथी सभा! शेवटी रोज रात्री गाणी (सिंहगडाला काय-काय ऐकावं लागत असेल!) भाषणांबरोबरच संघटनेच्या विचाराकरिता चर्चा-सत्राची योजना होती.

हमीद दलवाईंचे भाषण, संघटनेच्या दृष्टीने अगदी वेगळे, तरीही लक्षात राहण्या-सारखे. हिंदु-मुसलमान संबंधांबद्दलचे त्यांचे विचार एक चैतन्यच निर्माण करून गेले. जन्मापासून देशाला भेडसावणाऱ्या या प्रश्नाला उत्तर सापडण्याची आशा त्यांच्या विचारांनी निर्माण केली. पुढील काही दशकांत तरी, या संबंधांचे स्वरूप बदलून जाईल, असे वाटू लागले. हमीद दलवाईंच्या म्हणण्याप्रमाणे एक बुद्धिनिष्ठ विचारप्रवाह सुरू होतो आहे, की ज्यामुळे आपल्याला काही मार्ग

सापडण्याची शक्यता आहे. स्त्रियांमध्ये बदलाची प्रवृत्ती जास्ती आढळून आली, असं सांगून त्यांनी अफगाणिस्थानला जवळ करण्याचा सल्ला दिला. दीड तास अगदी मोकळेपणाने आणि सहजतेने चर्चा करून ते उठले तेव्हा आम्हांला नवीन प्रकाश मिळाल्यासारखं वाटलं.

आज देशाची परिस्थिती अत्यंत गंभीर आहे, हे काही नव्याने सांगायला नको. 'अराजक' या एका शब्दात तिचं वर्णन करता येईल. समाज या शब्दाला तर आपल्याकडे काही अर्थच नाही. अतिशय असंघटित, विषमतेने भरलेला असा समाज, असं त्याचं रूप दिसतं. तरुणांतही त्याचं प्रतिबिंब न दिसलं तरच नवल. त्यामुळे स्वातंत्र्योत्तर कालातले तरुणही अतिशय विस्कळीत, निराश, वैफल्याने ग्रासलेले, आणि निष्क्रीय दिसतात. आजच्या परिस्थितीला एकच उपाय मूलगामी आणि परिणामकारक वाटतो, तो म्हणजे भारतात (इतर देशांप्रमाणे) अत्यंत नव्या प्रकारचा समाज निर्माण करणे. 'समाजाचे संपूर्ण परिवर्तन' हा एकच विचार शिबिराला आलेल्या प्रत्येक विचारवंताने मांडला, ही या शिबिराची एक विशेष आणि अभिनंदनीय गोष्ट दिसली. तसेच या उपायाची निकड व खरेपणाही प्रत्ययाला आला.

भाई वैद्यांनी पहिल्या दिवशी याच विचाराने आपल्या भाषणास सुरुवात केली. 'आपले आत्मकेंद्रित आयुष्य सोडून तरुणांनी समाजाभिमुख बनावे व ते स्वातंत्र्य, समता आणि न्याय या तत्त्वांना धरून, सुसंघटित होणे, जुनी मूल्ये व रूढी तोडणे, चुकीच्या संस्कारांतून मुक्त होणे व जातिभेदाचे निर्मूलन करणे ही तरुणांपुढची, आजची आव्हाने आहेत. स्त्री-पुरुष संबंधांबद्दलचे आपले गैरसमज काढून टाकून स्त्रियांना वेगळे निकष लागता कामा नयेत, अशी व्यवस्था झाली पाहिजे.' – हे विचार त्यांनी प्रामुख्याने मांडले. समाज, संस्कृती, क्रांती, वगैरेंबद्दल बोलताना आपण हिमनगाप्रमाणे फक्त वरच्या एकअष्टमांश थराचा विचार करतो, त्याच्याखाली काय आहे हे बघतसुद्धा नाही. याकरिता त्यांनी झोपडपट्ट्यांचे उदाहरण दिले.

"विज्ञानाची आपल्याकडे जी उपेक्षा होती ती अक्षम्य आहे. पाश्चात्य देशांत सेक्सचादेखील शास्त्रशुद्ध विचार करणाऱ्या 'सेक्स इन्स्टिटयूशन्स' आहेत, आणि विज्ञानाने आता जुनी मूल्ये पार मोडून टाकली आहेत. 'एथिक्स' चा नव्याने विचार होतो आहे, अशा परिस्थितीत भारतीय तरुणाने समाजात प्रथम विज्ञाननिष्ठा निर्माण केली पाहिजे. भारतीय तरुणाची करिअर म्हणजे आंधळी धाव असते, ती सोडून त्याने समाजाचा विचारही केला पाहिजे." हे राष्ट्र सेवादलाचे प्रमुख श्री. शाम पटवर्धन यांचे विचार होते.

भारतीय समाजात ज्या अनेक अनिष्ट गोष्टी आहेत, त्यांत एक मुख्य म्हणजे आपला जीवनविषयक दृष्टिकोन. शेकडो वर्षे 'ठेविले अनंते...' या प्रका

रची आपली परंपरागत, आणि निवृत्तिवादी जीवनाकडे पाहण्याची दृष्टी आहे. ती राष्ट्राच्या दृष्टीने प्रथम हानिकारक आहे. त्या ऐवजी विवेकनिष्ठा, समतोल दृष्टिकोन समाजात निर्माण करणे हे प्रथम आवश्यक कर्तव्य ठरेल. 'लोकशाही समाजवादा' चे विवेचन करताना पन्नालाल सुराणांनी 'व्यक्तिस्वातंत्र्या'च्या मुद्यावर भर दिला. सतत सुधारणावादी दृष्टी ठेवणे, व्यक्तीच्या विकासासाठी सर्व प्रकारचा वाव देणे व आर्थिक आणि सामाजिक समता निर्माण करणे ही 'लोकशाही समाजवादा' ची मूलतत्त्वे त्यांनी समजावून दिली.

यदुनाथ थत्ते आणि श्री. ग. माजगावकर यांचे विचार वेगळे होते.

आपल्याकडे 'उचंबळून येणे' किंवा 'मनापासून वाटणे' हे प्रकार नाहीत, सगळी शाब्दिक बडबड असते. नुसते बुद्धिप्रामाण्य, स्वयंप्रेरणा नाही. एखादी वाईट गोष्ट पाहिल्यावर आपल्या मनाला प्रतिक्रिया होण्याची सवयच नसते. ज्याला साने गुरुजी 'भाव साक्षरता' म्हणत, तो गुण दिसून येत नाही, आणि तोपर्यंत समाजाच्या दुखण्याला खरा उपाय सापडत नाही; हे यदुनाथजींचे विचार एकदम वेगळीच दिशा देऊन गेले.

श्री. ग. माजगावकरांनी याच प्रकारचा विचार मांडला. संघटनेला आधी कार्य असावे, मग स्वरूप येते, हा त्यांचा प्रमुख मुद्दा होता. क्रान्ती हा शेवटी एका माणसाच्या दुर्दम्य इच्छाशक्तीचा प्रताप असतो, असे त्यांनी राज्यक्रान्त्यांची उदाहरणे देऊन सांगितले. तत्कालिन प्रतिक्रिया हा संघटनेचा एक स्वभाव असायला हवा, असे ते शेवटी म्हणाले.

'क्रान्ति–शास्त्र' या विषयावरचे डॉ. पु. ग. सहस्रबुद्धे यांचे भाषण हा शिबिराचा एक अत्यंत महत्त्वाचा भाग ठरला. समाजपरिवर्तन करणे हे आजच्या या संघटनेचे कार्य, असे एकदा ठरविल्यानंतर, त्याबद्दलचे शास्त्रशुद्ध विवेचन करून त्यांनी संघटनेला मार्ग दाखवला.

राज्यसत्तेत बदल म्हणजे क्रान्ती नसून, समाजाच्या प्रचलित तत्त्वज्ञानात व रचनेत बदल करणे ही खरी क्रान्ती आहे आणि आपल्या संघटनेचे कार्य हेच राहावे.

क्रान्तीला नवीन तत्त्वज्ञान तितकेच आवश्यक ठरते. याबद्दल त्यांनी लेनिनचा दाखला दिला. Without a revolutionary theory, there is no revolutionary movement – Lenin.

जुने तत्त्वज्ञान, जुन्या कल्पना मोडायच्या, पण ते का, व नवीन काय आणायचे हे निश्चित ठरले असले पाहिजे.

तत्त्वज्ञानाप्रमाणेच क्रान्तीला दुसरी अत्यावश्यक बाब म्हणजे प्रचंड आणि समर्थ संघटना.

विचारवंतांचे काही चालत नसते, शेवटी व्होलटेयरच्या नाहीतर नेपोलियनच्याच मनासारखे घडते. तेव्हा समर्थ शासन-यंत्रणा पाहिजे. नाहीतर गुंडांच्या हातात

सत्ता जाऊन अराजक माजते.

" तत्त्वज्ञान, अभ्यास, सामर्थ्य आणि चारित्र्य " हे ' यूथ ऑर्गनायझेशन 'चे चार आधार असावेत असा आदेश त्यांनी दिला.

एकोणीस नोव्हेंबर, १९६७.

शिबिराची सांगता आज व्हावयाची आहे.

शिबिर संपणार, समासदांचा व विचारवंतांचा सहवास संपणार म्हणून वाईट वाटतंय, परंतु तीन दिवस सतत झालेल्या विचारांचा व चर्चेचा गंभीर परिणामही झालेला आहे.

आपल्यावर यापुढे खूप मोठी जबाबदारी आहे, आपल्याला खूप करायचे आहे, आणि ते निश्चित ठरविले आहे, याबद्दलच्या जबाबदारीची जाणीव आणि एक प्रकारचे समाधान सभासदांच्या चेहऱ्यावर दिसत आहे.

परिस्थिती कशी आहे ते कळले आहे, त्यावरचा उपायही एकमुखाने सांगितलेल आहे. आणि समाज–क्रान्तीचे हे कार्य या संघटनेवर अतिशय आशेने टाकण्यात आले आहे.

त्याकरिता ठरविलेल्या गोष्टी अशा–

१. 'यूथ ऑर्गनायझेशन' हे नाव बदलून 'युवक क्रान्ती दल' ( युक्रान्द ) हे नाव घेतले आहे.

२. दलित वर्गाचा उद्धार हे साधारण ध्येय ठरवले आहे.

३. त्याकरिता कार्यक्रमांची आखणी केली आहे.

'युवक क्रान्ती दल' या संघटनेच्या सभासदांनी दिनांक १९ नोव्हेंबरला सकाळी अत्यंत गांभीर्याने एक शपथ घेतली व काही निश्चय केले.

प्रतिज्ञा :

मी, 'युवक क्रान्ती दला' चा निष्ठावंत सभासद, अशी प्रतिज्ञा करतो की,

जातिधर्मनिरपेक्ष, विज्ञाननिष्ठ, समर्थ समाज निर्माण करून, माझ्या परमप्रिय भारतास अग्रेसर राष्ट्र बनविण्यासाठी, माझी सर्व शक्ती मी खर्च करीन.

समाजाच्या सर्वांगीण उत्थानासाठी माझे मुख्य कार्यक्षेत्र, दलित व खेडूत देशबांधवांमध्ये राहील.

ह्या ध्येयपूर्तीसाठी निर्माण झालेल्या 'युवक क्रान्ती दला'मध्ये कार्य करीत असताना, संघटनेचे ऐक्य व कार्यनिष्ठा टिकविणे, ही माझी सर्वप्रथम जबाबदारी राहील.

O

बा. स. हाटे

# 'प्रतारणा'

कृष्णमेघांनी आच्छादून गेलेल्या नभाकडे पाहतच मी पायऱ्या उतरून रस्त्यावर आलो आणि ओल्या रस्त्यातील चिखलातून जपून चालत मी हॉस्पिटलच्या वाटेला लागलो. मनात कित्येक शुभ अशुभ विचार चमकून जात होते. शरीर त्या विचारांपासून अलिप्त राहून पावले पडत होती आणि मन मात्र भरून आलेल्या आभाळासारखेच झाकाळून गेले होते.

मी वॉर्डमध्ये शिरलो आणि माझी नजर राघूला शोधू लागली. एका कोपऱ्यात त्याचा चेहरा दिसला आणि मी पुढे झालो. आणलेली मोसंबी त्याच्या शेजारी ठेवली आणि विचारले–

" कसं वाटतंय रे ? "

त्याच्या शांत चर्येवर काहीच बदल झाला नाही. एखाद्या क्षुल्लक गोष्टीबद्दल बोलताना चेहरा जसा निर्विकार राहतो तसा ठेवीत तो म्हणाला, " ठीक आहे. " मी त्याच्या स्निग्ध पण स्थिर डोळ्यांकडे एकटक पाहून म्हटले, " डॉक्टर, काय म्हणाले ? "

तो तितक्याच शांतपणे पण स्वत:शीच हसला आणि केवळ माननेच सांगितले त्याने, " काही नाही. "



त्याचा हा अबोल आणि शांतपणा काही आजचा नव्हे. केवळ या हॉस्पिटलात एकाएकी यावे लागले म्हणून काही तो असा मुका झाला नव्हता, त्याच्या स्वभावाचा तो एक विशेष भाग होता. त्याच्या जीवनाची रेषा या अबोलपणाच्या पट्टीवर अगदी सहजपणे गुंडाळलेली होती.

जगाच्या दृष्टीने एक क्षुद्र जीव होता तो. समाजात त्याला कसलीच प्रतिष्ठा नव्हती, मोठेपणाचे दैदिप्यमान वलय नव्हते की, प्रसिद्धीच्या दिमाखाने तो न्हाऊन निघाला नव्हता. एका मोटार स्टँडवर हमाली करून जगणारा, तुम्ही द्याल तेवढ्यावर संतुष्ट राहणारा, तोंडाने काहीही न मागणारा आणि नेहमी आपल्या पायापुढे पाहून चालणारा परंतु जगाच्या खिजगणतीत नसणारा तो एक माणूस नावाचा प्राणी होता.

तो येथे केव्हा आला ते कुणासच नक्की आठवत नसेल. पण बरीच वर्षे तो या स्टँडजवळ वावरत होता. शास्त्रांचे पंख लावून जीवन पुढे भरारून गेले पण तो मात्र होता तिथेच होता. जीवनाला गती असते हे त्याला माहीत नव्हते. फक्त पॅसेंजर नेणाऱ्या मोटारीचा धुरळा हे माणसांच्या वियोगाचे चिन्ह आहे एवढेच त्याला माहीत होते.

एका कोपऱ्यात स्वस्थ बसावे, कुणा जाणाराचे सामान वर चढवावे, येणाराचे उतरून द्यावे आणि हमालीच्या दराची काहीच पर्वा न करता मिळेल ते न पाहताच खमिसाच्या खिशात टाकावे. हीच त्याची आसक्ती, एकमेव आसक्ती होती.

उन्हाळ्यात पारावरच्या दगडाची उशी करून चैनीत झोपावे ही त्याची विलासी वृत्ती वाटे त्याला, तर हिवाळ्यात स्टँडवरच्या बाकावर पसरून चिरगुटे पांघरून पडावे हे त्याचे स्वर्गसुख होते. तो अर्धवट वेडा असावा अशी सर्वांची समज झाली होती. मी तरी त्याला अपवाद कसा असणार ? कोठे जावयास निघालो की तो पुढे येई. हातातील बॅग असो वा पिशवी असो– चढवून द्यायचा आणि खाली पाहत उभा असायचा गाडीच्या दारासमोर. समोर नाणे धरले की पापणी वर उचलून न पाहता तो ते स्वीकारी तेव्हा मात्र वाटे हा माणूस पैशाविषयी इतका उदासीन कसा ? मी त्याला कधीच त्याचे उत्तर विचारले नाही.

तसा अंगापिडाने तो मजबूत होता पण त्या शक्तीचा उपयोग कुणाला त्रास देण्यात झाला नव्हता. अशीच एक ऊष्ण दुपार होती. अंगातून घामाच्या धारा चालल्या होत्या. दादा कुठेतरी निघाले होते. त्यांची गडबड उडाली होती. पिशवी सावरीत ते स्टँडकडे धावले. राघू उभा होता. त्याच्या हातात पिशवी देऊन ते गाडीत चढले. गाडी सुटायला अवधी होता. पाच पैशाचे नाणे त्याच्या हातात देऊन ते पिशवीत काहीतरी शोधू लागले. पण सापडेना–

" राघू– "

राघू समोर उभा राहिला. नजर पायांकडेच होती–

" यातील चंची काय झाली ? पैसे ठेवले होते तिच्यात– "

" देवाला माहीत. " राघू म्हणाला. दादांनी विचार केला नाही. राघूच्या तोंडात चपराक लावून ते त्याच्यावर शिव्यांची लाखोली वाहू लागले. राघूने कधी नव्हे ते आज नजर उचलून वर पाहिले. त्याच्या स्निग्ध शांत नजरेत केविलवाणा भाव तरळत होता. सर्व त्याच्या निष्पाप चेहऱ्याकडे पाहत होते. पण प्रत्येकाचा उद्देश बेगळा होता. कुणीतरी त्याच्यावर लफंगेपणाचा आरोप केला.

" लफंगाच दिसतो. " एक.

" तर काय– खाली मुंडी आणि पाताळधुंडी–" दुसरा.

' अहो, अवतार पाहा ना कसा आणला स्थितप्रज्ञाचा ! जणू या महात्म्याला पसा विषासारखा वाटतो. "

मी प्रत्येकाकडे पाहिले आणि मलाही वाटले, याला आजच अवदसा आठवली.

" राघू, " मी म्हटले, " चंची घेतली असलीस तर देऊन टाक. "

त्याने एकवार नजर उचलून मजकडे पाहिले. ते भावपूर्ण डोळे जणू माझ्या काळजात आपली विशुद्ध दृष्टी खुपशीत म्हणत होते की, माणसाची पारख अशी करतात का ? वेडा आहेस रे वेडा !

मला तो निष्पाप नि निर्दोष वाटला. पण दादांनी त्याच्या गालावर आणखी एक सणसणीत चपराक लगावली. मी मात्र उगाच सहानुभूतीच्या दृष्टीने त्याच्या केविलवाण्या मुखाकडे पाहत होतो.

खिन्नतेचा भाव न लपविता त्याने माझ्याकडे पाहिले आणि मग न राहवून मी दादांना म्हटले, " घरी राहिली असेल चंची नाहीतर वाटेत पडली असेल–मिळेल;"

पण दादांनी दुर्लक्षच केले माझ्याकडे. दुखावलेल्या मनाचा राघू पायरीवर बसला, गाडी निघून गेली. धुरळा उडाला आणि सगळीकडे पसरला. खिन्नतेचे दोन अश्रू गाळीत त्याने ओंजळीत चेहरा दडविला आणि मीही उदासपणे घराकडे परतलो. चंची ओटीवरच पडलेली होती. मी ती आईच्या पुढे धरून म्हटले, " पाहिलंस, दादा इथंच विसरले आणि बिचाऱ्या राघूची पारख केली दादांनी. "

" गरीब जीव. " आई म्हणाली.

मी नेहमीसारखा पुस्तकात गुरफटलो आणि दिवस संपला.

श्रावण–भाद्रपदाचे ऊन सोनेरी वैभवाने न्हालेले होते. दिवस सोन्याच्या वर्खात डुबायचा आणि रात्र आल्हाददायक वाऱ्यांनी हसायची.

आम्ही स्टँडवर जमलो होतो. दादांच्या म्हणण्याला मान देऊन विश्वनाथ काका चार दिवसांकरिता आले होते. त्यांना निरोप द्यायला सर्वजण स्टँडवर आलो होतो. स्टेशनकडून येणारी गाडी चिखल उडवीत आली आणि पुढे गेली. चिमुरडी मंजू ते पाहून खूप हसली– " अय्या, किती छान पिचकारी– आणि चाकाची नक्षी तरी कित्ती कित्ती छान आहे. " ती त्या ओल्या मातीमधील चाकाची नक्षी पाहत

होती आणि इतक्यात सर्र्रकन् एक ट्रक वेगानं आला. डोळयाची पापणी लवते न लवते तो एकदम ट्रक मंजूच्या जवळ पोचला. मला ओरडण्याचेही भान राहिले नाही.

दादा कल्पनेनेच बेशुद्ध झाले आणि ते शुद्धीवर आले तेव्हा त्यांनी विचारले–

" मंजूचं काय झालं ? "

" ती चांगली आहे. "

" वाचली ? "

" होय– "

" देव दयाळू आहे– त्यानेच वाचवले तिला– " दादांच्या डोळयात अश्रू तरारून आले होते. त्यांचा कंठ भरून आला होता.

" होय, देव दयाळू आहे–दादा, " मी म्हटले, " पण मंजूला वाचविणाऱ्या राघूवर अन्याय केला त्याने– "

" म्हणजे ? " दादांनी अधीरतेने विचारले.

" पाहा पाहा–ते रक्ताचे थारोळे पाहा– " मी म्हटले.

दादांनी पाहिले आणि त्यांच्या तोंडून शब्द फुटला नाही–

मंजूला वाचविण्यासाठी राघूने आपला प्राण धोक्यात घातला होता–आणि त्याचा देह वेडावाकडा त्या रक्तात पडला होता.

आज मला ते सारे आठवले आणि मी त्याच्या बँडेजमध्ये बांधलेल्या हाताकडे पाहिले. नंतर प्लॅस्टर केलेल्या दोन्ही पायांवर हात फिरवीत म्हटले,

" राघू, तू बरा होशील. "

" नशिबात असेल तर– " तो म्हणाला.

" परमेश्वर तुझ्या थोर कृत्याची दखल जरूर घेईल. "

" आणि नाही घेतली तर–पण जाऊ द्या. तुमची पोर वाचली ना ? हेच पुष्कळ झालं– माझ्या जिवाचं काहीही झालं तरी माझं कोण आहे रडणारं– दादा, तुम्ही फार हळवे आहात– डोळयांत पाणी नाही आणायचं असं– "

आपल्या कर्तव्यात कसूर न करणारा तो वेडा हे म्हणत होता आणि जग शहाणं होतं– उघडया डोळयांनी पाहून अलिप्त राहणारं– स्वार्थासाठी तोंडपुजा करणारं. पण राघू जगावेगळा होता.

मी विचारले, " राघू, तू कुठून आलास रे ? "

" ते कशाला सांगायचं– आलो झालं– "

" तुझे आईबाप ? "

" मरून गेले– भावांनी घराबाहेर काढलं. ते म्हणाले तू वेडा, तुझ्याने काय होणार काम ? जा भीक माग. पोटभर. "

" असं म्हणाले ? "

" होय, पण भुईला भार कशाला व्हायचं ? ज्याने चोच दिली तो

चारादेखील देतो– "

" राघू– कसं रे कळतं तुला ? "

" दादासाहेब, मी पण माणूसच आहे ना ? शिकलो सवरलो नाही फार, पण सुखदुःख मलाही कळतं– म्हणालो, जग फार मोठं आहे– मावांनी दिलं हाकलून तरी ही काळी आई फार मोठी आहे. ती सर्वांना पोसते. सर्वांना सांभाळते, आधार देते, म्हटलं, मलाही दूर ढकलायची नाही– दानत मात्र हवी– "

" पण राघू, आठवतंय तुला तुझी ही दशा व्हायला कोण कारण झालं ? मंजूला तू वाचवलंस– पण मंजूला वाचवताना तुला तो मागचा प्रसंग नाही आठवला ? दादांनी तुझी शोभा केली तो प्रसंग ? "

खिन्नतेची अभ्रे आल्याने मलूल झालेला चेहरा बाजूस वळवीत तो म्हणाला, " आठवला, पण सूडासाठी नव्हे, माझंच चुकलं होतं. चंची मी हरवली नसती तर ?"

" पण ती तू हरवलीसच नव्हतीस. "

" नसेना का ? पण त्या गेलेल्या चंचीची भरपाई करायची होती मला. पण दादासाहेब मी पडलो गरीब– पण देव दयाळू आहे. त्याने कलंक धुवून काढला–"

" वेड्या चंची तेव्हाच सापडली, न लागलेला कलंक तू रक्तानं धुतलास, " मी व्यथित होऊन म्हटले.

" होय– दादासाहेब. अंगावरचा डाग पाण्याने धुऊन जातो, मनावरचा आसवांनी धुतला जातो. पण माझ्यासारख्या भिकारड्याचे आसू कुठं असतात तेवढे किंमती– म्हणून रक्ताने धुवावे लागलेत निंदेचे डाग– " तो म्हणाला आणि मी त्याच्या थोर मनाचे कौतुक करीत हॉस्पिटलमधून माघारी वळलो.

दादा घरातच होते– त्यांनी विचारले–

" कसा काय आहे तो ?–"

" ठीक आहे. पण– "

" जगेलसे वाटत नाही, होय ना ? "

मी काहीच बोललो नाही– चेहरा सर्व काही सांगतच होता.

" ठीक आहे, " दादा म्हणाले, " जगला तर आहेच स्टँड पण गेला तर हक्कानं मूठमाती मिळेल त्याला. "

" दादा, अभद्र काय बोलता ? मंजूला वाचवलंय त्यानं– "

" ती तिच्या नशिबानं वाचली वेड्या, अरे कोण कुणाला वाचवणार ? तो प्रभू सर्वांना तारतो आणि मारतो. त्या वेड्यानं वाचवलं असं म्हणतोस ? अरे, ज्याला स्वतःला स्वतःचा जीव जगवता येत नाही तो दुसऱ्याला काय वाचविणार ? तिची दोरी मजबूत. आपलं नशीब मोठं– "

दादांच्या पुढं काय बोलावं हेच मला समजेना. हेकेखोर माणसं आपला हेका प्राण गेला तरी सोडणार नाहीत.

पण एक मात्र खरं– दादांच्याबद्दल मला फार आदर वाटे, त्यांच्याबद्दलच्या अभिमानाने माझा ऊर भरून येई नेहमी. परंतु हे शब्द ऐकताच माझ्या श्रद्धेला तडा गेला. स्वाभिमानाची काच कुठेतरी तडकली आणि मन म्हणू लागले, माणूस स्वार्थी आहे, अविचारी आहे पण त्याला दानत हवी– जी दानत राघूसारख्या कंगाल माणसाला आहे ती दानत दादांनी का विसरावी ?

त्यांच्याबद्दलचे कडवट विचार प्रथमच माझ्या मनात येऊ लागले. त्यांच्या उद्गारांचा परिणाम म्हणून तुच्छतेची एक रेषा माझ्या गालावर उमटली. माणसाची मनोवृत्ती किती क्षुद्र असते हे आज कळले मला. बऱ्यावाईट गोष्टींचा परिणाम माणसाच्या व्यक्तिमत्त्वावर होतो म्हणतात. चेहरा ते जगासमोर जाहीर करतो. पण राघूला क्षुद्र प्राणी म्हणणारे सारे किती क्षुद्र जंतू होते ते आज कळले मला.

मी दिवसभर भटक भटक भटकलो. रात्र होताच घराकडे परतलो, चांदणेही उदास वाटत होते.

मी चार घास घशात कोंबले आणि खाटेवर आडवा झालो. मध्यरात्रीपर्यंत डोळा लागला नाही माझा., पहाटेच्या गार वाऱ्यात झोप लागली ते कळले नाही. पण भयंकर स्वप्नाने झोप उडाली. उठून बिछान्यावर बसलो. राघूचे दोन केविलवाणे पण निरागस डोळे माझ्याशी बोलू लागले. ते जणु करुणेच्या पलीकडे पोचलेले होते.

मी मनाशी म्हटले, " परमेश्वरा, जगानं वेडा म्हटलेल्या या माणसाला तू काहीच दिलं नाहीस. त्याच्यासाठी अश्रू ढाळणारे कुणी मायेचे माणूसदेखील दिले नाहीस. त्याच्या छोट्या जीवनातील महान क्षण ओळखण्याची प्रेरणाही तू दिली नाहीस कुणाला–पण आज त्याला तू वाचव. "

पहाट सरली आणि सारे कामाला लागले. मी उठून बाहेर आलो. दादा कुणाला तरी पैसे देत होते. मी त्यांच्या डोळ्याला डोळा देऊन पाहिले. त्यांची नजर खाली झुकली–

" राघू गेला–" ते म्हणाले, " कर्तव्य म्हणून क्रियाकर्म केले पाहिजे–" मी ते शब्द ऐकले. पण त्या शब्दांत नव्हता ओलावा की नव्हती स्निग्धता. होता खोटा अहंकार– तुच्छता !

मी मनाशी म्हटले, " परमेश्वरा, तू त्याचा महान अपराधी आहेस. त्याच्यासाठी रडणारे कुणी ठेवले नाहीस त्याला, पण माझ्यासारखा प्रार्थना करणारा लाभला तर ती प्रार्थनाही तू ऐकली नाहीस–या जगाबरोबरच तूसुद्धा प्रतारणा केलीस त्याची– त्याच्या जीवनाच्या अंतसमयी ही प्रतारणा करून काय मिळालं तुला ? "

O

## पुस्तके

**वलय**

**व**

**मी, माझी सौ.**

**आणि**

**तिचा प्रियकर**

'वलय' आणि 'मी, माझी सौ., आणि तिचा प्रियकर.' व. पु. काळे यांचे हे दोन नवे कथा-संग्रह. पहिला गंभीर आणि कथा-प्रधान कथांचा आणि दुसरा संपूर्ण-पणे विनोदी नसला तरी ज्याला हलक्या – फुलक्या, चटकदार, खुसखुशीत म्हणता येतील अशा कथांचा.

काळे यांच्या कथालेखनातील एक वैशिष्टच असे आहे की त्यांच्या कथांचे विषय नेहमीचेच, झिजलेल्या नाण्यांप्रमाणे किंवा नित्यपरिचयाचे नसतात. क्वचित हे विषय नित्यपरिचित वाटले तरी ज्या विशिष्ट मुद्यावर त्यांची कथा लक्ष ठेवून असते तो मुद्दा नवीनच असतो. मात्र त्यांच्या कथेची मांडणी आणि तिचे सारे निवेदन जुन्या वळणाचे असल्यामुळे हे नवे आणि अपरिचित विषय त्यांच्या कथेत उठावदार होत नाहीत! एखाद्या सुंदर, भरदार अंगाच्या स्त्रीने स्नो–पावडर आणि नवीन केशभूषा करून ओठांना लिप्स्टिक लावून ते रंगवावेत आणि पातळ मात्र नऊवारी पैठणीवजा नेसून नाकात नथ घालून बाहेर पडावे तसे काहीतरी व. पु. काळे यांच्या कथेचे होते.

वास्तविक त्यांच्या 'नरमादी' या कथेचा विषय अगदी नवीन नसला तरी व्यवहार आणि मानसशास्त्र यांच्या परिघात कथावस्तूचा लंबक फिरत आहे. जीव-नाचा खोलवर वेध घेण्याची खूप मोठी संधी या कथावस्तूमध्ये निश्चित आहे. या कथेचे थोडक्यात कथानक असे सांगता येईल.

खरे नावाचे, फार मोठी प्रॅक्टिस असलेले एक नामवंत वकील. गोखले नावाचे एक गृहस्थ. खरे यांची पत्नी आणि गोखले यांचा भाऊ. गोखल्यांचा भाऊ आणि खऱ्यांची पत्नी यांचे अनैतिक संबंध आहेत. पत्नी अतिशय सुरेख मुलायम आवाज, सुडौल बांधा आणि अद्ययावत राहणी असलेली. परंतु आपल्या नवऱ्यावर तिचं प्रेम नाही, तर मिस्टर गोखले यांच्या भावावर आहे. अर्थात गोखले यांना ते सहन होत नाही. आणि वकील साहेबांना त्यांच्या बायकोबद्दल चार उपदेशाचे शब्द सांगण्या-साठी गोखलेसाहेब त्यांच्याकडे जातात.

वि. शं. पारगावकर

# खुसखुशीत शैलीचे दोन कथासंग्रह

कथानकाची सुरुवात येथूनच होते. ही सुरुवातच किती नीरस आणि तात्त्विक झाली आहे पाहा :

" 'शहाण्या माणसानं कोर्टाची पायरी चढू नये' म्हणतात; पण वकिलाच्या घरची पायरी चढायला काहीच हरकत नाही. वकिलाकडेही जाऊ नये असं सांगितल्याचा दाखला काही गोखल्यांना मिळाला नव्हता !"

ज्या गोखल्यांना खरे यांच्या पत्नीचे संबंध आपल्या भावाशी आहेत याविषयी चीड आलेली आहे. आणि त्याच एका तिरीमिरीत खरे वकिलांची शिकार करण्यासाठी ते निघाले आहेत, त्या गोखले यांचे कथेतील आगमन असे हे बिळबिळीत सुरुवातीने होते.

त्यानंतर गोखले आणि खरे यांच्यातील संवाद लेखकाने दिले आहेत. त्यातील संवादही कसे तात्त्विक पातळीवर जातात हे पाहू. खाली खरे यांच्या तोंडचे एक वाक्य देतो :

"मग तुम्हांला 'सौख्य' हा शब्दच समजला नाही. 'अर्पणभाव' ह्या प्रकाराची साधी तोंडओळखही झालेली नाही तुमची. 'सौख्य' ही एकच चीज अशी आहे की जगात की जी फक्त दिल्यानेच मिळविता येते."

आता या वाक्याची घडण पाहिली तर आपल्या सहज लक्षात येईल की असे संवाद 'सॉक्रेटिस'च्या संवादाजवळ कुठे तरी जाऊन बसणारे आहेत. खरे आणि गोखले या दोन व्यक्तींच्या घरात जो एक अत्यंत नाजूक प्रश्न निर्माण झालेला आहे, त्या प्रश्नाला तोंड फुटत असताना तात्त्विकतेपेक्षा नाट्यमयता आणि संग्राम (शास्त्रयुक्त नव्हे) या पातळीवर कुठे तरी या दोन व्यक्ती भिडलेल्या असतील आणि त्यांच्या संवादांतून जीवनातील कितीतरी स्फोटक जागा, मती कुंठित करणारे प्रसंग, व्यवहार आणि वस्तुस्थिती, आदर्श आणि प्रत्यक्ष घटना, नीती आणि माणसांचे प्रत्यक्ष जीवन यासारख्या विविध पातळ्यांवरून ही कथा आपले समग्र दर्शन घडवील असे वाटले होते. व. पु. काळे यांनी एकच एक सरधोपट मार्ग स्वीकारून कथा शेवटास नेली आहे.

मात्र हा विषय मुळातच स्फोटक आणि वेधक असल्यामुळे पहिले यश ही कथा सहज मिळवून जाते. परंतु तिला तिच्या कथावस्तूला साजेसे वजन प्राप्त करून देण्याच्या कामी मात्र लेखकाला तितकेसे यश मिळविता आलेले नाही, याची जाणीव झाल्याशिवाय राहत नाही.

'स्वप्नवेडी' या कथेचे मात्र तसे नाही. इथेही विषय नाजूक आणि अगदी वेगळ्या पातळीवरून हाताळला जावा अशा स्वरूपाचाच आहे. अर्थात श्री. काळे यांनी या विषयाला उत्तम रूप दिलेले आहे.

आशा-निराशा, प्रेम, हुरहूर, आशंका आणि उत्कंठा या विविध पातळ्यांवरून मृणालिनी देवधर या मुलीचे व्यक्तिचित्र श्री. काळे यांनी अतिशय वेधक रंगविलेले आहे. त्यासाठी त्यांनी जे नाजूक रंग वापरले आहेत, त्या रंगांसाठी केलेली शब्द-योजना आणि शैलीही नेमकी आणि प्रसन्न आहे. ही कथा उभी करण्यासाठी लेख-काने योजिलेले प्रसंगदेखील तितकेच हळुवार आणि इंद्रधनुष्यासारखे विविधतेतून एकता साधणारे असे वठलेले आहेत.

'दिशाभूल' ही कथादेखील अशीच एक चांगली कथा आहे. या कथेतील विषयही असाच व्यवहार, नाते आणि प्रेमसंबंध यांच्या गुंतागुंतीवर आधारलेला आहे. विसुकाका नावाच्या एका कलंदर वृत्तीच्या मुक्त पण अंतर्याम प्रेमाच्या धाग्यांनी विणलेल्या अशा व्यक्तीची ही कथा आहे. एका मित्राला तो जीवनातील आपले सारसर्वस्व समजतो आणि त्या मित्राच्या मुलाला आपलाच मुलगा मानतो. एकुलती एक मुलगी संयोगिता हिच्या लग्नानंतर सारी इस्टेट तो या मित्राच्या मुलालाच देणार असतो. संयोगिताचे लग्न जमते आणि दोन हजारांची गरज घेऊन विसुकाका या आपल्या मित्राकडे येतो. परंतु हा मित्र या दोन हजार रुपयांच्या गरजेकडे अगदी व्यावहारिक भूमिकेवरून बघतो. विसुकाकाला हे आवडत नाही आणि त्याच्या मनाला त्याचा जबरदस्त धक्का बसतो. तो या मित्राजवळून पैसे घेत नाही. मुलीचे लग्न उरकते. आणि विसुकाका हृदयविकाराच्या झटक्याने कालवश होतो.

शेवटी त्यांनी मृत्युपत्र केलेले असते. त्यात आपली जिंदगी या मित्राच्या मुलाच्या नावानेच केलेली असते. आणि पत्रात या मुलाला लिहिलेले असते, 'संयोगितेला आई-वडील नाहीत पण (तुझ्या रूपाने) तिला माहेर आहे, असे मी समजतो.'

ही कथा मुळातच वाचून पाहण्यासारखी आहे.

व. पु. काळे यांचा दुसरा कथासंग्रह 'मी, माझी सौ., आणि तिचा प्रियकर.' कथासंग्रहाचे नाव आणि मुखपृष्ठावरील श्री. शि. द. फडणीस यांचे चित्र पाहता हा विनोदी कथांचा संग्रह असावा अशी कल्पना साहजिकच होते. परंतु यातील कथा क्वचितच विनोदी आहेत. वर सुरुवातीलाच मी म्हटले त्याप्रमाणे विनोदी नाही. तरी खुसखुशीत, चटकदार आणि हलक्या फुलक्या कथांचा हा संग्रह आहे.

या संग्रहातील पहिलीच कथा 'मांजर' या नावाची. तिची सुरुवात छोट्या मुलाच्या पत्राने होते. (हे पत्र विनोदी नसले तरी विनोद निर्माण करणारे आहे.) तसेच तिचा शेवटही विनोदी आहे. परंतु फारसा यशस्वी झालेला नाही. याचे एक कारण शब्दयोजनेच्या कसबाकडे दुर्लक्ष हे तर आहेच पण अशा शेवटाची एक कथा मराठीतील एका नामवंत विनोदी लेखकाने लिहिलेली आहे. त्या कथेच्या शेवटी असेच खूप 'पाटेवरवंटे' येतात. कोणी आणून देतो, कोणी पाठवून देतो तर कोणी 'त्वरित पाठवीत आहे' असे पत्र पाठविलेले असते. याला एका पाट्यावरवंट्याची जरूरी असते आणि अनेक दिवसांपासून त्याने ती आपल्या मित्रांजवळ, आप्तांजवळ व्यक्त केलेली असते. शेवटी त्यांच्यावर विसंबून हा कंटाळलेला असतो आणि स्वत:च मिळेल तसा पाटावरवंटा घेऊन येण्यासाठी घराबाहेर पडलेला असतो. तो पाटावरवंटा घेऊन घरी येतो तेव्हा अनेक पाट्यावरवंट्यांच्या राशी घरात समोर त्याला दिसतात !

'मांजर' कथेचा तोंडवळा तसाच थोडासा वाटतो. मात्र या संग्रहातील बुमरँग, फिरते पंखे, त्याची भूमिका, इत्यादी कथा वाचनीय आहेत.


व. पु. काळे यांची शैली प्रसन्न आहे. त्यांची भाषा सोपी, ओघवती आणि खेळकर आहे आणि त्यांच्या कथेला काहीतरी नवीन शोधण्याचे वेड आहे हेच तिचे वैशिष्टय. □

वलय : (कथासंग्रह) :
व. पु. काळे
पृष्ठे : १८६ : किं. ५ रुपये
भारतीय ग्रंथ भवन, दादर : मुंबई-१४.

मी, माझी सौ., आणि तिचा प्रियकर :
व. पु. काळे
पृष्ठे : १२६ : किं. ४ रुपये
अद्रीश प्रकाशन मुंबई-५९

आमच्याकडे येणाऱ्या कवितांची संख्या भरपूर आहे. त्यामुळे त्या संबंधीचा पत्रव्यवहार ज्या वेगाने हवा तसा होऊ शकत नाही. त्यातून डिसेंबर १९६८ पर्यंतच्या कवितांची निवड पूर्ण झाली असल्याने या पुढील कवितांची दखल घेणे, किंवा त्यासंबंधीचा पत्रव्यवहार करणे जवळ जवळ अशक्यच आहे. तसेच 'माणूस'कडे पाठवलेल्या लेखासोबत पुरेसे टपाल हशील जोडावे. —संपादक

# पुन्हा सांगतो, आता क्रांतीला




वि. स. वाळिंबे

नोव्हेंबर उजाडला आणि पेट्रोग्राडला थंडीचा कडाका जाणवू लागला. बाल्टिकवरून येणारे थंड वारे मधूनमधून पावसाचा शिडकावा करून जात. परंतु हिमवृष्टीला सुरुवात झाली नसल्यामुळे नागरिकांचे नित्याचे व्यवहार सुखाने चालू होते. नेव्हस्की प्रॉस्पेक्टवरच्या स्मोल्नी इन्स्टिटयूटच्या इमारतीत कोणता बेत शिजत आहे, याची सर्व-सामान्य नागरिकला मुळीच कल्पना नव्हती. नेव्हा नदीच्या तीरावर उभी असलेली ही तीन मजली इमारत गेली कित्येक वर्षे स्मोल्नी कॉन्व्हेंट म्हणून प्रसिद्ध होती. अमीर-उमरावांच्या मुलीं-साठी तेथे एक शाळा होती. गेल्या फेब्रु-वारीत जी क्रांती झाली तेव्हापासून डाव्या पक्षांनी आपल्या कचेऱ्या या इमारतीत थाटल्या होत्या. शाळेतील वर्गांच्या पाटयांऐवजी पक्षांच्या पाटया तेथे झळकत होत्या. बोल्शेव्हिकांनी हळूहळू सोशिलिस्ट रेव्होल्युशनरी, मेन्शे-व्हिक, अराजकवादी आदी पक्षांची हकालपट्टी करून ती इमारत आपल्या कबजात घेतली होती. उठावाची तयारी नीट करता यावी म्हणून ट्रॉटस्कीने गेल्या महिन्यापासून आपल्या लष्करी क्रांतिकारक समितीचे कामकाज स्मोल्नी-

# उशीर म्हणजे मृत्यूला निमंत्रण.

मध्येच सुरू केले होते. नेव्हस्की प्रॉस्पेक्टवर हिंडणारे नागरिक सहज या इमारतीकडे नजर टाकीत. परंतु अल्पावधीतच साऱ्या रशियाला व्यापून टाकणाऱ्या क्रांतीचे इंधन येथे खदखदत आहे याची कोणालाच कल्पना नव्हती.

बोल्शेव्हिकांनी उठाव करण्याची तयारी पुरी करीत आणली आहे हे प्रधानमंत्री केरेन्स्कीला ५ नोव्हेंबरच्या रात्री कळले. ताबडतोब त्याने त्सारस्कोये सेला येथील पायदळाला राजधानीकडे येण्याचा हुकूम धाडला. पाव्हलोव्ह येथील तोफदळालाही पेट्रोग्राडकडे कूच करण्याचा इशारा देण्यात आला. नेव्हा नदीत उभी असलेली 'आरोरा' युद्धनौकाही हल्ल्याच्या पवित्र्यात सिद्ध झाली. केवळ लष्करी तयारी करूनच केरेन्स्की स्वस्थ बसला नाही. त्याने स्मोल्नीचे टेलिफोन दळणवळण तोडून टाकले. ' राबोची पुट ' या बोल्शेव्हिक वृत्तपत्रावर बंदी घालण्यात आली. ६ नोव्हेंबरच्या सकाळी साडेपाचच्या सुमारास लष्कराने ' राबोची पुट 'च्या कचेरीत प्रवेश करून त्या पत्राच्या आठ हजार प्रती जाळून टाकल्या. त्यानंतर तेथली सारी मालमत्ता ताब्यात घेऊन कचेरीला मोहोर ठोकली.

ट्रॉटस्की सकाळी सात वाजण्याच्या सुमारास उठला तेव्हा स्मोल्नीचा टेलिफोन तोडून टाकण्यात आल्याचे त्याला आढळून आले. ' रात्रीची पुट'च्या कचेरीला लष्कराने कुलूप लावल्याची बातमीही त्याला कळली. केरेन्स्की सरकारच्या या दडपशाहीची वार्ता कामगारवर्गांत पोचविण्यासाठी ट्रॉटस्कीने मोटार सायकलस्वारांचे पथक निरनिराळ्या ठिकाणी धाडले.

एवढ्यात ' राबोची पुट 'मध्ये काम करणारी एक तरुणी स्मोल्नीमध्ये येऊन ट्रॉटस्कीला सांगू लागली, ' आपल्या कचेरीला मेणाची मोहोर लावण्यात आलेली मी पाहिली आहे. आपल्याला ती सहज दूर करता येईल. '

२४

एका अनोळखी तरुणीने एवढे धाडस करण्याची तयारी दाखवावी हे पाहून ट्रॉटस्कीला आश्चर्य वाटले. परंतु उठावासाठी तोही अशाच एखाद्या संधीची वाट पाहत होता. ट्रॉटस्की म्हणाला, ' ठीक आहे. आपण ती मोहोर तोडू या. कारण आपल्या पत्राचे प्रकाशन बंद पडता कामा नये. '

'राबोची पुट 'च्या कचेरीभोवती लष्कराचा पहारा असल्यामुळे मोहोर तोडायची कशी हा एक प्रश्नच होता. ती तरुणी म्हणाली, 'तुम्ही आमच्या मदतीला लाल-पथकातले काही सैनिक दिलेत तर आम्ही हे कार्य करून दाखवू.'

ट्रॉटस्कीने क्रांतिकारक समितीच्या लिथुआनियन रेजिमेंटला 'राबोची पुट '-भोवती वेढा घालण्याचा हुकूम दिला. इतकेच नव्हे तर लष्करी क्रांतिकारक समितीच्या वतीने ट्रॉटस्कीने पहिली घोषणा केली– 'क्रांतिकारकांच्या सर्व वृत्तपत्रांचे छापखाने उघडे असले पाहिजेत.' यानंतर एकामागून एक असे अनेक हुकूम काढून ट्रॉटस्की आपल्या क्रांतिकारक समितीच्या सामर्थ्याचा अंदाज घेत होता. ६ नोव्हेंबरला सकाळी दहा वाजता त्याने जाहीर केले– 'जनतेच्या शत्रूने काल रात्रीपासून दडपशाहीला प्रारंभ केला असून आता या शत्रूची गय करायची नाही, असा आमच्या लष्करी क्रांतिकारक समितीचा निर्धार आहे.'

'एका अज्ञात तरुणीच्या आग्रहानुसार लहानशी मेणाची मोहोर तोडून रशियन राज्यक्रांतीला प्रारंभ झाला,' असे ट्रॉटस्की नंतर गमतीने म्हणत असे.

आतापर्यंत स्मोल्नी भोवती पहाऱ्याची जरूरी आहे याची ट्रॉटस्कीला कल्पनाच आली नाही. परंतु 'राबोची पुट' भोवती लाल पथकाचा पहारा सुरू करण्यात आल्यानंतर स्वतःच्या कचेरीभोवतीही बंदोबस्त ठेवणे त्याला आवश्यक वाटू लागले. स्मोल्नीभोवती बंदुकधारी शिपायांची तुकडी गस्त घालू लागताच या इमारतीला क्रांतिकारकांच्या किल्ल्याचे स्वरूप प्राप्त झाले.

लाल पथकाला सज्ज राहण्याचा आदेश देण्यात आल्यानंतर पुढचा कार्यक्रम निश्चित करणे आवश्यक होते. त्यासाठी बोल्शेव्हिक पक्षाच्या मध्यवर्ती समितीची बैठक बोलवण्यात आली. या बैठकीला लेनिन, स्टॅलिन आणि झिनोव्हेव हे तिघेजण हजर नव्हते. त्यांपैकी, ताबडतोब उठाव करण्यास झिनोव्हेवचा विरोध असल्यामुळे त्याला आमंत्रणच धाडण्यात आले नव्हते. स्टॅलिन 'राबोची पुट' चा संपादक असल्यामुळे तो त्या पत्राच्याच गडबडीत होता. व्हायबर्ग येथे अज्ञातवासात राहत असलेल्या लेनिनला येथे बोलवणे त्याच्या दृष्टीने धोक्याचे ठरणार असल्यामुळे त्याला या बैठकीची बातमी कळविण्यात आली नव्हती.

बैठकीचे अध्यक्षस्थान जरी स्वेर्डलोव्हने स्वीकारले होते तरी ट्रॉटस्की हाच खरा सूत्रचालक होता. कोणी काय करायचे याची वाटणी तोच करीत होता. ट्रॉटस्की म्हणाला, 'आता आपण राज्ययंत्र ताब्यात घेण्याचं ठरविलं असून त्या दृष्टीनं कामाला लागलं पाहिजे.' त्यानंतर कोणी कोणती व्यवस्था पाहायची याची यादी त्याने वाचून दाखविली– टपाल-तारखाते– झोर्झिन्स्की, लोहमार्ग–बुबनोव्ह, मॉस्कोबरोबचा संपर्क– नोगिन आणि लोमोव्ह, अन्नधान्यपुरवठा– मिलुउरिन, केरेन्स्की, सरकारवर पाळत–स्वेर्डलोव्ह, सोशॅलिस्ट रेव्होल्युशनरी पक्षातील डाव्या सदस्यांची

मदत मिळविण्याचा प्रयत्न– कामेनेव्ह आणि बेझिन. हीं कामाची वाटणी केल्यानंतर उठावाचे नेतृत्व आपण स्वत: करणार असल्याचे ट्रॉटस्कीने सांगितले.

या बैठकीत असेही ठरले की, जर आपल्याला स्मोल्नी इन्स्टिटयूटची इमारत सोडून बाहेर पडावे लागले तर क्रांतिसेनेची कचेरी पीटर आणि पॉल किल्ल्यांत हलविण्यात यावी. तेथील सैन्य नुकतेच क्रांतिकारकांना येऊन मिळाले असल्यामुळे हा किल्ला बचावाच्या दृष्टीने सोयीचा ठरणार होता. हा किल्लाही आपल्याला झुंजवता आला नाही तर 'आरोरा' युद्धनौकेतील बरेचसे नौसैनिक क्रांतीला अनुकूल असल्यामुळे आपण त्या नौकेवर जाऊन उठावाचे मार्गदर्शन करावे. परंतु हिंमत सोडू नये असे कामेनेव्हने सुचविले.

स्मोल्नीला आता एखाद्या युद्धकचेरीचे स्वरूप प्राप्त झाले होते.

बोल्शेव्हिकांच्या उठावाचा बीमोड करण्यासाठी कोणते उपाय योजावेत याचा विचार करण्यासाठी केरेन्स्कीने सकाळी दहा वाजता विंटर पॅलेसमध्ये मंत्रिमंडळाची बैठक बोलाविली. दोन तास निरनिराळ्या उपायांवर चर्चा होत होती. ही बैठक आटोपून केरेन्स्की विंटर पॅलेसनजीकच्या मेरिन्स्की पॅलेसमध्ये गेला. या प्रासादाच्या भव्य सभागृहात ड्युमाच्या बैठकी भरत असत. तेथे केरेन्स्कीच्या हंगामी सरकारचे पाठीराखे जमले होते. त्यांच्यापुढे बोलताना केरेन्स्की म्हणाला, 'घटना समितीचे अधिवेशन सुरू व्हायला अवघ्या तीन आठवड्यांचा अवधी राहिलेला असताना बोल्शेव्हिकांनी आज सकाळपासून हंगामी सरकारविरुद्ध सशस्त्र उठाव सुरू केलेला आहे. रशियाच्या वतीने बोलण्याचा केवळ घटना समितीलाच अधिकार आहे असे माझे सरकार मानते. घटना समितीचे अधिवेशन सुरू होण्यापूर्वी रशियात अराजक निर्माण व्हावे अशी जर्मनीची इच्छा असून शत्रूची ही इच्छा बोल्शेव्हिक पक्ष पुरी करू पाहत आहे. त्यामुळेच बोल्शेव्हिक नेते उठावाची भाषा बोलत असले तरी स्वत: मात्र लपून बसले आहेत. म्हणून या उठावाचे परिणाम अखेरीस लोकांनाच भोगावे लागणार आहेत हे सर्वांनी ध्यानात घ्यावे.'

यानंतर केरेन्स्कीने 'राबोची पुट'मधील लेनिनचा ताजा लेख वाचून दाखविला, त्या लेखातील आरोपांना उत्तरे देताना केरेन्स्की म्हणाला, 'सैन्याचे मनोधैर्य खचले आहे ही गोष्ट खरी आहे. परंतु त्याबरोबरच युद्ध लवकर संपले पाहिजे असे लेनिनलाही वाटू लागले आहे ही गोष्टही तितकीच खरी आहे. त्या दृष्टीने फ्रान्सशी वाटाघाटी करण्यासाठी मी लवकरच फ्रान्सला प्रतिनिधी धाडणार आहे. जमीन धारणेचा प्रश्न अद्याप सुटलेला नाही, हा आरोपही खरा आहे. परंतु तो प्रश्न शक्य तितक्या लवकर सोडविण्याची आम्ही खटपट करीत आहो, हेही तितकेच खरे आहे. तो प्रश्न लवकरच सुटेल अशी मी ग्वाही देतो. अशी परिस्थिती असताना विद्यमान राजवटीविरुद्ध बंड करून बोल्शेव्हिक रशियाच्या हिताशी द्रोह करीत आहेत आणि

म्हणूनच हे बंड मोडून काढण्याचा माझ्या सरकारचा निर्धार असून बंडाच्या पुढाऱ्यांना पकडण्याचे हुकूम लष्कराला देण्यात आले आहेत.'

हे भाषण संपवून केरेन्स्की खाली बसणार तोच उपप्रधानमंत्री कोनोव्हालोव्ह व्यासपीठापाशी आला आणि त्याने केरेन्स्कीला एक कागद दिला. केरेन्स्की त्या कागदावरचा मजकूर वाचण्यात गढून गेलेला असताना सभागृहात चमत्कारिक शांतता पसरली होती. केरेन्स्की म्हणाला, 'बंडखोरांनी लष्करास जे आवाहन केले आहे त्याची ही प्रत आहे. बंडखोरांनी असे म्हटले आहे की पेट्रोगाड सोव्हिएटला धोका निर्माण झाला असून आमच्या आदेशाची कार्यवाही करण्यासाठी लष्कराने सिद्ध राहावे. आमचा हुकूम जो मानणार नाही त्याच्यावर क्रांतीचा द्रोह केल्याचा आरोप ठेवण्यात येईल.'

केरेन्स्कीने क्रांतिकारकांचे हे आवाहन वाचून दाखविताच सभागृहात एकच गोंधळ उडाला. 'बंडखोरांचा बीमोड करा' अशा घोषणा करण्यात येऊ लागल्या. केरेन्स्की म्हणाला, 'मग त्यासाठी सर्व सत्ता आता मला आपल्या हाती घ्यायला हवी.' उपस्थितांनी एकमताने मागणी मंजूर केल्यानंतर केरेन्स्की क्रांतिकारकांचा बीमोड करण्याच्या प्रयत्नास लागला.

परंतु आता वेळ निघून गेली होती. क्रांतीच्या ज्वालांना आवर घालणे केरेन्स्कीच्या शक्तीबाहेरचे होते.

आरोरा युद्धनौकेवरील सैनिकाना 'आता आम्ही काय करावं' अशी ट्रॉटस्कीकडे विचारणा केली. ट्रॉटस्कीने लागलीच उत्तर धाडले, 'केरेन्स्की सरकारचे हुकूम पाळू नका. आमची लष्करी क्रांतिकारक समिती जे काही सांगेल ते ऐकण्यातच तुमचं हित आहे.' यानंतर ठिकठिकाणचे सैन्यदल अशीच ट्रॉटस्कीकडे विचारणा करू लागले. मात्र असा प्रकार सुरू झाला होता की केरेन्स्कीने एक हुकूम सोडावा आणि त्यापाठोपाठ ट्रॉटस्कीने नेमका विरुद्ध आदेश द्यावा. केरेन्स्की आणि ट्रॉटस्की हे दोघेहीजण आपापली शक्ती एकवटीत होते. आपला हा उठाव यशस्वी झालाच पाहिजे या निर्धाराने ट्रॉटस्की उभा ठाकला होता. पेट्रोगाडमधील परिस्थितीवर आपले नियंत्रण प्रस्थापित करण्यासाठी त्याची धावपळ सुरू झाली होती.

क्रांतिसाठी आसुसलेल्या लेनिनला ट्रॉटस्कीने केवढी मजल मारली आहे याची नेमकी कल्पना नव्हती. काहीतरी शिजत आहे एवढेच त्याच्या कानांवर आले होते. सकाळी फोफानोव्हाने जी वर्तमानपत्रे आणून दिली त्यांत उठावासंबंधी काहीच बातमी नव्हती. लेनिन फोफानोव्हाकडेच राहत होता. त्यामुळे तिला माहीत असलेल्या बातम्यांवरच लेनिनला विसंबून राहावे लागे. त्या दिवशी सकाळी नेहमीप्रमाणे लेनिनला वर्तमानपत्रे आणून दिल्यानंतर फोफानोव्हा आपल्या कामावर निघून गेली होती. पेट्रोग्राडभोवतालचे सर्व पूल उडवून देण्याचा केरेन्स्कीने लष्कराला हुकूम

दिल्याची बातमी तिला दुपारी चार वाजता कळली. उपनगरातल्या कामगारांनी शहरात प्रवेश करू नये म्हणूनच केरेन्स्कीने पूल उडवून देण्याचा हुकूम दिला होता. ज्या अर्थी केरेन्स्की एवढा टोकाचा उपाय योजीत आहे त्या अर्थी पेट्रोग्राडमधील परिस्थिती बरीच गंभीर झाली असली पाहिजे हे फोफानोव्हाने ताडले. हे सारे लेनिनला कळविण्यासाठी ती लगबगीने कचेरीबाहेर पडली. मिळेल ती बस पकडून आपल्या खोलीवर परतणे तिला आवश्यक होते. परंतु काही पूल पाडण्याचे काम सुरू झाले असल्यामुळे बस वाहतूकही विस्कळीत झाली होती. नेमके काय घडत आहे हे जाणून घेण्यासाठी ती जवळच्या पक्ष कचेरीत गेली. परंतु तेथील कार्यकर्त्यांना तिच्यापेक्षा अधिक काहीच माहिती नव्हती. फोफानोव्हाने बस पकडली आणि घरी परतताच तिने जे काही ऐकायला व पाहावयाला मिळाले ते लेनिनला कथन केले.

लेनिनने उतावीळपणाने विचारले, 'अजून किती पूल शाबूत आहेत!'

'मला नेमकं माहीत नाही.'

'तू पुन्हा बाहेर जा आणि सगळी माहिती मिळव. सगळ पूल उद्‌ध्वस्त होण्याच्या आत आपल्याला उठाव केला पाहिजे. कारण एकदा का हे पूल पाडण्यात आले की केरेन्स्कीला पेट्रोग्राड झुंजविण्यासाठी बरीच सवड मिळणार आहे. आणि मला नेमकं तेच नको आहे.'

ट्रॉटस्कीच्या पथकांनी दहा पूल ताब्यात घेतले आहेत हे लेनिनला अद्याप कळले नव्हते.

फोफानोव्हा बाहेर पडल्यानंतर लेनिन आपल्या सहकाऱ्यांना उठावाचा आदेश देणारे आवाहन लिहू लागला. फोफानोव्हा परतली तेव्हा रात्रीचे नऊ वाजले होते. ट्रॉटस्कीच्या लष्करी क्रांतिकारक समितीने आज सकाळपासून केरेन्स्कीविरुद्ध उठाव सुरू केला असून दहा पुलांवर लाल सैनिक पहारा करीत आहेत, ही बातमी फोफानोव्हाकडून कळली तेव्हा लेनिनने समाधानाचा सुस्कारा सोडला. त्यानंतर त्याने नुकतेच लिहून काढलेले आवाहन फोफानोव्हाला वाचून दाखविले.

लेनिनने म्हटले होते – 'सहकाऱ्यांनो, परिस्थितीने आता स्फोटक वळण घेतले असून उठावाला उशीर करणे म्हणजे आपण होऊन मृत्यूला निमंत्रण दिल्यासारखे होणार आहे. आता सभा नको, संमेलने नकोत. आता गरज आहे उठावाची – लोकांच्या मदतीने सशस्त्र क्रांतीची! आपल्याला आता क्षणभरही थांबून चालणार नाही. काय वाटेल ते होवो. कोणतीही किंमत लागो. आपण आता हंगामी सरकारचा पराभव करून केरेन्स्कीला आणि त्याच्या सहकाऱ्यांना अटक केली पाहिजे.

आता क्षणाचाही उशीर झाला तर आपण सर्वस्व गमावून बसू.

सारे काही आज रात्रीच केले पाहिजे. पेट्रोग्राडची सत्ता उद्या केरेन्स्कीच्या

हाती असता कामा नये. विजय दृष्टिपथात आला असताना आपण जर उशीर केला तर इतिहास आपल्याला क्षमा करणार नाही.

हंगामी सरकार कोसळू लागले आहे. त्याला आपल्या सर्व शक्तिनिशी शेवटचा धक्का द्या.

पुन्हा सांगतो क्रांतीला उशीर करणे म्हणजे मृत्यूला निमंत्रण दिल्यासारखे होणार आहे.'

हे आवाहन वाचून दाखविल्यानंतर लेनिन फोफानोव्हाला म्हणाला, 'आता मला स्मोल्नीला पोचलं पाहिजे. आजची रात्र नेहमीपेक्षा फार वेगळी आहे.'

फोफोनोव्हा म्हणाली, 'रात्री दोन वाजता उठाव करण्याचं ट्रॉटस्कीनं ठरविलं आहे. परंतु तत्पूर्वी तुम्ही बाहेर पेडणं धोक्याचं आहे असं सर्वांचं मत आहे.'

लेनिनने सांगितले, 'असं असेल तर मग तू स्वत: आता स्मोल्नीला जाऊन ये. मला उठावाचा सारा तपशील कळला पाहिजे. पण हे बघ, तू जर का अकरा वाजेपर्यंत परत आली नाहीस तर मी स्वत: बाहेर पडणार आहे.'

फोफानोव्हा स्मोल्नीकडे निघाली. लेनिन स्वत:शी पुटपुटला, 'इतिहासाला धक्का देण्याचा क्षण येऊन ठेपला आहे. अशा वेळी मी अज्ञातवासात राहणे चुकीचे आहे. पेट्रोग्राड क्रांतिकारकांच्या हाती पडत असताना क्रांतीच्या विजयाचा तो सोहळा मला माझ्या डोळयांनी पाहायला हवा. काय वाटेल ते होवो, मला आता स्मोल्नीला गेलंच पाहिजे. परिस्थितीची हाक मला ऐकलीच पाहिजे.'

लेनिनने अशा वातावरणात बाहेर पडणे खरोखरच धोक्याचे होते. रात्रीच्या वेळी वाहन मिळण्याची शक्यता नसल्यामुळे त्याला व्हायबर्ग ते स्मोल्नी हे प्रदीर्घ अंतर पायीच काटावे लागणार होते. आज सगळीकडे संशयग्रस्त वातावरण निर्माण झाले असताना केरेन्स्कीच्या सैनिकांनी आपल्याला ओळखले तर ते नक्कीच आपल्याला गोळी घालून ठार करतील याचे लेनिनला भान होते. काय करावे यासंबंधी विचार करीत तो खोलीत येरझारा घालीत होता. अर्धा तास निघून गेला. लेनिनच्या शरीरातील क्रांतिकारकाचे रक्त उसळ्या मारीत होते. त्याकडे दुर्लक्ष करणे लेनिनला सर्वस्वी अशक्य होते. अशा वेळी मृत्युचा विचार करणे भ्याडपणाचे ठरले असते. तो आपल्या मनाशीच म्हणाला, 'सुरक्षिततेचा विचार करून या खोलीत बसून राहण्यात काहीच अर्थ नाही. उलट स्मोल्नीला जाण्यातच सारं काही सामावलेलं आहे.'

मग मात्र त्या लहानशा खोलीत क्षणभरही थांबणे लेनिनला अशक्य झाले. त्याने डोक्यावर केसांच्या झुलुंपाचा टोप चढवून त्यावरची हॅट भुवयांपर्यंत खाली खेचली. आपला चेहरा त्याने असा काही झाकून घेतला की हा आता कोण आहे

याची परिस्थितीलाही ओळख पटू नये. एईनो राह्‌जा हा फिनिश कार्यकर्ता या वेळी तेथे आला होता. लेनिन त्याला म्हणाला, ' तू माझ्याबरोबर चल. वाटेत जर आपल्याला कोणी हटकलं तर तू सांगायचंस की माझ्या या मित्राचो दाढ इतकी दुखू लागली आहे की, त्याला एक शब्द उच्चारायलादेखील खूप त्रास होतो.

बाहेर पडण्यापूर्वी लेनिनने फोफानोव्हासाठी चिठ्ठी लिहून ठेवली—' मी जेथे जाऊ नये अशी तुझी इच्छा आहे तिकडेच जाण्यासाठी मी निघालो आहे.'

बाहेर अंधार पडला होता. गार वारे वाहत होते. एखाददुसऱ्या पहारेकऱ्याशिवाय रस्त्यावर चिटपाखरूही दिसत नव्हते. भवितव्याचा वेध घेण्यासाठी क्रांतिकारक लेनिन व्हायवर्गहून स्मोल्नीकडे जाण्यासाठी निघाला—मृत्युचा धोका पत्करून—विजयाचा क्षण पकडण्यासाठी—इतिहासाला धक्का देण्यासाठी !

व्हायवर्ग हे उपनगर लाल-रक्षकांच्या ताब्यात असल्यामुळे त्या भागातून जाताना लेनिनला कोणतीच भीती बाळगण्याचे कारण नव्हते. पुढचा प्रवासच धोक्याचा होता. मृत्यू कोठून आणि कसा सामोरा येईल हे सांगता येत नव्हते. लेनिन लिटेइनी पुलाजवळ येऊन पोचला. एवढयात डेपोकडे निघालेली शेवटची बस तेथून जात होती. लेनिनने चपळाई करून बसमध्ये उडी मारली. बस जवळजवळ रिकामी असल्यामुळे लेनिन ओळखला जाण्याचा संभव नव्हता. बस—डेपोपासून लेनिनची पुन्हा पदयात्रा सुरू झाली. उठावासंबंधी ट्रॉटस्कीने आपल्याला काहीच कळविले नाही हा विचार त्याच्या मनात सलत होता. खरे म्हणजे ट्रॉटस्कीने आपल्यासाठी मोटार धाडायला हवी होती अशी त्याची अपेक्षा होती. उठावाची बातमी आपल्यापासून लपवून ठेवण्यात ट्रॉटस्कीचा दुसरा काही हेतू तर नसावा ना, ही शंकाही त्याच्या मनाला चाटून गेली.

लेनिनला हे सारे विचार बरोबर येत असलेल्या एईनो राह्‌जा यालाही सांगता येण्यासारखे नव्हते. लेनिन आपल्या मनाला एवढंच बजावत होता—' मृत्युचा धोका पत्करूनही का होईना पण मला लवकर स्मोल्नीला पोचलं पाहिजे, ट्रॉटस्कीला भेटलं पाहिजे.'

अर्धाअधिक प्रवास सुखरूप पार पडला होता. परंतु उरलेला प्रवासच अधिक धोकादायक होता. कोणत्याही क्षणी आपण ओळखले जाण्याचा आणि ओळखले जाताच ठार मारले जाण्याचा संभव मनात बाळगीतच लेनिनची वाटचाल सुरू होती. एके ठिकाणी केरेन्स्कीच्या पहारेकऱ्यांनी त्या दोघांना हटकलेच. एईनो राह्‌जा लेनिनच्या कानांत कुजबुजला, ' तू पुढे जा. मी यांचं पाहून घेतो. ' आपल्या खिशातील दोन पिस्तुले जागच्या जागी आहेत ना याची खात्री करीत सैनिक उभे होते, तिकडे एईनो राह्‌जा जाऊ लागला. या सैनिकांना कसा गुंगारा द्यायचा याचा

काही सेकंदांतच विचार करणे आवश्यक होते. एईनो राहजाने मद्यप्याचे सोंग घेतले. सैनिक दरडावून पुन्हा विचारीत आणि हा हसत हसत, अडखळत अडखळत, मध्येच उत्तर देई. शेवटी ते सैनिक म्हणाले, 'या दारुड्याच्या नादी लागण्यात काही अर्थ नाही. तू जा बाबा.' झोकांड्या खात एईनो राहजा कोपऱ्यावर वळला. तो सुखरूप आल्याचे पाहून लेनिनचा जीव भांड्यात पडला.

लेनिनची वाटचाल सुरू झाली. चर्चच्या घड्याळात बाराचे टोले पडले. सात नोव्हेंबर या दिवसाला प्रारंभ झाला होता.

अखेरीस लेनिनची ही पदयात्रा आटोपली आणि तो स्मोल्नी इन्स्टिटयूटच्या इमारतीपाशी येऊन पोचला. परंतु दारावरचे पहारेकरी त्याला आत सोडीनात. आपल्याला आत जाणे किती आवश्यक आहे हे लेनिन त्या पहारेकऱ्यांना दहा मिनिटे समजावून देत होता. परंतु त्यांचे उत्तर एकच होते– 'पास दाखवा आणि आत जा.'

स्मोल्नीच्या प्रवेशद्वारापाशी बरीच गर्दी जमली होती. जो तो आत जाण्यासाठी रेटारेटी करीत होता. पाठीमागून असाच एक जोराचा लोंढा आला आणि त्यासरशी जे काही थोडे लोक आत घुसू शकले त्यांत लेनिन आणि एईनो राहजा हे होते. आत गेल्यानंतर लेनिन गंमतीने एईनो राहजा याला म्हणाला, 'आपल्याला विजय मिळतो, पण तो हा असा.'

लेनिन त्या इमारतीत प्रथमच येत होता, त्यामुळे ट्रॉटस्कीची कचेरी कोठे आहे हे त्याला माहीत नव्हते. अजूनही त्याने आपला चेहरा झाकूनच ठेवलेला होता. वरच्या मजल्यावर लेनिन गेला आणि तेथल्या एका खुर्चीवर जाऊन बसला.

एईनो राहजा ट्रॉटस्कीस शोधण्यासाठी एक एक खोली धुंडाळू लागला. एवढ्यात डॅन नावाचा मेन्शेव्हिक कार्यकर्ता लेनिनशेजारी येऊन बसला. या माणसाला आपण कोठे तरी पाहिले आहे, परंतु ओळख काही पटत नाही असे चेहरा झाकून घेतलेल्या लेनिनकडे पाहताना डॅनला सारखे वाटत होते. डॅनच्या चेहऱ्यावरील हावभाव लेनिन न्याहळीत होता. ओळख पटावी म्हणून डॅनने लेनिनला विचारले, 'तुला भूक लागलीय का ? आपण दोघेही थोडा पाव खाऊ या.'

पावाचा कागद सोडतानाही डॅनचे लक्ष लेनिनवर खिळले होते. हा कदाचित लेनिन तर नसेल ना असे त्याला एकदा वाटले. लागलीच त्याने पाव परत कागदात गुंडाळला आणि तो तेथून दुसऱ्या खोलीत गेला. डॅनची भांबावलेली अवस्था पाहून लेनिनची करमणूक झाली. एईनो राहजा परतला होता. तो लेनिनला म्हणाला, 'शंभर क्रमांकाच्या खोलीत लष्करी क्रांतिकारक समितीची कचेरी आहे. ट्रॉटस्कीने तुम्हांला तिकडेच बोलावलंय.'

लेनिन उठला आणि एईनो राहजाच्या मागोमाग चालू लागला. ट्रॉटस्कीच्या

खोलीत प्रवेश करताच लेनिनने आपला टोप व हॅट भिरकावून दिली आणि तो खदखदून हसला. डॅन त्या खोलीतच एका कोपऱ्यात उभा होता. लेनिन चेहऱ्यावरचा रुमाल काढत असताना डॅनची त्रेधातिरपीट पाहत होता.

असे वेषांतर करून वावरण्याची लेनिनला यापुढे मुळीच गरज पडणार नव्हती.

लेनिन आणि ट्रॉटस्की यांचे बोलणे सुरू झाले. पेट्रोग्राडमधल्या लष्कराशी समझोता करण्याचा लष्करी क्रांतिकारक समितीचा प्रयत्न चालू असल्याची बातमी सकाळच्या वृत्तपत्रांत प्रसिद्ध झालेली होती. लेनिनचा अशा तडजोडीला सक्त विरोध होता. लष्कराशी तडजोड केल्याने क्रांतीशी द्रोह केल्यासारखे होणार आहे, असे त्याचे मत होते. म्हणून त्याने ट्रॉटस्कीला विचारले, 'लष्कराशी समझोता करण्याचा तुझा विचार असल्याची बातमी खरी आहे काय ?'

ट्रॉटस्की हसला. तो म्हणाला, 'कॉमरेड, माझा स्वभाव तुला माहीत आहे ना ? आता कोणाशीही तडजोड वगैरे काही नाही. परंतु तशी बातमी प्रसिद्ध व्हावी अशी मी मुद्दामच व्यवस्था केली होती.'

लेनिनचा राग मावळला. तो उत्तरला, 'तसं असेल तर मग काहीच हरकत नाही.' नंतर त्याने ट्रॉटस्कीला विचारले, 'उठावाची तयारी झाली असेल तर अजून रस्ते शांत का आहेत ? अजून कुठेच गोळीबाराचे आवाज ऐकू येत नाहीत हे कसे ?'

ट्रॉटस्की म्हणाला, 'आपली सारी तयारी पूर्ण झाली असून महत्त्वाचे पूल आपल्याच ताब्यात आहेत. शहराचा बराचसा भाग सकाळपर्यंत आपल्या नियंत्रणाखाली येईल. कदाचित बंदुकीची एक गोळीही न झाडता आपण पेट्रोग्राडवर झेंडा लावू शकू.'

या उठावात आपण सहज यशस्वी होऊ शकू, हा ट्रॉटस्कीचा विश्वास अनाठायी आहे हे लेनिनचे मत अद्यापही कायम होते.

रात्रीचा एक वाजून गेला होता. केरेन्स्कीच्या राजवटीवर आघात करण्यासाठी लाल सैन्याची पहिली तुकडी स्मोल्नीमधून बाहेर पडत होती. पहिल्या दोन–चार तासांतच टपाल-तार कचेरी, टेलिफोन एक्स्चेंज्, वीजपुरवठा केंद्र, सरकारी बँक इत्यादी इमारती लाल रक्षकांनी आपल्या ताब्यात घेतल्या. एक फिनलंड स्टेशन तेवढे अद्याप हंगामी सरकारच्या ताब्यात होते. पहाटेपर्यंत केरेन्स्की सरकारचे दोन मंत्री लाल रक्षकांच्या हाती सापडले होते.

ट्रॉटस्कीचा विश्वास खरा ठरला होता.

रात्रभर किरकोळ चकमकी सुरू असल्या तरी सरकारी सेनेकडून म्हणावा तसा प्रतिकार कोठेच झाला नाही. उजाडेपर्यंत पेट्रोग्राडचा बराचसा भाग लष्करी क्रांतिकारक समितीच्या नियंत्रणाखाली आलेला होता. लेनिन रात्रभर जागा असला तरी

तो लष्करी क्रांतिकारक समितीच्या चर्चेत भाग घेत नव्हता. फक्त ती चर्चा लक्षपूर्वक ऐकण्याचेच काम तो करीत होता. मधून एखादा प्रश्न तो विचारी इतकेच. लाल रक्षकांनी कोठे आणि कसा हल्ला करावा यासंबंधीच्या सर्व सूचना ट्रॉटस्कीच देत होता. पेट्रोग्राड ताब्यात येण्यासाठीच कोणती पावले टाकली पाहिजेत यासंबंधी ट्रॉटस्कीने गेल्या काही दिवसांत बराच विचार केला असला पाहिजे हे या चर्चेवरून लेनिनला आढळून आले.

सकाळी आठ वाजता परिस्थिती अशी होती की, विंटर पॅलेस आणि मेरिन्स्की पॅलेस या दोन सरकारी कचेऱ्याच काय त्या क्रांतिकारकांच्या हाती आलेल्या नव्हत्या. बाकीचे सारे पेट्रोग्राड शहर ट्रॉटस्कीच्या लष्करी क्रांतिकारक समितीने ताब्यात घेतले होते. त्यामुळे या दोन इमारती ताब्यात घेणे आपल्याला केव्हाही शक्य आहे असा ट्रॉटस्कीचा विश्वास होता.

इतक्या अनपेक्षित आणि सहज रीतीने क्रांती घडून येईल याची लेनिनला मुळीच कल्पना नव्हती. त्यामुळे सारे पेट्रोग्राड आपल्या राज्यात आले आहे, हे ट्रॉटस्कीचे शब्द ऐकताच लेनिनच्या आनंदाला सीमा उरली नाही. अखेरीस त्याला हवा असलेला क्षण गवसला होता.

लेनिनने घाईघाईने कागद पुढे ओढला आणि केरेन्स्की राजवटीचा मृत्युलेख लिहिण्यास त्याने प्रारंभ केला. त्याने लिहिले.

' रशियन नागरिकहो,

केरेन्स्कीचे हंगामी सरकार कोसळले आहे. पेट्रोग्राड लष्करी क्रांतिकारक समितीच्या नियंत्रणाखाली आलेले आहे. त्यामुळे ज्या उद्दिष्टांसाठी आपण गेले कित्येक दिवस झगडत होतो ती उद्दिष्टे आता पार पाडली जातील याची खात्री बाळगा. आता आपण जमीनदारी नष्ट करू, कारखाने कामगारांच्या हाती देऊ. इतर राष्ट्रांबरोबर शांततेचा करार करू आणि त्याबरोबरच साऱ्या देशाचा कारभार पाहण्यासाठी सोव्हिएत सरकार प्रस्थापित करू.

कामगार, सैनिक आणि शेतकरी यांची क्रांती चिरायू होवो !'

लेनिनचे हे आवाहन दहा वाजता पेट्रोग्राड नभोवाणीवरून वाचून दाखविण्यात आले. त्याचप्रमाणे ते छापून घेऊन त्याच्या हजारो प्रती शहरभर वाटण्यात आल्या.

आता पेट्रोग्राडमध्ये राहणे घातक ठरेल हे ओळखून केरेन्स्कीने अमेरिकन वकिलातीची मोटार मागवून घेतली आणि तो आघाडीकडे जाण्यासाठी निघाला. सैनिकांच्या मदतीने आपण पुन्हा पेट्रोग्राड आपल्या ताब्यात घेऊ शकू, अशी त्याला आशा वाटत होती. केरेन्स्की निघून गेल्यानंतर मेरिन्स्की पॅलेस ताब्यात घ्यायला क्रांतिकारकांना विशेष अडचण पडली नाही.

सारे पेट्रोग्राड शहर शांत होते. एक राजवट कोसळली होती आणि दुसरी राजवट आकार घेत होती. परंतु या क्रांतिकारकांच्या बदलाची पेट्रोग्राडमधून हिंडताना काहीच जाणीव होत नव्हती. नागरिकांचे नित्याचे व्यवहार चालू होते. लोकांच्या भावना अनावर होऊन कोठे दंगाधोपा वा जल्लोष झाला आहे असे दृश्य दिसत नव्हते. बँका तेवढ्या बंद असल्यामुळे काही तरी विशेष घडल्याची जाणीव होत होती इतकेच. एरवी क्रांती म्हटल्यानंतर गडबड, गोंधळाचा वा रक्तपाताचा जो देखावा डोळ्यांसमोर उभा राहतो त्याचा पेट्रोग्राडमध्ये ७ नोव्हेंबर रोजी मागमूसही नव्हता.

दुपारी दोन वाजता स्मोल्नीच्या सभागृहात पेट्रोग्राड सोव्हिएटची बैठक सुरू झाली. ट्रॉटस्की व्यासपीठावर येताच टाळ्यांचा गजर झाला. ट्रॉटस्की म्हणाला, 'हंगामी सरकार उलथून पाडण्यात आपण यशस्वी झालो आहोत. ही क्रांती घडवून आणताना रक्तपात होईल ही अनेकांनी वारंवार बोलून दाखविलेली भीती खोटी ठरली आहे. अद्यापपर्यंत रक्ताचा एकही थेंब सांडलेला नाही. एखाद्या क्रांतिकारक संघटनेने अशी रक्तशून्य क्रांती केल्याचे हे पहिलेच उदाहरण असावे. आता आम्ही विंटर पॅलेस ताब्यात घेतल्यानंतर नव्या राजवटीची घोषणा करू.'

ट्रॉटस्कीच्या भाषणानंतर लेनिन झिनोव्हेव व लुनाखरस्की यांची भाषणे झाली. एरवी सभा जिंकण्यात लेनिनची ख्याती होती. परंतु या वेळचे त्याचे भाषण अतिशय नीरस झाले. तो म्हणाला, 'आपल्याला आता रशियात श्रमिक जनतेच्या समाजवादी राजवटीची उभारणी करावयाची आहे. जागतिक समाजवादी क्रांती चिरायू होवो.'

लेनिनचे भाषण आटोपल्यानंतर प्रतिनिधींनी टाळ्या वाजविल्या. परंतु ट्रॉटस्कीच्या वाक्यावाक्याला जसा टाळ्यांचा कडकडाट होत होता तसे या वेळी घडले नाही. पेट्रोग्राड सोव्हिएटने ७ नोव्हेंबर या दिवसाचा मानकरी म्हणून ट्रॉटस्कीचा गौरव केला होता.

विंटर पॅलेस जिंकण्यासाठी ट्रॉटस्कीला अर्धा तास झुंज द्यावी लागली. हंगामी सरकारने तेथे मोठा प्रतिकार केला म्हणून हा वेळ लागला असे मुळीच नव्हे. शिस्तीच्या अभावी लाल सेनेमध्ये अंतर्गत कुरबुरी सुरू झाल्यामुळेच विंटर पॅलेस हाती यायला उशीर होत होता. अखेरीस विंटर पॅलेस जिंकण्याची कामगिरी अँटोनोव्ह ओसेयेन्को याच्याकडे सोपविण्यात आली. त्याने मोठ्या शर्थीने सायंकाळी दहा वाजता पॅलेसला वेढा घालून हंगामी सरकारकडे शरणागतीची मागणी केली. पॅलेसमधल्या मॅलाचाईट सभागृहात हंगामी सरकारचे मंत्री जमले होते. केरेन्स्की उद्या सकाळपर्यंत आघाडीवरच्या सैन्याच्या मदतीने क्रांतिकारकांवर हल्ला चढवील अशी या मंत्र्यांची कल्पना नसल्यामुळे त्यांनी शरणागतीची मागणी फेटाळून लावली.

विंटर पॅलेस ताब्यात यायला उशीर होत आहे, हे पाहून लेनिन कमालीचा अस्वस्थ झाला. विंटर पॅलेस ताब्यात आल्याशिवाय केरेन्स्की-राजवटीचे मूळ उखडले गेले आहे असे मानता येणार नाही, असे तो ट्रॉटस्कीला सारखे सांगत होता. ट्रॉटस्कीने आणखी थोडा वेळ वाट पाहिली. परंतु तरीही पॅलेस ताब्यात येत नाही असे आढळून येताच त्याने 'आरोरा' युद्धनौकेवरून पॅलेसवर तोफगोळ्यांचा मारा करण्याचा हुकूम दिला. रात्री नऊ वाजता 'आरोरा'वरून फेकण्यात आलेला पहिला तोफगोळा पॅलेसमध्ये जाऊन पडला. प्रत्युत्तरासाठी पॅलेसमधील सैनिकांनी आपला तोफखाना उघडला. तासभर ही चकमक चालू होती. या हल्ल्यामुळे विंटर पॅलेसमधील दिवे मालवले जाताच आतल्या सैनिकांची हालचाल थंडावली. ही संधी साधून अँटोनोव्ह ओसेयेन्कोने पॅलेसमध्ये घुसण्याचा शर्थीचा प्रयत्न केला. परंतु अंधारामुळे त्याचीही कुचंबणा होत होती. अखेरीस रात्री दोन वाजून दहा मिनिटांनी अँटोनोव्ह ओसेयेकोव, मॅलाचाईट सभागृहापर्यंत पोचला आणि तेथे हजर असलेल्या मंत्र्यांना त्याने अटक केली. तीन वाजता लाल रक्षकांच्या पहाऱ्यात या मंत्र्यांची पीटर आणि पॉल किल्ल्यांत रवानगी करण्यात आली. विंटर पॅलेस क्रांतिकारकांच्या ताब्यात आला होता.

इकडे विंटर पॅलेस ताब्यात घेण्यासाठी क्रांतिकारक समितीची पराकाष्ठा सुरू असताना स्मोल्नीमध्ये रात्री साडेदहा वाजता देशातील सोव्हिएट सदस्यांचे दुसरे अधिवेशन सुरू झाले. अधिवेशनाच्या अध्यक्षपदी कामेनेव्हची निवड करण्यात आली. त्यानंतर अध्यक्षीय मंडळ निवडण्यात आले. त्यात बोल्शेव्हिक पक्षाचे चौदा, सोशॅलिस्ट रेव्होल्युशनरी पक्षांचे सात, मेन्शेव्हिकांचे तीन व गॉर्की गटाचा एक असे एकंदर पंचवीसजण घेण्यात आले.

दिवसभराच्या श्रमाने लेनिन आणि ट्रॉटस्की खूप थकले होते. सभागृहालगतच्या एका छोट्या खोलीत ब्लँकेट टाकून त्यावर ते दोघे विश्रांतीसाठी पडले होते. लेनिन ट्रॉटस्कीला सारखे विचारीत होता, 'अजून विंटर पॅलेस ताब्यात आलेला नाही?' लेनिनचे समाधान होईल असा खुलासा करण्याइतकेही ट्रॉटस्कीच्या अंगात त्राण नव्हते. 'लवकरच पॅलेस आपल्या हातात येईल' एवढेच तो लेनिनला आश्वासन देत होता.

सोव्हिएट-प्रतिनिधींच्या अधिवेशनामध्ये बरेच वादंग माजले होते. उठाव करून बोल्शेव्हिक पक्ष सत्ता आपल्या ताब्यात घेण्याची कारवाई करीत आहे, असा मेन्शेव्हिकांनी आरोप करताच अधिवेशनातील वातावरण तापले. आपली बाजू मांडण्यासाठी बोल्शेव्हिकांनी लेनिन आणि ट्रॉटस्की यांना बोलावणे धाडले. थकलेल्या अवस्थेतच ते दोघे व्यासपीठावर आले. प्रथम ट्रॉटस्की बोलावयास उभा राहिला. तो म्हणाला, 'या क्रांतीमध्ये मवाळ समाजवाद्यांना कोणतेच स्थान उरलेले नाही, हे

आता तरी त्यांनी ध्यानात घ्यावे. मवाळामध्ये इतके मतभेद आहेत की, समजा आज सत्ता त्यांच्या ताब्यात आली तरी ती त्यांना पेलता येणार नाही. थोडक्यात मवाळांची उपयुक्तता आता संपली आहे.' नंतर आवाज चढवीत तो म्हणाला, 'आणि आम्ही बोल्शेव्हिकांनी तुम्हांला सत्तेमध्ये भागीदारी तरी का द्यावी ? ही क्रांती आम्ही घडवून आणली आहे. हा आमचा विजय आहे. इतिहासाच्या सांदी-कोपऱ्यात पडून राहण्याव्यतिरिक्त आता तुम्हांला कोणतंच कार्य उरलेलं नाही.'

ट्रॉटस्कीचे हे उद्‌गार ऐकताच बोल्शेव्हिकांव्यतिरिक्त इतर सदस्यांनी सभात्याग केला. आता रशियात बोल्शेव्हिक पक्षाव्यतिरिक्त कोणालाच स्थान उरलेले नाही• याची ही नांदी होती. ट्रॉटस्कीनंतर लेनिनने जे भाषण केले, त्यात तर या नांदीचा भरपूर पुरावा मिळत होता. लेनिन म्हणाला, 'बोल्शेव्हिक कार्यकर्त्यांच्या या परिषदेकडे रशियाची सूत्रे आली असून आता बोल्शेव्हिक राजवटीला प्रारंभ होत आहे.'

रशियात राज्यक्रांती घडून आली होती. ट्रॉटस्कीच्या लष्करी क्रांतिकारक समितीने अशक्यप्राय वाटणारे हे कार्य अवघ्या चोवीस तासांत पार पाडले होते. आता बोल्शेव्हिकांची एकतंत्री राजवट सुरू होणार होती.

लेनिनची त्यासाठीच धडपड सुरू झाली. [ क्रमशः ]


फॉस्फोमिन-



अधिक उत्साह देते. भूक वाढविते.





जोम वृद्धिंगत करते. शरीराची रोग-प्रतिकार-क्षमता वाढविते




खरोखर!...

फॉस्फोमिन म्हणजे घरकुलांतील आरोग्याचे कारंजे!

व्हिटॅमिन बी कॉम्प्लेक्स आणि विविध ग्लिसरोफॉस्फेटस्युक्त उत्तम फलास्वाद असलेले हिरव्या रंगाचें टॉनिक—फॉस्फोमिन

SQUIBB®

® हा ई. आर. स्क्विब अँण्ड सन्स इन्कॉर्पोरेटेड, यांचा रजिस्टर्ड ट्रेडमार्क आहे व करमचन्द प्रेमचन्द प्रायवेट लि. यांना तो वापरण्याचे लायसन्स आहे

SARABHAI CHEMICALS

Shilpi SC 50 A/67 Mar

# □ इतिहासाची दैनिक पुनरावृत्ती

अशिक्षित माणसाला एकच व्यवसाय करता येतो व तो म्हणजे पत्रकाराचा, या बर्नार्ड शॉच्या उक्तीला अनुसरून मी एक वर्तमानपत्र काढण्याचे ठरविले आहे. गेले बरेच दिवस प्रत्येक लहान–मोठ्या दैनिकांचे पहिले पान डोळ्यांखालून घातल्यावर माझी अशी खात्री झाली आहे की, बातम्या शिकविण्याचे तंत्र एकदा समजले की बसल्या बैठकीत राष्ट्रीय व आंतरराष्ट्रीय ताज्या बातम्या तयार करता येतात. या ट्रिकचा आधारभूत सिद्धांत म्हणजे इतिहासाची पुनरावृत्ती होत असते. ताज्या बातम्या शिळ्या झाल्या की कालांतराने त्याचे इतिहासात रूपांतर होते. तेव्हा त्याच शिळ्या झालेल्या बातम्या ताज्या म्हणून खपविता आल्याशिवाय इतिहासाची पुनरावृत्ती अशक्य आहे. म्हणजे कुठली बातमी अशक्य आहे म्हणजे कुठली बातमी साधारणपणे किती दिवसांनी किंवा कोठल्या मोसमात ताजी म्हणून हमखास वापरता येईल याचा ठोकताळा बसला की वर्तमानपत्र तयार. तेव्हा भाज्यांप्रमाणे बातम्याही कोणत्या सीझनमध्ये कोणत्या पिकतात याचा शास्त्रशुद्ध विचार करून अस्मादिकांनी सबंध वर्षाचे वेळापत्रकच तयार केले आहे.

जानेवारी–फेब्रुवारी : साधारणपणे नवीन वर्षाचे सुरुवातीचे दिवस : काश्मीर–सिमल्याला भयंकर हिमवर्षाव. दिल्लीत कडाक्याची थंडी. अन्नपरिस्थिती गंभीर. पाच वर्षांच्या आत भारत अन्नधान्यांत स्वयंपूर्ण होईल अशी सरकारी हमी.

फोटो– दिल्लीच्या फूटपाथवर थंडीने काकडलेल्या म्हाताऱ्याचे प्रेत. प्रजासत्ताक दिनानिमित्त लोकनृत्याची अफलातून पोज. सरकारी पाहुणे म्हणून आलेले टिंबक्टूचे राजेसाहेब किंवा रुरिटानियाचे पंतप्रधान राजघाटावर गांधीजींच्या समाधीला हार घालीत आहेत. त्यांच्या सौ. कॉटेज इंडस्ट्रीज एम्पोरियममध्ये काश्मिरी शाल विकत घेताना. सरकारचा जनतेला इशारा– गंभीर अन्नपरिस्थिती व पाक–चीनच्या संकटाकडे लक्ष ठेवून सरकारचे हात बळकट करा.

मार्च–एप्रिल : व्हिएटनामचे युद्ध, कलकत्त्याचे निदर्शन, अमेरिकेचे भारताला आर्थिक साहाय्य, पेकिंगमध्ये एखाद्या परदेशी वकिलातीची जाळपोळ, केरळमधला संप इत्यादी किरकोळ पण नित्यनेमिक्रमाने चालू असलेल्या घटना. भाववाढ न होऊ देण्याची सरकारची भीष्मप्रतिज्ञा.

फोटो– आधी कोंबडी की आधी अंडे या विषयावर दिल्लीत योजलेल्या आंतरराष्ट्रीय परिसंवादात भाग घेणारे परदेशी तज्ज्ञ. कुठल्याही विश्वविद्यालयात विद्यार्थी व पोलिस यांचे तुंबळ युद्ध.

सरकारचा जनतेला गंभीर इशारा– बिकट अन्नपरिस्थिती व पाक-चीनचे संभाव्य संकट लक्षात घेऊन सरकारचे हात बळकट करा.

मे–जून–जुलै व साधारण उन्हाळ्याचे दिवस : दिल्लीत व एकूण उत्तर भारतात भीषण उन्हाळा. पाण्याची तीव्र टंचाई. सरकारचे जनतेला आवाहन– दिल्ली सोडून (सिमल्याला) जा. दुष्काळ. दुष्काळ–मंत्र्यांचे निवेदन– एकही माणूस दुष्काळाने मेलेला नाही. अधिक धान्य पाठविण्यासाठी अमेरिकेकडे तातडीची मागणी. दुष्काळ खरोखरीच पडला आहे की काय हे शोधून काढण्यासाठी हाय–पॉवर कमिटी.

फोटो– खपाटीला पोट गेलेला शेतकरी व त्याचे तितकेच स्लिम कुटुंब. मलूल पडलेली गुरे. दुष्काळावर भाषण देणारा ढेरपोट्या मंत्री.

सरकारचा जनतेला इशारा– अत्यंत गंभीर अन्नपरिस्थिती व पाक-चीनचे संभाव्य संकट ओळखून सरकारचे हात बळकट करा.

ऑगस्ट–सप्टेंबर–ऑक्टोबर : दुष्काळी समितीचा अहवाल– एकही माणूस उपासमारीने मेला नाही, पण बरीच माणसे पुरेसे खायला न मिळाल्याने मेली. नवीन पीक चांगले येणार अशी दाट सरकारी वदंता. दुष्काळात मदत देणाऱ्या देशांना भारतीय उपदेशामृताचे दोन–चार घुटके. अतिवृष्टी. पिकांची अतोनात नासाडी. चांगल्या पिकाची अपेक्षा फोल ठरण्याची सरकार–व्यक्त भीती. पुनः अमेरिकेकडे तातडीची हक्काची मागणी– अधिक धान्य पिकवा आणि आम्हांला पाठवा. नद्यांना पूर. पूरग्रस्तांना मदत करण्यासाठी फंड.

फोटो– दिल्लीच्या तुंबलेल्या रस्त्यात खेळणारी नागडी पोरे. बिहार–उत्तर प्रदेशात पुरात बुडालेली खेडी. प्रधान-मंत्री विमानातून पाहणी करीत आहेत.

सरकारचा जनतेचा इशारा– अन्नपरिस्थिती व पाक-चीनचे संकट ओळखून सरकारचे हात बळकट करा.

नोव्हेंबर–डिसेंबर : पूर ओसरले. कॉलरा, टायफॉइड इत्यादी साथींचा प्रादुर्भाव. रोगराई– मंत्र्यांचे आवाहन : पाणी उकळून घ्या. भाव-वाढ न होऊ देण्याची भीष्म-प्रतिज्ञा का मोडली याचा सरकारी खुलासा. बड्या सरकारी पाहुण्यांची आयात सुरू.

फोटो– दिल्लीत रोज बदलणाऱ्या निरनिराळ्या रंगांचे झेंडे दुतर्फा लावलेले रस्ते. एखाद्या परदेशी मंत्र्याचे विमानतळावर स्वागत.

सरकारचा जनतेला इशारा– अन्नपरिस्थिती व पाक-चीनचे संकट ओळखून सरकारचे हात बळकट करा.

याच्या जोडीला वर्षातून केव्हाही वापरता येतील अशा बातम्या व फोटो– प्रधान-मंत्र्यांच्या निवासस्थानासमोर "धरणा." अमेरिकेने आणखी एक उपग्रह सोडला. राजधानीतील पाणी व वीजपुरवठा सुधारण्याचे सरकारी आश्वासन. यूनोत रशिया–अमेरिकेची खडाजंगी. भारताचे धोरण तटस्थतेचे असल्याची पर-राष्ट्रमंत्र्यांची ग्वाही. भारताने पाकला १३९ वा आणि चीनला २५४ वा निषेध खलिता पाठविला. ○

# आदर्श कार्यकर्ता : बुवा साळवी

कबड्डीचे हे भाग्यच म्हणावयाचे; कारण अशी धग आणि वडपड, अशी तळमळ आणि तडफड काही निश्चित ध्येयाने आणि दूरदृष्टीने सतत बाळगणारा माणूस सापडणे विरळाच. श्री. शंकरराव नारायणराव तथा बुवा साळवींबद्दल मी हे बोलतो आहे. पस्तीस वर्षांच्या बुवांचा पिंड राजकीय मुशीत आणि सामाजिक उठबशीत पोसला गेला आहे. उत्साह शिगोशीग भरलेला आणि पायाला सतत चक्र बांधलेले. कधी कंटाळा म्हणून नाही. चांगलं–वाईट चटकन् आकलन करून घेणारे, पण विचारसरणी पुरोगामी. त्यातून वाणी शुद्ध आणि स्पष्ट. स्वभाव आर्जवी, अंतःकरण आपुलकीचे. कबड्डीतले दोष दाखविले तर आडपडदा न ठेवता लगेच मान्य करणारे. आणखी काही दोष दाखवा, सुधारून घेऊ म्हणणारे. आजची कबड्डीची स्थिती त्यांनी पंधरा वर्षांपूर्वी हेरली होती. कबड्डीला आंतरराष्ट्रीय स्वरूप आणण्याची जिद्द बुवा हृदयात बाळगून आहेत. जीवनातील सौंदर्याचा शोध घेत घेत साळवी सतत वाटचाल करीत आहेत. तेव्हा यश हे हमखास मिळावयाचेच.

हुतुतू का कबड्डी हा वाद जोरात चालू असताना पंधरा–वीस वर्षांपूर्वी त्यांनी प्रभादेवीच्या कामगार विभागातील कबड्डीच्या कार्यात उडी घेतली. कै. भाई नेरुरकर आणि वसंतराव कोलगावकर यांच्या मार्गदर्शनाखाली कबड्डीचा व्याप सांभाळला. ५० साली ब्रेबॉर्न स्टेडियमवरील एका भारतीय ऑलिंपिक स्पर्धेत स्वयंसेवक म्हणून काम केले. त्याच वेळी अखिल भारतीय कबड्डी संस्थेची स्थापना झाली. ५२ मध्ये या संस्थेचे ते आजीव सदस्य झाले. व तेव्हाच्या मुंबई इलाखा कबड्डी संस्थेचे संयुक्त कार्यवाह बनले. भारतीय कबड्डी संस्थेच्या तत्त्वाचा त्यांनी सतत प्रसार आणि पुरस्कार केला. त्यांत जीव ओतला आणि कबड्डीला सामर्थ्य आणले. मोरारजीभाई देसाई, यशवंतराव चव्हाण आणि स. का. पाटील यांच्याकरवी मुंबईच्या दत्ता मालप या कबड्डी खेळाडूस त्यांनी भारतीय कबड्डीचा प्रतिनिधी म्हणून रशियास पाठविण्याचे प्रयत्न केले (१९५६–५७). कुलाबा, ठाणे, पुणे, सातारा, सांगली, सोलापूर, औरंगाबाद, अहमदनगर येथे प्रत्यक्ष जाऊन हिंडून कबड्डीसाठी अहोरात्र रान पेटविले. चर्चा केल्या, जुने–नवे विचार ऐकून घेतले. योग्य सांगड घातली. चांगले उचलले, वाईट घालविण्यासाठी समजुती घातल्या. जुन्यांना नम्र केले, नव्यांना मार्गदर्शन दिले. बुवांचे द्रष्टेपण हे असे होते. कबड्डीचे भाग्य मी म्हणतो ते याकरिताच.

१९५३ साली नागपूर येथे महिलांचे कबड्डी जगत सुरू केले. ५५ मध्ये त्यांचा




राष्ट्रीय स्पर्धेत अंतर्भाव केला. महाराष्ट्राच्या महिलांनी सतत बारा वर्षे अजिंक्यपद मिळविले. तेव्हा मुख्यमंत्र्यांच्या हस्ते त्यांचा सचिवालयात किंवा त्यांच्या बंगल्यात सत्कार करण्याची प्रथा पाडली.


१९५८–५९ मुंबईच्या सेंट झेवियर स्टेडियमवर (परळ) कबड्डीची राष्ट्रीय स्पर्धा घेतली. सुमारे वीस हजार खर्च आला. यशवंतराव चव्हाणांनी अध्यक्षस्थान स्वीकारून या स्पर्धांना प्रतिष्ठा आणली. जिल्ह्याजिल्ह्यांतून पंच–परीक्षा घेवविल्या. बुवांबद्दल किती सांगावे, आणि किती लिहावे ?

१९६३ मध्ये तर कै. पंडित नेहरूंना त्यांनी शांताराम भोईर गोल्ड कपकरिता मुंबईला आणले आणि त्यांच्या वतीने अखिल भारतीय पातळीवरील स्पर्धांचे उद्‌घाटन करविले. कबड्डीसाठी भारतभर त्यांनी संचार केला. सुदैवाने ते ज्या कंपनीत नोकरीला आहेत त्या ' हिंद सायकल्स ' ने त्यांना चांगले प्रोत्साहन दिले.

खेळाडूंची नावनोंदणी आणि एक राज्य एक संस्था या आदेशानुसार भारत आणि महाराष्ट्रात त्यांचे जारीने प्रयत्न चालू आहेत. प्रगत विचार, नव्या कल्पना, नवे तंत्र कबड्डीत कसे येईल याचा शंकररावांना जणू ध्यासच लागला आहे. आम्ही नेहमी म्हणतो की कबड्डीसारख्या छोटया क्रीडांगणावर रोमांच फुलल्याखेरीज प्रेक्षकांची गर्दी उसळणार नाही. दांडगाई, घसमुसळेपणापेक्षा सामर्थ्याचा वेळेनुसार योग्य वापर आणि बचाव वा आक्रमक खेळातील बुद्धीचा जाणीवपूर्वक उपयोग झाल्याखेरीज कबड्डी जनमनांत ठसणार नाही. शंकरराव साळवी हे सर्व जाणून आहेत. पण बुवांची भूमिका कार्यकर्त्याची आहे. त्यांच्या झेपेलाही मर्यादा आहेत. खेळाडूंकडे सर्व लोक पाहत असतात. दुर्दैवाने खेळाडू मात्र क्वचितच कुठे नजर फिरवितात. अशा वेळी नैपुण्य, पदचापल्य, सामर्थ्य, सावधगिरी अशा कलागुणांचा खेळाडंनी सतत कष्ट करून उपयोग घ्यावयास नको काय ?

बुवांच्या अस्तित्वाने आणि उपस्थितीने अखिल भारतीय कबड्डी संस्थेच्या चिटणीसपदाचाच गौरव होत आहे यात शंका नाही. पण साळवींच्या एकटयाच्या प्रयत्नाने सबंध भारतातील कबड्डीचे हितचिंतक आंतर-राष्ट्रीय कबड्डीचे स्वप्न साकार करू पाहतील तर ती गोष्ट लवकरात लवकर होणे शक्य दिसत नाही. त्यांच्यामागे जाणारा खेळाडू, कार्यकर्त्यांचा ओघ आणि शासनाचे साहाय्य हेच कबड्डीचे उज्ज्वल भवितव्य ठरविणार आहे.

**मनोहर रेगे**



रात्री नऊचा सुमार. महत्त्वाचे काम आटोपून मित्राबरोबर परत घराकडे निघालो होतो. गप्पा रंगात आल्या असूनही लक्ष द्विधा झाले. कारण 'एरी मैं तो प्रेम दिवानी मेरा दर्द न जाने कोई।' 'नौबहार' चित्रपटातील जुनी तबकडी कुठेतरी वाजत होती, आणि रोशनने बांधलेल्या गीतातील 'दर्द' आमच्या गप्पांचा आम्हांला विसर पाडीत होता. गाणे संपले. आम्ही पुढे निघालो आणि गप्पांचा मूळ विषय सुटून रोशनच्या संगीताबाबत बोलतच आम्ही घरी आलो.

रोशनच्या निधनाची बातमी वर्तमानपत्राने घरी आणली. चार ओळींची बातमी पाहून वाटलं, छे, हा रोशनलाल दुसराच कुणी असेल, पण वाईट बातम्या सहसा खोटया ठरत नाहीत, याला ही बातमीसुद्धा अपवाद नव्हती. ताजमहल, बरसात की

# एरी मै तो प्रेम दिवानी

रात, आरती, ममता आदी चित्रपटांतील गीतांना मोहक गोडव्याच्या चाली बांधणारे आमचे रोशन खरोखरच गेले होते. रोशनबाबूंचे यश दिपवून टाकणारे नसले तरी त्यांच्या सुमधूर चालींनी गीतांना अनेक चित्ररसिकांपर्यंत अचूक पोचवले आहे.

रोशनबाबूंचे संपूर्ण नाव रोशनलाल नागरथ. १४ जुलै १९१७ रोजी एका मध्यमवर्गीय कुटुंबात त्यांचा जन्म झाला. त्यांचे बालपण उत्तर प्रदेशातील शहाजंगपूर येथे गेले. संगीतासंबंधी बोलताना ते नेहमी म्हणत, संगीताची समज आणि गायकीचा आवाज या निसर्गदत्त देणग्या आहेत. प्रयत्नाने संगीताची समज वाढेल, आवाजावर ताबा येईल. परंतु या दोन्ही बाबतींत निसर्गाचा वरदहस्त मात्र हवाच हवा.' स्वत: रोशनच्या संदर्भात निसर्गाने त्याला 'संगीताचा कान' दिला होता. लहानपणापासून संगीताकडे त्याचा ओढा असे. वडिलांचा विरोध असूनही रोशनचे संगीताचे वेड कमी होत नव्हते. छोटा रोशन एकदा आजारी पडला. जुजबी उपायाने



# रोशन

# मेरा दर्द न जाने कोई ।

आराम पडेना. पिताजींनी रोशनचाच सल्ला घेतला. आजारावर उपाय म्हणून रोशनने छोट्या हार्मोनियमची मागणी केली. आणि आश्चर्य म्हणजे हार्मोनियम घरात येताच रोशनच्या आजाराने पळ काढला. रोशनचा मोठा भाऊ विनोद यालाही संगीताचे दांडगे वेड, परंतु वयाच्या केवळ १६ व्या वर्षी त्याचे निधन झाल्याने रोशनच्या संगीत वेडाबाबतचा पिताजींचा विरोध पूर्णपणे मावळला.

शहाजंगपूरमध्ये नागरथ कुटुंब राहत असे. त्याला लागूनच एक चित्रगृह होते. या चित्रपटगृहात के. एल. सायगल यांचा पूरन–भगत हा चित्रपट लागला होता. साय-

शरद गोखले

गलची दोन सुंदर भजने या चित्रपटात आहेत. ती ऐकण्यासाठी छोटा रोशन अचूक वेळी चित्रपटगृहाजवळ येऊन उभा राहत असे.

## भारत-दौरा

रोशनचे वय त्या वेळी नऊ वर्षांचे असेल. आपल्या सवंगड्यांबरोबर स्वारी "गिल्ली डंडा" खेळत होती. खेळता खेळता विट्टी उडून शेजारच्या घरात गेली. विट्टी आणायला गेलेला रोशन बराच वेळ परत आला नाही, म्हणून त्याचे स्नेही शेजारच्या घरात जाऊन पाहतात. तो कोणातरी बुवांचा रिआज चालू आहे. आणि वाकडी मान करून आणि कमरेवर हात ठेवून छोटा रोशन कान देऊन ऐकत उभा आहे. मित्राच्या हाकेने रोशन आणि गाणारे बुवा मनोहर बर्वे दोघांचीही तंद्री भंगली. मनोहर बर्वे त्या वेळी वाद्यवृंदाबाबत व शास्त्रीय संगीताबाबत विलक्षण लोकप्रिय होते. भारताच्या दौऱ्यावर असताना केवळ योगायोगाने ते शहाजंगपूरमध्ये होते. जमलेल्या मुलांचा गोंवळ ऐकून बर्वे त्यांच्याजवळ गेले, आणि त्यांनी रोशनला गाणे म्हणण्यास सांगितले. छोटचा रोशनचे गाणे ऐकून बर्वे संतुष्ट झाले, आणि या छोकऱ्याला आपल्याबरोबर दौऱ्यावर पाठवाच असा त्यांनी रोशनच्या वडिलांजवळ आग्रह धरला. रोशनही जायला उत्सुक आहे हे लक्षात आल्याने पिताजींनी रोशनला दौऱ्यावर जाण्यास संमती दिली.

## संगीतसाधना

दौऱ्यावरून रोशन एक वर्षाने घरी परतला. तो संगीताचा सखोल अभ्यास करण्याची महत्वाकांक्षा बाळगूनच. याच क्षेत्रात आपले चिरंजीव नाव काढणार, अशी नागरथबाबूंचीही खात्री झाल्याने त्यांनी रोशनला थोडेफार संगीत शिक्षण देण्यास सुरुवात केली. संगीत क्षेत्रातील पुरेशी पार्श्वभूमी तयार झाल्यावर वयाच्या १३ व्या वर्षी रोशनला लखनौच्या मेरीस कॉलेज ऑफ म्युझिक या संस्थेत दाखल केले. या संस्थेतील पाच वर्षे म्हणजे रोशनबाबूंच्या संगीतसाधनेचा काळ. याच काळात रोशन स्वत: थोडेफार गाणे शिकले. हार्मोनियम वादनातील अनेक बारकावेही त्यांनी शिकून घेतले. शास्त्रीय संगीताची शास्त्रशुद्ध बैठकही त्यांनी समजावून घेतली. आपल्या आयुष्यातील अत्यंत आनंदाचा काळ म्हणजे ही पाच वर्षे, असे रोशनबाबू शेवटपर्यंत म्हणत असत. संगीताचा परिपूर्ण अभ्यास झाला, तरी गायकीमध्ये त्यांचा आवाज बसू न शकल्याने वाद्यवादनात तरी आपण प्रभुत्व मिळवावे असे त्यांच्या मनाने घेतले. त्यामुळे त्यांनी यानंतरची काही वर्षे असे शिक्षण देऊ शकणाऱ्या गुरूच्या शोधात घालविली. महियार येथे एक वर्ष राहून त्यांनी बुंदुखान यांच्याकडून सारंगीवादनाचे परिपूर्ण शिक्षण घेतले. आपल्या गुरूला संतुष्ट करण्यासाठी या काळात रोशनबाबू सोळा सोळा तासपर्यंत मेहनत घेत असत. सारंगीवर प्रभुत्व मिळविल्यानंतर संगीत क्षेत्रातच जीवन व्यतीत करावे असे त्यांच्या मनाने घेतले. आणि याच दृष्टीने त्यांनी दिल्ली नभोवाणीच्या संगीत विभागामध्ये नोकरी पत्करली.

आकाशवाणीच्या नोकरीमध्य सुरुवातीचा काही काळ रोशनबाबू रमून गेले, तरी लाल फितीचा जाचकपणा आणि संगीत क्षेत्रातील त्यांच्या नवीन कल्पनांना पडणाऱ्या मर्यादा यामुळे लवकरच ते या नोकरीला कंटाळले. परंतु घरच्या आर्थिक अडचणींमुळे स्वतःच्या इच्छेविरुद्ध त्यांनी ही नोकरी चालू ठेवली. वर्षामागून वर्षे जात होती. पण रोशनच्या धडपडीला वाट सापडत नव्हती. मात्र या संघर्षकाळातच प्रीतीचा ओलावा रोशनबाबूंच्या वाटचाला आला. आणि या क्षेत्रात झपाट्याने प्रगती करून केवळ वर्षभरातच स्वारी चतर्भुज झाली. एकाकी जीवनाला प्रीती-लतेची साथ मिळाली. आणि इरा रोशनसह पुढील वाटचाल सुरू झाली. सौभाग्य-वतीही आकाशवाणीतच नोकरीस असल्याने नोकरीतही थोडाफार जीव रमू लागला. सरकारी सेवेत आणखी दोन वर्षांची भर पडली. आणि रोशनबाबूंचे संगीतप्रेम पुन्हा उसळी मारून येऊ लागले. या वेळेपर्यंत आकाशवाणीवर त्यांचे चांगले बस्तान बसले होते. काही नभोनाट्यांतील गीतांना त्यांनी दिलेल्या चालींचाही थोडाफार बोलबोला होऊ लागला. याच सुमारास कृष्णचंद्र नावाच्या नभोनाट्य लेखकाने त्या वेळचे सुप्रसिद्ध संगीत दिग्दर्शक अविनाश व्यास यांच्याकडे रोशनबाबूंची शिफारस केली. अविनाश व्यास यांना त्या वेळी माहीतगार साहाय्यकाची आवश्यकता होतीच.

## योगायोग

एका सुप्रभाती रोशनबाबूंच्या हातात अविनाश व्यास यांचे पत्र पडले. या वेळ-पर्यंत आर्थिक अडचणीही बऱ्हंशी दूर झाल्या होत्या. आणि आपल्या कार्यकर्तृत्वाबद्द-लचा रोशनबाबूंचा आत्मविश्वासही चांगलाच वाढला होता. आलेली संधी अजिबात दवडायची नाही असा निश्चय करून रोशनबाबूंनी सरकारी नोकरीचे त्यागपत्र दिले. आणि मुंबईच्या दिशेने महत्त्वाकांक्षी वाटचाल सुरू केली.

१९४८ साली मुंबईत आल्यावर वास्तविक अविनाश व्यास यांच्याकडे साहाय्यक म्हणून रुजू होणे आवश्यक होते. परंतु व्यास बाबूंची गाठ पडण्यापूर्वीच रोशनबाबू व केदार शर्मा यांची भेट झाली. बोलण्याच्या ओघात रोशनबाबूंची सर्व माहिती कळल्यावर केदार शर्मांनी स्वतःच लिहिलेल्या एका गीताचा कागद त्यांच्या हातात दिला, आणि गाण्याला चाल बांधण्यास सांगितले. त्याच बैठकीत केवळ अर्ध्या तासाचा वेळ घेऊन रोशनबाबूंनी गीत स्वरबद्ध केले. या माणसाची ताकद विलक्षण असल्याचा प्रत्यय केदार शर्मांना आला, आणि त्याच बैठकीत आपल्या 'नेकी और बेदी' या आगामी चित्रपटाच्या संगीताची जबाबदारी त्यांनी रोशनबाबूंवर सोपवली साहाय्यकाचे काम करायला आलेले रोशनबाबू विजयसोपानाच्या सर्व पायऱ्या एकदम उल्लंघून संगीत दिग्दर्शकाच्या रांगेत जाऊन बसले.

'नेकी और बेदी' प्रदर्शित झाले कधी आणि गेले कधी हेही लोकांना समजले नाही. चित्रपटाच्या प्रिमियरला रोशनबाबू जातीने हजर होते. पण पडद्यावर गाणे सुरू होताच प्रेक्षकांतून शिव्या सुरू झाल्या. हाच प्रकार सर्वत्र. सर्वच गीतांच्या

बाबतीत हाच अनुभव कमी जास्त फरकाने आला. आणि चित्रपटगृहात रुबाबात बसलेल्या रोशननी हळूच घरची वाट पकडली. आलेले अपयश त्यांनी मान्य केले. चित्रपटाच्या नवीन माध्यमाचा विशेष अभ्यास केला. आणि पुन्हा केदार शर्मांकडे आले. पहिल्या अपयशाची जाणीव न देता केदार शर्मा यांनी ' बावरे नयन ' या आपल्या चित्रपटासाठी पुन्हा त्यांची निवड केली. शर्मांचे वितरक बिथरले. संगीत दिग्दर्शक बदलण्याचा आग्रह त्यांनी सुरू केला. वितरकांशी कोणतीही तडजोड न करता शर्मांनी ' बावरे नयन ' पूर्ण केले. चित्र चांगले चालले, पण लक्षात राहिले ते मात्र संगीतामुळेच. या चित्रपटातील ' तेरी दुनियामें दिल लगता है,' हे दरबारी रागातील मुकेशच्या तोंडचे गाणे आजही हवेहवेसे वाटते.



रोशन–लता

शर्मांकडे दोन पिक्चर्स करूनही रोशन अजून चित्रव्यवसायात उभे राहू शकत नव्हते. त्यामुळेच साहाय्यक श्रेय नामावलीत स्वतःचे नाव न घालता त्यांनी अनेक मान्यवर संगीत दिग्दर्शकांकडे काम केले, आणि स्वतंत्रपणे काम मिळवण्याचे प्रयत्न चालू ठेवले. ' हमलोग ' ' मल्हार, ' ' रागरंग, ' ही त्यांची या नंतरची चित्रे. पैकी ' हमलोग 'ने अभूतपूर्व यश मिळविले. रोशनच्या संगिताचाही बोलबाला झाला. मुकेशने निर्माण केलेल्या ' मल्हार ' या चित्रपटामध्ये लता मंगेशकर यांनी रोशनबाबूसाठी आपले पहिले गाणे गाईले. रोशन–लताची ही जोडी शेवटपर्यंत टिकून होती. ' नौ बहार ' चित्रपटातील ' एरी मैं तो प्रेम दिवानी ' हे भीमपलास रागातील गीत आजही श्रवणीय वाटते. रोशनबाबूंचे संगीत इतरांपेक्षा वेगळे असणार, अशी चित्र व्यावसायिक मंडळींची खात्री झाली. मात्र या वेगळेपणाला शास्त्रीय संगीताची जी बैठक होती ती व्यवसायाला मानवेलशी नव्हती, स्वाभाविकपणेच केल्या कामाचा गौरव होऊनही नवीन काम मिळणे मात्र कठीण होऊ लागले. अधून मधून एखादे पिक्चर मिळे. नंतर पुन्हा विश्रांती.

व्यवसायात पुढे येण्यासाठी शास्त्रीय संगीताखेरीज अन्य गोष्टींची आवश्यकता

असल्याची खात्री झाल्यावर रोशनबाबूंनी भारतीय लोकसंगीताचा, व उडत्या संगीताचा विशेष अभ्यास केला. त्यांचे थोरले बंधू जी. सी. नागरथ अमेरिकेमध्ये होते. त्यांच्याकडून त्यांनी पाश्चात्त्य संगीताची पुस्तके मागवली. पाश्चात्त्य संगीताच्या रेकॉर्डस् खरेदी केल्या. आणि परिपूर्ण तयारी करून पुन्हा लक्ष घातले. याच सुमारास त्यांचे 'अजी बस शुक्रिया' हे चित्र प्रदर्शित झाले. आणि त्यातील 'सारी सारी रात तेरी याद सताये' हे गीत एकदम क्लिक् झाले. रेकॉर्डसच्या हजारो प्रती खपल्या. आणि रोशनबाबूंची उज्ज्वल यशाकडे वाटचाल सुरू झाली. एक-दोन मामुली चित्रपट त्यांनी केले. आणि मग 'बरसात की रात' या चित्रपटातील एकूण एक गाणी लोकप्रिय ठरली. चित्रपट सामान्य असूनही केवळ रोशनच्या ताकदीवर त्याने रौप्यमहोत्सव साजरा केला. कव्वालीच्या नवीन प्रांतात प्रवेश करून त्यांनी असामान्य यश संपादन केले. 'ना तो कारवाकी तलाश है' ही त्यांनी संगीतबद्ध केलेली कव्वाली कॉलेज कुमारांच्या तोंडात घोळू लागली, तर 'जिंदगीभर नही भुलेगी वो बरसात की रात' हे त्यातील गोडव्यामुळे गाजले. 'गरजत बरसत सावन आयोरे' हे व अन्य सर्वच गीते सर्वतोमुखी झाली. वास्तविक सर्वोत्कृष्ट संगीत दिग्दर्शनाचे पारितोषिक रोशनबाबूंकडे आपसूक यायचे. पण कुठे तरी माशी शिंकली, आणि हा मान हुकला. रेकॉर्डिंग कंपनीने कव्वालीच्या प्रती काढण्यासही नाखुषी दर्शवली होती परंतु रोशनच्या आग्रहास्तव रेकॉर्डस् निघाल्या. आणि या चित्रपटाच्या ध्वनिमुद्रिकांनी त्या वर्षीच्या चित्रपट ध्वनिमुद्रिका विक्रीत नवीन उच्चांक प्रस्थापित केला. लोकांच्या पसंतीची पावती मिळाली. आणि नवीन नवीन पिक्चर्स येऊ लागली.

## जो वादा किया

'अनहोनी', देवर, आरती, ताजमहल, दिल ही तो है, दूज का चाँद, चित्रलेखा, ही सर्व त्या नंतरची चित्रे. प्रत्येक चित्रपटाचे संगीत सरस. 'आरती' मधील 'लहू का का रंग एक है, अमीर क्या गरीब क्या,' आणि 'अब क्या मिसाल दूं,' ही विशेष गाजली. 'दिल ही तो है' चा सर्व सेटच लोकप्रिय झाला. विशेष लक्षात राहिली ती कव्वाली, 'लागा चुनरीपे डाग' व 'तूम अगर मुझको ना चाहो,' ही दोन गीते. 'ताजमहल'च्या यशात ही रोशनबाबूच्या संगीताचा वाटा जबरदस्त. प्रत्येक गीत आधीच्या गीतापेक्षा सरस पण एकच गीत सांगावयाचे म्हटले तर 'जो वादा किया वो निभाना पडेगा', चित्रपटाच्या प्रदर्शनापूर्वी आणि नंतरही अनेक दिवसपर्यंत रोज कुठे ना कुठे एकदा तरी हे गीत हमखास ऐकावयास मिळे. या वर्षी मात्र पूर्वी हुकलेला बहुमान रोशनबाबूंकडे चालून आला. सर्वोत्कृष्ट संगीत दिग्दर्शक म्हणून त्यांची निवड झाली.

शास्त्रोक्त संगीतासाठी ठेवण्यात आलेले सुर-सिंगरचे पारितोषिक ही त्यांच्या चित्रलेखामधील 'मन रे' या गीताला मिळाले. अत्यंत यशस्वी संगीत दिग्दर्शका-

मध्ये त्यांचा समावेश होऊ लागला. ममता आणि दादी माँ, आणि भीगी रात, ही त्यांची अगदी अलीकडील चित्रे. ' दिल जो न कह सका, वही राझे दिल, कहनेकी रात आयी ' या गीताला इतर संगीत दिग्दर्शकांना हेवा वाटला इतकी लोकप्रियता लाभली. त्यांच्या वरील तिन्ही चित्रपटांनी उत्तम आर्थिक यश संपादन केले.

रोशनबाबूचे संगीत लाभलेले बहू बेगम, नूरजहाँ, अरमान भरा दिल. हे चित्रपट प्रकाशनाच्या वाटेवर आहेत. त्यांचे संगीत चांगले असणारच अशी त्यांच्या असंख्य चाहत्यांना खात्री आहे.

चित्रपट संगीताच्या मर्यादा विशाल आहेत. ' रॉक एन् रोल ' पासून भजनापर्यंत सर्व या क्षेत्रात येते, शिवाय पार्श्वसंगीतासाठी नाटयाची चांगली समज, (Dramatic sence) ही हवीच, अशी त्यांची धारणा होती. गाण्याच्या यशात वा अपयशात कवी, गायक व संगीतकार यांचा समसमान वाटा आहे असे ते मानीत. रोशनबाबू स्वत: शास्त्रीय संगीताचे पुरस्कर्ते असले तरी गरजेप्रमाणे त्यांनी सर्व संगीत प्रकारांचा आपल्या चित्रपटांतून पुरस्कार केला. या क्षेत्रात अपयश आलेले लोकच चित्रपट संगीताला नावे ठेवतात असे ते मानीत. चित्रपट संगीतामुळे संगीत समृद्ध झाले असून सर्वसामान्य माणसापर्यंत त्याने वाटचाल केली आहे असे ते आग्रहाने सांगत असत.

शास्त्रोक्त संगीत व लोकसंगीत यांच्यावर विलक्षण प्रभुत्व असलेली फारच थोडी मंडळी चित्रव्यवसायात आहेत. रोशनबाबू त्यापैकीच एक. कासवाच्या गतीने येऊन त्यांनी चित्रपट सृष्टीच्या संगीत क्षत्रातील सर्वोच्च बहुमान संपादन केले. यशोशिखरावर उभे असतानाही त्यांचा शांत, निगर्वी स्वभाव कायम होता. चित्रपट सृष्टीतील यशाला स्थायीभाव नसतो हे ते ओळखून होते.

खेमचंद प्रकाश, आणि शामसुंदरसारख्या संगीत दिग्दर्शकाच्या अखेरच्या दिवसांचा ते वारंवार उल्लेख करीत.

रोशन आणि यश यांची ही वाटचाल यशोमंदिरापर्यंत पोहोचली होती खरी, या यशोमंदिरातून निघणारे स्वर निनाद आता दीर्घकाळपर्यंत ऐकावयास मिळतील अशी अपेक्षा बाळगणाऱ्या असंख्य चित्रशौकिनांचा अपेक्षाभंग करून रोशनबाबू सर्वांना अनपेक्षितपणे सोडून गेले. आता मागे रेंगाळतात त्या त्यांच्या ' एरी मैं तो प्रेम दिवानी,' या गीतासारख्या अन्य असंख्य स्वरलहरी.

○

# मुक्ताफळे

पान ७ वरून

वस्तुत: संबंध दुरावावे याला पंतप्रधान विल्सन कारणीभूत आहेत. नेहरूंच्या मृत्युनंतर भारत-पाक युद्ध झाले आणि ६ सप्टेंबरला विल्सन साहेबाने भारताची नाचक्की करणारी विधाने केली. कुणी आमची नाचक्की केली की त्यांच्यावर प्रेमाचा वर्षाव करण्याची आमची मुळी पद्धतच आहे! साहजिकच विल्सन साहेबांना भारताची प्रतिमा नीट समजून देण्यासाठी इकडून मंत्र्यांची रीघ लागली. एका मंत्र्यांनी तर म्हणे विल्सन साहेबांची भेट घेऊ न देणाऱ्या, त्यांच्या कनिष्ठ अधिकाऱ्यांना आठवडाभर भंडावून सोडले. प्रेमाचे भंडावणे असेच निष्ठापूर्वक असावे लागते. विल्सनसाहेब अजीजीने चिटणीसांना म्हणत होते–

"अहो, हे आहे काय? दिल्लीच्या यच्चयावत मंत्र्यांना माझ्यावर सोडले आहे की काय? जो तो भारताची प्रतिमा सुधारायला माझी भेट मागतो म्हणजे काय? इतर देशांत काय यांची प्रतिमा चांगली आहे? तिकडे जा म्हणावे!"

चिटणिसांनी नम्रतेने सांगितले—

"साहेब, इतर सर्व देशांत त्यांचे मंत्री गेले आहेतच. हे तर सरप्लस आहेत. इतर देशांत यांचा अजून नंबर लागत नसल्याने हे तूर्त सहा-सात दिवस इथेच आहेत. रागावून कसे चालेल? 'सोशॅलिस्टिक पॅटर्न ऑफ सोसायटी'चे हे महान पुरस्कर्ते आहेत!"

"पण यांना इतके दिवस इथे राहणे परवडते कसे! राज्य चालवतात की × ×?"

विल्सनसाहेबांचा राग अनावर झाला होता. चिटणिसांनी सांगितले, "यांची मुलेबाळे इकडेच शिकतात. भारतातून आता इंग्रजीची हकालपट्टी होणार असल्याने यांची मुले इकडे शिकतात. युरोपातल्या, आफ्रिकेतल्या सर्व वकिलांची मुलं इंग्लंडमध्येच असल्याने ही सर्व मंडळी महिन्यातून चारपाच दिवस येथेच असतात."

विल्सनसाहेब कडाडले, "काय सांगता काय तुम्ही? भारतात मंत्र्यांची संख्या दोन अडीच हजार आहे? या सर्वांची मुलं इकडे शिकतात?"

चिटणिसाने खुलासा केला, "तसं नाही साहेब. शक्य त्यांची शिकतात. काही मंत्री घरीच आपल्या मुलांना इंग्रजी वातावरणात ठेवतात. ती मोठी झाली की त्यांना इकडची ओढ लागणारच!! महाराष्ट्राच्या मुख्यमंत्र्यांची 'किर्लोस्कर'-मधील मुलाखत वाचलीत तर हे आपल्या लक्षात येईल."

"तुम्ही फार बोलता चिटणीस." विल्सननी विषय बंद करीत सांगितले. "मी कोणाला भेटू शकणार नाही यापुढे. पाहुणे म्हणून काय झालं? मासळीला आणि पाहुण्यांना तीन दिवसांनी घाण येते असं सांगा त्यांना."

चालायचंच. असे प्रसंग यायचेच. परंतु डगमगून कसे चालेल? भटकणाऱ्यांचेच भाग्य उदयाला येते. वाहतूक नियंत्रणाची पद्धत, मासळी साठवण्याची पद्धत, गोदी विभागातील अडचणी, पोलिसयंत्रणा या सर्व विषयांवर पुस्तके उपलब्ध आहेत. परंतु पुस्तकांचा मुख्य दोष म्हणजे ती वाचावी लागतात व समजावी लागतात!

शिवाय डोळ्यात व वाचनात 'बोटी'चे अंतर असते. बोटीचे अंतर विमानाने कापता येते. या सर्व गोष्टी प्रत्यक्ष पाहण्यासाठी मंत्री यंदा विमानाने इंग्लंडला गेले, हेच बरोबर नाही काय ?

डॉ. करणसिंग हे आपल्या महाराणींसह दहा दिवस लंडनला होते. ते तर सहल पर्यटन खात्याचे केंद्रीय मंत्री ! ते मागे राहून कसे बरे चालेल ? खासकरून त्यांच्या अर्धांगीच्या छब्या ब्रिटिश वृत्तपत्रांनी छापल्या. टेलिव्हिजनवर त्यांची मुलाखत घेतली गेली. बी. बी. सी. ने ही मुलाखत इंग्लिश जनतेला म्हणे दाखवली मात्र नाही. डॉ. करणसिगांनीच ती दाखवून दिली नाही. कारण बी. बी. सी. ने हलकटपणा करून या मुलाखतीत अधूनमधून भारतातील अन्नान्न परिस्थितीची खास दर्दभरी छायाचित्रे दाखवली होती. त्यांना डॉ. करणसिगांची टिंगल करायची होती. त्यांना ब्रिटिश लोकांना सांगायचे होते, "भारतात पोटे खपाटीला गेलेली ही पाहा खेड्यापाड्यांतील बायकामुले व हे पाहायला या म्हणून गावगन्ना फिरणारा हा पाहा त्यांचा पर्यटन मंत्री !!

अशी नाचक्की कोण सहन करील ? डॉ. करणसिगांनी बी. बी. सी. चा हा डाव हाणून पाडला. भारताची अब्रू बचावली. केंद्रीय मंत्री भारताच्या अब्रूबाबत किती दक्ष असतात याचे हे एक उदाहरण. स्थलाभावी अधिक देत नाही.

पंतप्रधान इंदिराजींचा गेल्या महिन्यातला नुसता कार्यक्रम वाचलात तरी भारताचे नाव पर्यटनाने कसे पावन झाले आहे ते लक्षात येईल.

८ ऑक्टोबर : आज इंदिरा गांधींची मॉस्को येथे कोसिजिन यांच्याशी बोलणी झाली. इंदिरा गांधी यांनी रशियन वृत्तपत्रप्रतिनिधींना याची आठवण करून दिली की रशियन क्रांतीचे हे ५०वे वर्ष आहे. या क्रांतीनेच सर्व राष्ट्रीय नेत्यांना स्फूर्ती दिली.

९ ऑक्टोबर : आज वॉर्सा येथे विमानतळावर इंदिरा गांधींचे स्वागत झाले.

१२ ऑक्टोबर : आज इंदिराजींनी मा. टिटो यांच्याबरोबर जेवण व तीन तास बोलणी केली. पश्चिम आशियात व्हिएटनामची पुनरावृत्ती होईल असा इशारा दोघांनी दिला. दोघांनी नासरला त्यांच्या शहाणपणाबद्दल, धैर्याबद्दल धन्यवाद दिले.

१४ ऑक्टोबर : बेलग्रेड येथील 'पार्क ऑफ फ्रेडरिक' या उद्यानात इंदिराजींच्या हस्ते वृक्षारोपण झाले. पंतप्रधान झिवकॉव्ह यांनी इंदिराजींवर स्तुतिसुमने उधळली व इंदिराजींनी शांततामय सहजीवनाचे जे प्रयत्न चालवले आहेत त्याचे गोडवे गायले.

१६ ऑक्टोबर : रुमानियाचे पंतप्रधान मॉरेर यांनी विमानतळावर इंदिराजींचे स्वागत केले. रुमानियन वीरांच्या समाधीवर इंदिराजींनी पुष्पचक्र वाहिले.

१९ ऑक्टोबर : इंदिराजी व मॉरेर यांनी उत्तर व्हिएटनाममधील बॉम्बवर्षाव विनाशर्त थांबवला गेला पाहिजे अशी इच्छा प्रकट केली. त्याचप्रमाणे पश्चिम आशियात अरबांना पाठिंबा जाहीर केला. त्या दिवशी कैरो विमानतळावर नासर

यांनी इंदिराजींचे प्रचंड स्वागत केले. ' इंदिरा—नासुर झिंदाबाद ' असा जमलेल्या लोकांनी गजर केला.

अरबांचा प्रश्न, व्हिएटनामचा प्रश्न, या दोन्ही प्रश्नांवर जागतिक बोलणी करून इंदिराजी भारतात परतल्या. जबलपूरच्या काँग्रेस अधिवेशनात भारतातील प्रश्नावर किरकोळ चर्चा करून त्या तावडतोब पुन: मॉस्कोस रवाना झाल्या. कोसिजिनच्या शेजारी उभ्या राहून त्यांनी रशियन जनतेला अभिवादन केले.

इंदिरा गांधी परदेशात या सर्व महत्त्वाच्या गोष्टी करत असताना भारतात दंगेधोपे झाले, प्रांतिक मंत्रिमंडळांतून पेचप्रसंग निर्माण झाले, उरी विभागात पाकिस्तानने गोळीबार केला, आसामात घातपाती कृत्ये केली, हे चालायचेच. संसारी बाईला पोरवडा तसाच टाकून सिनेमाला जावे लागते. पोरवडा मोठा होईल, घरात भांडणे होणार नाहीत आणि मग सिनेमाला जाईन म्हटले तर कधी सिनेमाला जायला मिळायचेच नाही. चांगल्या साड्या, पातळे तशीच पडून राहतील कपाटात ! मग हौसमौज करायची कधी ?

दुर्गापूर पोलाद कारखान्यात ' सुसर 'सुखाची प्रचंड वाढ झाली ती का, याची चौकशी करण्याचे काम डॉ. चेन्ना रेड्डी या आपल्या पोलाद केंद्रीय मंत्र्याकडे आले. त्यांना तडक लंडनला जावे लागले. १० दिवस त्यांनी लंडनला मुक्काम केला व पांडे कमिशनला दुर्गापूरला ज्या गफलती झाल्या त्या कशा सुधाराव्यात हे सांगण्याकरिता त्यांनी ब्रिटिश तज्ज्ञांना इकडे पाचारण केले. तीन वर्षे हे तज्ज्ञ इकडे येऊन दुर्गापुरात मुक्काम ठोकणार आहेत. विल्सनसाहेबांनी आमच्या मंत्र्यांवर उगाच रागावण्यात काय बरे हशील आहे ? आता या तज्ज्ञांना भारत सरकार जो प्रचंड तनखा देईल त्याचे हो काय ? अशी सारखी देवाण ही चालायचीच. खरं पाहता इंग्लंडमध्ये पोलादधंद्याचे राष्ट्रीयीकरण करून फक्त तीनच वर्षे झाली. उलट गेली पंधरा वर्षे आपण दुर्गापूरसारखे पोलादाचे राष्ट्रीय कारखाने चालवीत आहोत. असे असताना इकडचे तज्ज्ञ तिकडे जाण्याऐवजी तिकडचे तज्ज्ञ इकडे का येतात असा एक आडमुठा प्रश्न डॉ. चेन्ना रेड्डी यांना कुणीतरी विचारला. वस्तुत: हा प्रश्नच मूर्खपणाचा आहे. तिकडचे सरकारी पोलाद कारखाने चालवायला समजा इकडचे तज्ज्ञ गेले आणि तिकडे त्यांचे दुर्गापूर झाले म्हणजे डॉ. चेन्ना रेड्डींची किती बरे नाचक्की होईल ! तिकडचे तज्ज्ञ आणायला डॉ. रेड्डी जातीने गेले हेच योग्य झाले. १० दिवसांत त्यांनी तिथे तज्ज्ञ मिळवले हेच खरोखरी अभिनंदनीय होय !

डॉ. करणसिंग काय, डॉ. रेड्डी काय, इंदिराजी काय, मोरारजी काय, हे जणू भारताने सोडलेले तेजस्वी उपग्रहच आहेत. जगाला प्रकाश देण्यासाठी सारखे फिरतात व जगात भारताचे नाव जे मोठे करतात हे विसरून कसे चालेल ? फिरा हो तुम्ही. ......टा टा ऽ ऽ ! !

—ग्यानबा

# तुमचे भविष्य आमचा अंदाज

श्री. गो. जोशी

सायनाचार्य

## माहे डिसेंबर १९६७ चे मासिक भविष्य

**मेष :** जीवन जगण्यासाठी आहे, यशस्वीपणाने आणि प्रसन्न वृत्तीने. कुढत घडपडत–कसं तरी जगणारी माणसे ही माणसेच नव्हेत. या तुमच्या विचारांना चालना देणारी ग्रहरचना अंतरिक्षात आताच निर्माण झालेली आहे, तिचा फायदा उठविलात तर जगाला तुम्ही आवर्जून सांगू शकाल की, कृतार्थ जीवन कसे जगावे ते.

डिसेंबरच्या दुसऱ्या पंधरवड्यात माझ्या सांगण्याचा आपल्याला हातोहात प्रत्यय येईल. व्यावसायिक प्रगतीचे नवे तंत्र आत्मसात कराल, साहित्याच्या क्षेत्रात नवा इतिहास निर्माण करू शकाल. वेळप्रसंग पडला तर हेतुसिद्धीसाठी आव्हानाचाही पवित्रा घ्याल. दि. २८ डिसेंबरच्या सूर्य-गुरु त्रिकोण योगावरच सारे लक्ष केंद्रित करा.

दि. ३ ते ८, १८ ते २३, २५ ते ३१ या कालात सर्व काही अपेक्षेप्रमाणे घडावे.

**वृषभ :** धावपळ, धडपड, संघर्ष असल्याशिवाय जीवनाला खरा रंग चढत नाही, संघर्ष असेल तरच ठिणगी पडेल–प्रकाश दिसेल !

मंगळ भाग्यांत आलेला असल्यामुळे आता कोणालाही डरायचे कारण नाही. शनीही ९ डिसेंबरला मार्गी होणार आहे.

प्रगतीच्या नव्या वाटा दृष्टिक्षेपात यायला लागतील. आजवर धडपड करूनही प्रगतीचे न सुटलेले गणित

आता चटकन् सोडवू शकाल. माघार घेणे, घोळ घालीत बसणे हे सारे प्रकार आता आपण विसरू शकता.

नवे क्षेत्र हाती येईल, स्थानांतर, दूरचा प्रवास, नोकरीधंद्यांत बदल यांपैकी काहीही केव्हाही घडावे.

दि. ५ ते १०, २५ ते ३० या कालात अपेक्षेपेक्षाही अधिक यश पदरी पडेल.

**मिथुन :** सध्याचे दिवस तसे अनिष्ट नाहीत – पण पदोपदी स्वास्थ्य हरवल्यासारखे जाणवेल. शिकस्तीचा प्रयत्न केल्याशिवाय मनासारखे काही घडूच नये असे अनुभव क्षणोक्षणी यायला लागतील. आठव्या मंगळात एवढे अपेक्षित असतेच.

साहित्य – नाटय – कला – ग्रंथप्रकाशन इ. बाबतींत या काली आपण विक्रमी यश मिळवू शकाल – पण या गोष्टीला अविश्रांत परिश्रमाचे मोल द्यावे लागेल.

हे दिवस फारच घाईगर्दीचे आहेत. अनंत कामांचे डोंगर उपसावे लागतील. प्रकृती फारशी चांगली राहणार नाही; पण प्रकृतीला लक्ष द्यायला वेळ कुठे आहे? काही दिवस हे सहन करण्यावाचून गत्यंतरच नाही.

दि. ७ ते ११, १९ ते २२, २५ ते ३० या काली अपेक्षित यश पदरी पडावे.

**कर्क :** मंगळ तुमच्या राशीसमोरच टपकलाय. त्याचा धिंगाणा काही काल सहन करण्यावाचून गत्यंतर नाही. पण आजारी पडायला तुम्हांला आता सवडच नाही.

सामाजिक–राजकीय क्षेत्रांत रान उठवावे लागेल, प्रतिपक्षाला नामोहरम करायची आलेली सुवर्णसंधी सोडून कसे भागेल? दंड थोपटून आखाड्यात उतरा. या कालाचे महत्त्वच असे आहे की, जे काय करायचे असेल ते आताच, पुन्हा केव्हाही नाही.

नोकरी–धंद्यातील समस्या चातुर्याने सोडवाव्या लागतील. व्यवसाय–धंद्याचा उभारलेला डोलारा कोसळू नये म्हणून डोळ्यांत तेल घालून पहारा करावा लागेल. प्रत्येक पाऊल सावधगिरीने उचलावे लागेल.

दि. ७ ते १३, २२ ते २८ याच काली आपण आवाज उठवू शकाल.

**सिंह :** षष्ठातील मंगळ म्हणजे कर्तृत्वसंपन्न व्यक्तींना वरदानच. विरोधकांना ठोकरून काढणे ही आता यःकश्चित बाब ठरेल. तुमची पावले खंबीरपणाने-निर्धाराने पडू लागतील. याच कालात आपण निर्धाराने पेटूनच उठाल आणि या तुमच्या स्वरूपाकडे पाहूनच आठवा शनी तुमच्या मार्गाआड येण्याचे धाडस करणार नाही.

या कालापासून तुमचे कर्तृत्व दाही दिशांना चौफेर उधळू लागेल. तुम्ही काहीही केलेत, कुठेही गेलात तरी तेथे तुमचे सत्कार होऊ लागतील.

प्रामुख्याने यांत्रिक-विद्युत क्षेत्रांतील व्यक्तींना इतका धवधवीत यशदायी काल क्वचितच अनुभवण्यास मिळाला असेल.

दि. ३ ते ७, १२ ते १९, २७ ते ३१ या कालात अनन्यसाधारण प्रगतीच्या घटना घडतील.

**कन्या** : सूर्य–मंगळ दोन्हीही कर्तृत्वसंपन्न ग्रहांचे सहकार्य एकाच वेळी. अशी संधी क्वचित लाभते.

काही दिव्यभव्य घडून यायचे असेल तर याच वेळी. संधी एकदा दार ठोठावते, तिची योग्य वेळी दखल घेतली नाही तर पुन्हा ती दिसणार नाही.

या वेळी निसर्ग पूर्णत्वाने अनुकूल आहे, परिस्थितीही प्रगतीला पोषक आहे, गरज आहे फक्त अविश्रांत परिश्रमाचीच. आणि तीही मागविली जाईल असा मला आत्मविश्वास वाटतो. फारसा वेळ वाया न घालविता डिसेंबरच्या पहिल्याच पंधरवडयात अविकृत कार्याला निर्धाराने सुरुवात करा. यश अपेक्षेपेक्षाही अधिक लाभेल असं अभिवचन मी देऊन ठेवतो. दि. १ ते ६, १४ ते २१, २७ ते ३० या कालात आपल्या अनेक समस्या सुटाव्यात.

**तूळ** : गुरू एकादशात पण मंगळ चतुर्थात. या वेळी आपणांस बरीचशी चांगली आणि थोडीशी वाईट सामग्री घेऊन तुम्हांला भविष्यकालाची वाटचाल करावी लागणार आहे. अशा वेळी निर्धाराचे खड्ग सतत जवळ बाळगलेत तर मात्र कोणतीही अनिष्टता तुमच्या प्रगतीच्या आड यायला धजणार नाही.

नव्या आशा अंकुरायला लागतील, व्यवसाय क्षेत्राची चक्रे वेगाने फिरू लागतील नोकरीत प्रगती, धंद्यात लाभ, सामाजिक-राजकीय क्षेत्रात फार मोठी प्रतिष्ठा या, साऱ्या गोष्टी डिसेंबरच्या दुसऱ्या पंधरवडयापासून भराभर घडून यायला लागतील.

आरोग्य मात्र म्हणावे तसे ठीक राहणार नाही. मधून मधून नियम-संयम यांचे वळसे घेतलेत तर तोही त्रास लवकरच मिटून जाईल.

दि. ३ ते ७, १७ ते २३, २७ ते ३१ या काली आपले परिश्रम कारणी लागावेत.

**वृश्चिक** : तुमचे सारे भवितव्य एकटया मंगळाच्या हाती. आता तो आपल्या पराक्रमस्थानी आलेला आहे. कोणत्याही क्षेत्रात आवाज उठवायला हीच एक वेळ आहे. राजकीय क्षेत्रात तर तुमचा दबदबा खूपच वाढू लागेल. सामाजिक कार्यक्रमात तुमच्या उपस्थितीची नितांत गरज भासू लागेल.

गेल्या महिन्यांतील साऱ्या अनिष्टतेवर पडदा पडेल आणि गतिमान जीवनाचा पुन:प्रत्यय यायला लागेल. या वेळी आपण निर्धार-निष्ठेचे व्रत एकनिष्ठपणे आचरिलेत तर अपेक्षासाफल्याचा क्षण फारसा दूर नाही असा प्रत्यय येऊ लागेल. या आठवडयात आपली खूपच धावपळ होईल. बदली बढतीचे योग येतील. मंगल-कार्याचे ठरेल. दि. ५ ते ११, १९ ते २८ या काळात आपल्या कर्तृत्वाला धार चढेल.

**धनू** : या वेळी फक्त एक गुरूच तुमचा पाठीराखा. त्याच्या इच्छेवर-लहरीवर तुमचे सर्व जीवन अवलंबून पण तो तुमच्याशी सतत एकनिष्ठ राहील.

या काली अनेकांच्या सहानुभूतीचा लाभ घडेल. ईश्वरी कृपेचा प्रत्यय पदोपदी येईल. आता तुमचे कशांतही अडू नये–कुठेही नडू नये. तुम्ही सहज काही केलेत तरी ते घवघवीत यश घेऊन उठेल.

या कालापासून धनोत्पादनाच्या नव्या मार्गांचा शोध लागेल, लवकरच पैशाची कारंजीही तेथे उडू लागतील. साऱ्या विवंचना-यातना मिटून जातील. तुमच्या अंगच्या सुप्त कर्तृत्वाचे याच वेळी जगाला दर्शन घडेल. तुमची प्रतिष्ठा खूपच उंचावेल.

दि. ३ ते ७, १४ ते १८, २२ ते २९ हेच दिवस संस्मरणीय कर्तृत्वाचे ठरावेत.

**मकर** : मंगळ तुमच्या राशीत आलेला आहे. त्याचा चेहरा उग्र दिसत असला तरी त्याचे अंतःकरण मांगल्याने भरलेले असते.

या वेळी तर तुम्हांला मंगळातील मांगल्याचाच प्रत्यय यायला लागेल. तुम्ही स्वीकारलेल्या साऱ्या जबाबदाऱ्या यशस्वीपणे पार पाडण्याचे सामर्थ्य त्याच्या सहकार्यातच साठवलेले आहे असाच तुम्हांला अनुभव यायला लागेल.

पहिला पंधरवडा तर अनंत लाभदायक घटनांनी भरलेला जाणवेल. नवे स्नेहसंबंध जुळून येतील. प्रेमसंबंध वाढीस लागतील.

नोकरीधंद्यात तर आजवर कधीही न मिळालेले यश या काली मिळून जाईल. दि. २८ डिसेंबरचा सूर्य-गुरुत्रिकोण तुमचे राजकीय महत्त्व खूपच वाढवील.

दि. १ ते ५, १० ते १६, २४ ते २९ या काली अनपेक्षितपणे अनेक लाभ पदरी पडावेत.

**कुंभ** : मंगळ व्यायात आल्याने काही फारसे बिघडेल असे नाही. खर्च वाढेल पण प्राप्तीचे मानही सुधारेल.

कलासम्राट शुक्र तुमच्या भाग्यस्थानी आला आहे. तो तुमच्यातील अभिजात कला प्रवृत्तींना उत्थान देईल. आणि दुसऱ्या पंधरवड्यात सूर्य-बुध तुमच्या लाभस्थानी येताच अनेक मार्गांनी तुमच्या हाती पैसा येऊ लागेल.

व्यावसायिक क्षेत्र विस्तारेल. संपन्न लोकांचे हार्दिक सहकार्य लाभेल. सहज काही करायला जावे आणि ते घवघवीत यश घऊन उठावे याचा साक्षात्कार दुसऱ्या पंधरवड्यात वेळोवेळी यायला लागेल.

दि. ४ ते ९, १७ ते २३, २७ ते ३० या कालावरच सारे लक्ष केंद्रित करा.

**मीन** : कित्येक महिन्यांत आताच मंगळ तुमच्या लाभात आलेला आहे आणि सूर्य भाग्यातून जाऊ लागलेला आहे. अशा वेळी साडेसातीची तुम्हांला दखल घ्यायचीही गरज भासणार नाही. न होणारी कामे झटपट व्हायला लागतील, न सुटलेले प्रगतीचे गणित आता फारसा विचार न करताही सुटायला लागेल.

व्यावहारिक यश, सामाजिक प्रतिष्ठा, राजकीय मानसन्मान यांपैकी काही, कदाचित साऱ्याही गोष्टी घडून यायला लागतील. कला-साहित्याच्या क्षेत्रात नवे आकर्षक करारमदार होतील. नोकरी धंद्यातील अपेक्षित प्रगती दृष्टिक्षेपात यायला लागेल.

दि. ५ ते ११, १९ ते २८ या काली अनेक अनन्यसाधारण घटना घडून याव्यात.

O

MANOOS (Weekly) : 40 Paise : Regd. No. M H-649

चवथी सचित्र आवृत्ति

# राजा शिवछत्रपती

ब. मो. पुरंदरे

मूल्य : रुपये बेचाळीस फक्त

पूर्वग्राहकांनी कार्यालयातून आपल्या प्रती
पावती दाखवून घेऊन जाव्यात.

परगावच्या पूर्वग्राहकांना व व्यापारी
ग्राहकांना नोव्हेंबरच्या शेवटच्या
आठवड्यात प्रती मिळू शकतील.

**राजहंस प्रकाशन**
**उंबऱ्या गणपती चौक, लक्ष्मी रोड,**
**४१९ नारायण पेठ, पुणे २.**

राजहंस प्रकाशन संस्थेच्या मालकीचे हे साप्ताहिक, संस्थतर्फे मुद्रक व प्रकाशक श्री. ग. माजगावकर यांनी संगम प्रेस प्रा. लि., ३८३ नारायण पेठ, पुणे २, येथे छापून, ४१९ नारायण पेठ, पुणे येथील संस्थेच्या कार्यालयात प्रसिद्ध केले. सं. श्री. ग. माजगावकर.